बुधवार, २५ जानेवारी २०२३
किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी • दैनिक
वर्ष - ०२ • अंक -१५५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

• MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • WEDNESDAY 25 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-155 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-14 • PRICE-5

# भाजप-ठाकरे गटात राडा

## कणकवलीत राजकीय वातावरण तापले

आधुनिक केसरी न्यूज

**कणकवली : तालुक्यातील कनेडी गावात भाजप आणि शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांत राडा झाला. माघी गणेश जयंतीच्या पूर्व संध्येला त्यामुळे कणकवलीत राजकीय तणाव निर्माण झाला आहे. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कनेडी गावात सध्या अभूतपूर्व पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.**



मंगळवारी सकाळी नितेश राणे समर्थक भाजप पदाधिकारी व शिवसेना ठाकरे गटाच्या सतीश सावंत यांच्या कार्यकर्त्यांमध्ये किरकोळ बाचाबाची झाली होती. याचा राग मनात ठेवत दोन्ही बाजूचे कार्यकर्ते आमने-सामने आले. त्यानंतर कनेडी बाजारपेठेत तुफान राडा झाला. या राड्यात शिवसेनेचे कुंभवडे गावचे सरपंच आप्पा तावडे हे जखमी झाले. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यावेळी पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. यानंतर येथील परिस्थिती पाहता पोलिसांची मोठी कुमक मागवण्यात आली.

मात्र, तरीही भाजप कार्यकर्त्ये आक्रमक झालेले होते. परिस्थिती नियंत्रणात असली तरी कनेडी बाजारपेठेत तणावाचे वातावरण आहे. तर सोमवारीही कणकवलीत भाजपचे कणकवली नगराध्यक्ष समीर नलावडे व आमदार वैभव नाईक यांचे बंधू गटनेते सुशांत नाईक यांच्यात भर रस्त्यात धक्काबुक्की झाली होती. सध्या कणकवली तालुक्यात भाजप विरूद्ध शिवसेना आमने-सामने आल्याचे पाहायला मिळत आहे.

### चर्चेतली बातमी

## शिंदे -फडणवीस यांची शपथ असंवैधानिक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांना सरकार स्थापन करण्यासाठी कोणतेही पत्र अथवा निमंत्रण देण्यात आले नव्हते, अशी पुष्टीच राजभवनकडून नुकत्याच दिलेल्या माहिती अधिकारात समोर आली असून राज्यपालांनी शिंदे आणि फडणवीस यांना पदाची शपथ कशी दिली ही शपथच असंविधानिक असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी केला आहे.

एकीकडे सत्तासंघर्षाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. तर दुसरीकडे एक धक्कादायक खुलासा माहिती अधिकारात राजभवनकडून सरकार स्थापनेसाठी निमंत्रण दिले नसल्याचे समोर आले आहे. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी अनेकवेळा विविध वादग्रस्त वक्तव्य करून वाद निर्माण केला आहे तर दुसरीकडे महाविकास आघाडीने विधानपरिषदेसाठी दिलेल्या १२ उमेदवारांच्या नावांना मंजुरी दिली नाही याकडेही महेश तपासे यांनी लक्ष वेधले आहे. माहिती अधिकारात झालेल्या या नव्या खुलाशामुळे आता नवे प्रश्न निर्माण झाले असून आता राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी घटनात्मक भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही महेश तपासे यांनी केली आहे.

# अमेरिकेचे दबावतंत्र; इस्त्रायलसोबत युद्धाभ्यास

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इस्त्रायलने इराणविरुद्ध लष्करी सराव सुरू केला आहे. यामध्ये हजारो अमेरिकन आणि इस्त्रायली सैनिक आणि दोन्ही देशांची वायू सेना सहभागी झाली आहे. या संयुक्त युद्धाभ्यासाबद्दल विचारणा केली असता अमेरिकेतील एका वरिष्ठ संरक्षण अधिकाऱ्याने सांगितले की, अमेरिकेला या युद्धाभ्यासाद्वारे इराणला संदेश द्यायचा आहे की, युक्रेनमध्ये सुरु असलेल्या युद्धामुळे अमेरिकेचे मध्य-पूर्वेतील परिस्थितीवरून लक्ष विचलित होऊ शकत नाही. त्याचरोबर चीनला देखील अशाच प्रकारचा संदेश देण्याचा प्रयत्न अमेरिकेकडून केला जात आहे.

या युद्धाभ्यासाद्वारे अमेरिका चीनला सांगू पाहतेय की, युक्रेनमधील परिस्थितीमुळे अमेरिकेचे लक्ष विचलित झालेले नाही. त्यांनी कोणत्याही प्रकारच्या गैरसमजाखाली राहू नये, अमेरिका कोणत्याही वेळी कुठेही मोठे लष्कर पाठवू शकते, अशी माहिती नवभारत टाईम्सच्या वृत्ताद्वारे देण्यात आली आहे. या युद्धाभ्यासाला जुनिपर ओक २३ असे नाव देण्यात आले आहे. संरक्षण विभागातील सुत्रांच्या माहितीनुसार उभय देशांमधला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा युद्धाभ्यास आहे. यात मोठ्या प्रमाणात एअरक्राफ्ट समाविष्ट केले आहेत. यासह मोठ्या प्रमाणात बॉम्ब आणि स्फोटकेदेखील समाविष्ट केली जातील. या युद्धाभ्यासात ६,४०० अमेरिकन सैनिक आणि १,१०० इस्त्रायली सैनिक सहभागी होत आहेत. यासह बी-५२ बॉम्बर्स, १४२ एयरक्राफ्ट समाविष्ट केले जातील. यातले १०० एअरक्राफ्ट अमेरिकेचे तर ४२ एअरक्राफ्ट इस्त्रायलचे असतील. तसेच चार एफ-३५ फायटर जेट्स, ४५ एफ/ए-१८ सुपर हॉर्नेट लढाऊ विमानं आणि दोन एमक्यू-९ रीपर ड्रोन्स शक्तीप्रदर्शन करतील.

अमेरिकन नौदलाचा एक कॅरियर स्ट्राईक ग्रुप आणि सहा इस्त्रायली जहाजं देखील या युद्धाभ्यासाचा भाग आहेत. याबद्दल अमेरिकन सेंट्रल कमांडचे कमांडर जनरल मायकल एरिक कुरिला म्हणाले की, हा एक संयुक्त ऑल डोमेन युद्धाभ्यास आहे. यामुळे आमची हवा, जमीन आणि समुद्र तसेच आमच्या भागीदारांसोबतची अंतराळातील परस्पर कार्यक्षमता सुधारतो. तसेच याद्वारे आम्ही आमच्या मध्यपूर्वेतील वचनबद्धतेला बळकटी देत आहोत. तसेच अजून एका संरक्षण अधिकाऱ्याने सांगितलं की, अशा प्रकारचे युद्धाभ्यास पुढच्या काळात देखील होत राहतील.



काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी जम्मूच्या नगरेटा शहरातून 'भारत जोडो यात्रा' सुरू झाली. अभिनेत्री उर्मिला मातोंडकर राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेत सहभागी झाल्या.

# मागासलेला उस्मानाबाद जिल्हा देतो कोट्यवधींचा महसूल!

## ग्रामीण भागातील तालीम बंद, दारू विक्रीच्या दुकानात मात्र वाढ; पालकवर्ग चिंतेत

आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

उस्मानाबाद : अतिमागासलेला जिल्हा म्हणून उस्मानाबादला ओळखले जाते. जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती पाहता, जिल्ह्याचा मुख्य व्यवसाय शेतीसोबत पूरक व्यवसाय म्हणून हा दुग्ध व्यवसाय आहे. पण बुडीत निघालेल्या सहकारमुळे तोही अडचणीतच आहे. जिल्ह्यातील तरुणांना आपल्या आरोग्याची काळजीच नाही. कारण या जिल्ह्यात दुधापेक्षा जास्त दारू प्याली जाते. शरीरासाठी आरोग्यदायी असणाऱ्या दुधाला कानाडोळा करत, डोळे बंद करून दारू पिण्याची प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे.

त्यावर जिल्ह्यातील गाव पुढाऱ्यापासून लोकप्रतिनिधीपर्यंत कोणीही बोलत नाही हे तर त्याहून जास्त गंभीर आहे. एक रुपया लिटरने जरी दुधाचे भाव वाढले तर महागाई वाढली म्हणून ओरडणारे सर्वसामान्य गावागावात दारू बाटली मागे वीस तीस रुपये जास्त दर देत, दारू आनंदाने पितात हेही नवलच आहे. जिल्ह्यात साधारणता दररोज विक्री होणाऱ्या दारूच्या माध्यमातून राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसुलात घसघशीत वाढ होत आहे. दारूच्या विक्रीतून जिल्ह्याच्या महसूलात देखील वाढ झालेली आहे. मात्र दारू विक्रीचे हे प्रमाण वाढते पाहता नागरिकांनी त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे.




मध्याच्या अतिसेवनामुळे हृदयविकाराचा धोका देखील वाढतो. त्यामुळे मद्यप्राशन करणे आरोग्यासाठी हानिकारक आहे.
डॉ. राज पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक

**सर्वात जास्त देशीचाच बोलबाला :** कारण जिल्ह्यामध्ये देशी पिणाऱ्यांनी एकट्या डिसेंबर महिन्यामध्ये दिवसाला 13 हजार लिटरप्रमाणे महिन्याची 3 लाख 91 हजार 106 लिटर दारू पचवली आहे . तर देशी पाठोपाठ विदेशी पिणाऱ्यांनी जिल्ह्याचा महसूल वाढवण्यात चांगलाच हातभार लावला आहे . दिवसाला 10 हजार लिटरच्या वर दारू ढोसत या मद्यप्रेमींनी एकट्या डिसेंबर महिन्यात 3 लाख 22 हजार 860 लिटर मद्य प्राशन केले आहे .

**कडाक्याच्या थंडीतही बिअरचा जोर कायम :** बियरप्रेमींनी डिसेंबर महिन्यामध्ये गारठलेल्या अवस्थेत पूर्ण महिनाभरात 2 लाख 35 हजार 408 लिटर बियरची चव चाखत दिवसाला सात हजार लिटर थंड बियर प्यायचा आस्वाद घेतला आहे .माहे एप्रिल पासून डिसेंबर महिन्या पर्यंत नऊ महिन्याची आकडेवारी पाहता देशी पिणाऱ्यांमध्ये 8 .75%, विदेशी पिणाऱ्यांमध्ये 29 .41%, बियर पिणाऱ्यांमध्ये 54 .64% आणि वाईन पिणाऱ्यांमध्ये 48 .50 टक्क्यांनी वाढ झालेली आहे .

**बारा महिन्याच्या तुलनेत :** सर्वात जास्त मद्यपान हे उन्हाळ्यातील एकट्या मे महिन्यात दारूप्रेमी करतात . एक एक लिटर दुधापेक्षा दारूच्या एक बाटलीची किंमत दीडपट दोन पट असतानाही दुध उत्पन्नाच्या तुलनेत दारू पिणाऱ्यांच्या संख्येत भरमसाठ वाढ होत आहे . ही बाब जिल्ह्यातील तरुणांसाठी, पालकांसाठी व समाजासाठी अतिशय चिंताजनक आहे . तरुण पिढीतील हाताला काम नसल्याची नैराश्याची भावना दूर करत त्यांच्या हाताला रोजगार कसे उपलब्ध होतील, याकडेच लोकप्रतिनिधी लक्ष देण्याची मागणी पालकांमधून बोलली जात आहे .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# तीर्थ, तीर्थरूप आणि तीर्थक्षेत्र...

आधुनिक केसरी

अर्जुन जयद्रथाला, कर्णाला आपण कसे मारले तर भीम हा दुर्योधन आणि दुःशासनाला आपण गदायुद्धात कसे ठार मारले याचे रसभरीत वर्णन करीत असतात. हे सगळे ऐकताना श्रीकृष्ण तेथे उपस्थित असतो आणि त्याला हे सगळे ऐकताना गालातल्या गालात हसू येते. युद्धात झालेल्या नरसंहारामुळे धर्मराज युधिष्ठिर अस्वस्थ झालेला असतो. त्याच्या मनात मनःशांतीसाठी तीर्थयात्रेला जायचे असते. तो तीर्थयात्रेचा विषय काढताच भीम आणि अर्जुनही तीर्थयात्रेला जाण्यासाठी तयार होतात. नकुल सहदेव तर तयारच असतात. कृष्ण त्यांना म्हणतो, ' आपण नुकतेच युद्ध जिंकले आहे. युधिष्ठिर हस्तिनापूरचा राजा झाला आहे. अशा परिस्थितीत सगळ्यांनीच राज्याची जबाबदारी सोडून तीर्थयात्रेला जाणे योग्य होणार नाही. राज्यकर्त्यांना हे भान ठेवले पाहिजे. पण सर्वांचा आग्रह पाहून तो त्यांना परवानगी देतो. तो म्हणतो की तुम्ही तीर्थयात्रेहून परत येईपर्यंत मी द्वारकेला जात नाही. फक्त माझे एक काम करा. मी तुम्हाला एक लिंबाची काडी देतो. तुम्ही ज्या ज्या तीर्थक्षेत्री जाल, त्या त्या ठिकाणी त्या काडीलाही तुमच्याबरोबरच स्नान घाला आणि लवकरात लवकर परत या. पांडव मग हरिद्वार, ऋषिकेश इ ठिकाणी तीर्थयात्रा करून परत येतात. येतानाही त्यांच्या युद्धातील पराक्रमाच्याच गोष्टी चाललेल्या असतात. आल्यावर श्रीकृष्ण त्यांना काही दिवस विश्रांती घेण्यास सांगतो. तरीही त्यांच्या युद्धातील पराक्रमाच्या फुशारक्या मारणे सुरूच असते. कृष्ण मग भीमाला म्हणतो की मी तुला ती लिंबाची काडी दिली होती, ती परत आणलीस का, तिला स्नान घालत होतात ना ? मग भीम ती काडी घेऊन येतो. कृष्ण त्याला म्हणतो, ' आता या काडीला तुम्ही सगळ्या तीर्थक्षेत्री स्नान घातल्यामुळे ती पवित्र आणि गोड झाली असेल. तेव्हा तू ती खाऊन टाक . ' त्यावर भीम म्हणतो, ' केशवा, आमची चेष्टा करतोस का ? कितीही स्नान घातले तरी लिंबाची काडी गोड कशी होईल ?' **क्रमश :**





# आनंदी पहाट

## मैत्रीचे नाते निरंतर टिकवावे

आधुनिक केसरी

विश्वसनीय मैत्रीच्या विश्वात मैत्रीचे नाते देखील असेच मजबूत असते आणि म्हणूच ते विश्वासावर निरंतर टिकून राहते. आभाळातून पडणारा पावसाचा प्रत्येक थेंब आपल्याला काही-ना-काही देऊन, शिकवून जातो. जेव्हा तो तहानलेल्या धरतीवर पडतो, तेव्हा तो मातीला एक वेगळाच सुगंध देऊन जातो; ओल्या मातीचा गंध देण्यांत किती सामर्थ्य असते, हेच तो नकळत आपल्याला सांगून जातो. जेव्हा तो झाडाच्या पानांवर पडतो, जास्त वेळ तो तिथे थांबत नसेलही पण, तरीही तो त्या पानांना अगदी टवटवीत करून जातो, ओझरता स्पर्श, ओझरत्या स्पर्शाची ताकद तो आपल्याला दाखवून जातो; कारण त्यांत लालसा नसते, त्यांत असते एक अनामिक ओढ आणि ती आपल्याला टवटवीत ठेवते. एका थेंबात देखील मैत्रीचे नाते टिकवण्याची जर इतकी ताकद असते; तर विश्वसनीय मैत्रीच्या नात्यात किती ताकद असेल. एक नवे भावविश्व निर्माण करण्याची ताकद तर निश्चितच त्या मैत्रीच्या नात्यात असते. मैत्री निर्माण होणे कदाचित सोप्प असेल आणि नव्याने निर्माण करणे शक्य होत असेल; परंतू ती विश्वासाच्या माध्यमातून टिकवून ठेवणे अधिक आव्हानात्मक असते. ज्या व्यक्तीला सतत शुभ, सकारात्मक, आशावादी विचार करण्याची सवय असते, त्याचे मन नेहमीच आनंदाने, उत्साहाने भरलेले राहते. अशा उत्साही मनाच्या व्यक्तीला नेहमीच यशप्राप्ती होत राहते. सकारात्मक, आशावादी, आनंदी विचार हीच यशस्वी होण्याची गुरुकिल्ली असते, ह्याची जाणीव सर्वप्रथम आपण करून घेणे आवश्यक असते. गुरुकिल्लीद्वारे आपल्या सानिध्यात येणाऱ्या प्रत्येकास आपल्यासारखेच घवघवीत यश मिळत राहण्यासाठी श्वास-विश्वास दोन्हींही महत्वाचे असते. श्वास-विश्वास एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. परस्पर नातेसंबंधातील विश्वास हा श्वासासारखाच असतो. आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत विश्वास टिकवून ठेवण्याची केवळ नैतिक जबाबदारीच नाही, तर कर्तव्य असल्याचे भान राखले पाहिजे.

विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**तारील श्रीरंग | सर्वकाळ ||**
**लालसा मनीची | स्वार्थाला आंदन ||**
**क्लेशाचे कारण | अंती सत्य ||१||**
**माया स्नेह याची | ज्याला नसे चाड ||**
**तोच खरा द्वाड | जाण येथे ||२||**
**विकारांच्या ठायी | गुंतूनी पडला ||**
**तया न घडला | परमार्थ ||३||**
**ऐशा नरा नको | देऊ कोठे थारा ||**
**वासनेचा वारा | घात करी ||४||**
**संतसंग होता | होशील निस्संग ||**
**तारील श्रीरंग | सर्वकाळ ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जर काय करावे हे सुचत नसेल तर वाचन किंवा श्रवण कर. नेमके काय करावे हे सुचत नसेल तर लेखन कर. जर व्यवस्थित सुचत असेल तर भाषण कर.**

**ध्यानी ठेवा- तुम्ही खुशाल खूप मोठे व्हा. असतील अनेक जण तुमच्यापेक्षा लहान; तुम्ही मात्र तुमच्यापेक्षा मोठे कोण आहेत याकडे लक्ष द्या. तुमचे मोठेपण टिकवायचे असेल तर हेच अद्वितीय साधन आहे.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**ऊर्ध्व लक्ष्य साधन चले, अर्ध मनन मन मीत । विजय प्राप्त रणधीर की, मन जीते जग जीत ।।२०।। (स्वर्वेद प्रथम मण्डल द्वितीय अध्याय) ०१/०२/२० मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ०१/०२/२० मुळ भाष्याचा मराठी अनुवाद :** जीवाचा प्रबळ शत्रू मन आहे. मनातच सर्व जगाचे साम्राज्य आहे. मनाच्या आवेगात येऊन जीव जन्म मृत्यूच्या आणि त्रितापांच्या दुःखाला चिरकाला पासून भोगत आहे. जेव्हा साधक आपल्या लक्ष्यात ( ध्येयात ) मनाला वर घेऊन जातो, तेव्हा मन भोगलेल्या विषयांचे मनन करून खाली येते. परंतू पूर्ण रणधीर साधक पुरुषार्थ करून मनाला जिंकतो आणि पर्यायाने सर्व जगालाही जिंकतो, कारण मनातच सर्व संसार मनन रूपाने विद्यमान आहे. म्हणून मन-जीत जग-जीत होऊन जातो.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

स्वस्वरूपाशी नसतो हे याठिकाणी लक्षात ठेवणे योग्य होय. जेथे सारे नामरूपमय द्रुष्य विश्व संपते तेथे "मी मुक्त आहे"ही भावना उरणे शक्य नसते. स्वस्वरूपाच्या अनुभवात बध्दपणा मुक्तपणा याचा विसर पडतो. आणि मग ऊलतो तो फक्त आणि फक्त शुन्य म्हणून म्हणतात की अहंकार त्याग ही शुन्यत्वाची पहिली पायरी आहे. थोडक्यात काय तर मित्रांनो "मी बध्द होतो व मी मुक्त झालो"हा सगळा भ्रम समजावा. बध्द व मुक्त अवस्था मायामय असते. झोपेतील स्वप्न खरी नसतात जागे झाल्यावर आपल्याला ती आठवत देखील नाही. म्हणून ज्यांना आत्मसाक्षात्कार होऊन आत्मज्ञान मिळते ते सगळे मुक्त समजावे. तेंच ज्ञान परिपक्व झाले कीआपण मुक्त आहोत ही मनाची भावना संपते.देहबुद्धीच्या कक्षेत निर्माण होणारी कल्पनाच बध्द,मुक्तीची भावना वाढीस लावते. पण आत्मज्ञानी देहाच्या पलीकडे असणाऱ्या ब्रम्हाशी समरस झाल्याने ते सतत भेदरहित व भेदातीत असतात.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# नामसाधन कसे करावे ?

आधुनिक केसरी

नामाचे साधन कसे करावे ? एखाद्या दगडावर पुष्कळ पाणी एकदम ओतले तर तो दगड नुसता भिजेल आणि पाणी निघून जाऊन कोरडा होईल. पण तेच पाणी थेंब थेंब असे एकाच ठिकाणी आणि अखंड पडत राहिले तर त्या दगडाला भोक पडेल, आणि काही दिवसांनी दगड फुटूनही जाईल; त्याप्रमाणे, केव्हातरी पुष्कळ साधन करण्यापेक्षा अगदी अल्प प्रमाणात का होईना पण नित्यनेमाने, ठराविक वेळी, आणि शक्य तर ठराविक स्थळी, जर नामाचे साधन केले तर ते जास्त परिणामकारक होते. जात्याला दोन पेठी असतात; त्यांतले एक स्थिर राहून दुसरे फिरत राहिले तर दळण दळले जाऊन पीठ बाहेर पडते; पण जर दोन्ही पेठी फिरत राहिली तर दळण दळले न जाता फुकट श्रम मात्र होतात. माणसाचे शरीर आणि मन, अशी दोन पेठी आहेत. त्यांतले मन हे स्थिर आहे आणि देह हे फिरणारे पेठे आहे. मन परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करावे, आणि देहाने प्रपंचाच्या गोष्टी कराव्यात. प्रारब्धाचा संबंध देहापर्यंतच असतो. प्रारब्धरूपी खुंटा देहरूपी पेठ्यात बसून तो त्याला फिरवतो, आणि मनरूपी पेठे स्थिर असते. देह प्रारब्धावर सोडावा, आणि मन भगवंताच्या स्मरणात स्थिर ठेवावे, याहून नामाचे साधन दुसरे काय ! हे साधन अमक्यालाच साधेल असे नाही, ते कोणालाही साधेल. गरिबाला गरिबीचे दुःख होते म्हणून साधत नाही, तर



श्रीमंताला पैशाचा अभिमान आणि लोभ असतो म्हणून साधत नाही; विद्वानाला विद्येचा अभिमान होतो म्हणून साधत नाही, तर अडाण्याला काय करावे हे समजत नाही म्हणून साधत नाही. साशंक वृत्तीने कितीही साधन केले, कितीही नामस्मरण केले, तरी कधी समाधान होणार नाही. नीतिधर्माचे आचरण, शास्त्रशुद्ध वर्तन, शुद्ध अंतःकरण आणि भगवंताचे स्मरण इतक्या गोष्टी असतील तरच साधक शेवटपर्यंत पोहोचेल; आणि शेवटपर्यंत तो पोहोचला तरच फायदा. ‘ घरी पोहोचल्यावर पत्र लिहा ’ असे म्हणतात, याचा अर्थ हाच आहे. प्रपंच करीत असताना वाईट विचार मनात येतात, त्याचप्रमाणे परमार्थ करीत असतानाही वाईट विचार आले म्हणून घाबरण्याचे कारण नाही. ज्यावेळी वाईट विचार मनात येतील त्यावेळी भगवंताचे नाम घेतले तर त्या विचारांची मजल पुढे जाणार नाही. दृढ विश्वासाने नाम चालू ठेवावे. जिथे कर्तव्याची जागृती आणि भगवंताची स्मृती आहे तिथेच समाधानाची प्राप्ती होते. ‘ भगवंता, मी तुझा आहे ’ असे रात्रंदिवस म्हणत गेल्याने भगवंत प्रकट होत जाईल; आणि भगवंत जितका प्रकट होत जाईल तितके ‘ मी ’ पणाचे दडपण आपोआप कमी होत जाईल. **आजचे बोधवचन आहे - प्रारब्धाची व ग्रहांची गती देहापर्यंतच आहे. मनाने भगवंत भजायला त्यांची आडकाठी नाही.**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**वाळो जन मज म्हणोत शिंदळी । परि हा वनमाळी न विसंबें ॥१॥**
**सांडूनि लौकिक जालियें उदास । नाहीं भय आस जीवित्वाची ॥२॥**
**नाइकें वचन बोलतां या लोकां । म्हणे जालों तुका हरिरता ॥३॥**

# महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड 'आयआयबी' आता अकोल्यात

## विदर्भातील विद्यार्थ्यांना मिळणार NEE/JEE च्या तयारीकरीता परफेक्ट टीचिंग सोबतच प्लॅनिंग

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर / नांदेड :** डॉक्टर-इंजिनिअर होण्याचे अनेक विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्वप्न असते. मात्र, हे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी केवळ ईच्छाचं नव्हे तर योग्य मार्गदर्शनाची व नियोजनाची आवश्यक असते. हाच पाया पक्का करत सोबतच प्रत्येक पालकांचे टाकलेले विश्वास सार्थ ठरवत IIB राज्य भरात प्रत्येक कान्या कोपऱ्यात व मनामनांत पोहोचली आहे. देशभरात सर्वाधिक डॉक्टर देणाऱ्या आयआयबी इन्स्टिट्यूटने राज्यभर सर्वाधिक विद्यार्थ्यांना डॉक्टर-इंजिनिअर घडविण्याचा विडा उचलत आपल्या शाखेचे जाळे विस्तारित केले आहे. नांदेड, लातूर येथे उज्ज्वल यशाचे शिखर गाठल्यानंतर पुणे, कोल्हापूर आणि औरंगाबादनंतर विदर्भातील विद्यार्थ्यांच्या हितार्थ अकोला येथे आपल्या इन्स्टिटयूट ची नवीन शाखा स्थापन केली असून या शाखेमुळे विदर्भातील विद्यार्थ्यांना डॉक्टर-इंजिनिअर होण्याची योग्य दिशा सोबतच परफेक्ट गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार आहे.

देशात आज असे एकही एम्स मेडिकल कॉलेज किंवा इतर कोणते नामांकित वैद्यकीय महाविद्यालय नाही जेथे आयआयबी इन्स्टिट्यूटचा विद्यार्थी शिक्षण घेत नाही, किंवा वैद्यकीय शिक्षण घेऊन एक निष्णात डॉक्टर म्हणून बाहेर पडला नाही. याचे मुख्य कारण म्हणजे मागील तब्बल २३ वर्षांपासून आयआयबी इन्स्टिट्यूट शैक्षणिक क्षेत्रात देत असलेले अतुलनीय योगदान. आजमितीला आयआयबी इन्स्टिट्यूटच्या नांदेड, लातूर येथील ज्ञानशाखा अत्यंत नेत्रदीपक असा निकाल देत आहेत. मागील काळात विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे येथे नीट आणि जेईईच्या तयारीसाठी आयआयबी इन्स्टिट्यूटची शाखा स्थापन केली. मात्र, यावर न थांबता संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना डॉक्टर-इंजिनिअर क्षेत्रात करियर घडविता यावे यासाठी




अल्पावधीत कोल्हापूर आणि औरंगाबाद येथे शाखा स्थापनेनंतर विदर्भातील विद्यार्थ्यांच्या हितार्थ अकोला येथे आयआयबी इन्स्टिटयूटने आपली नवीन शाखा स्थापन केली असून या शाखेमुळे विदर्भातील विद्यार्थ्यांना डॉक्टर-इंजिनिअर होण्याची योग्य दिशा मिळणार आहे. कारण महाराष्ट्राच्या प्रमुख विभागांपैकी एक असलेल्या विदर्भात असलेल्या नागपूर, यवतमाळ, वर्धा, अकोला, अमरावतीत वाशीम, बुलढाणा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा आदी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना मेडिकल-इंजिनिअरिंग करियर घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या नीट/जेईई ची तयारी करण्यासाठी मोठी सुविधा निर्माण झाली आहे.

विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी आयआयबीने अकोला येथे स्थापन केली असली तरी आयआयबी आणि विदर्भाचे नाते नवीन नाही . कारण आयआयबी मागील काही वर्षांपासून विदर्भातील गडचिरोली आणि परिसरातील आदिवासी समाजातील, वंचित घटकातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देत आहे . आता खुद्द आयआयबीची शाखाचं विदर्भात स्थापन झाल्यामुळे संपूर्ण विदर्भातील विद्यार्थ्यांना मोठी सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे .

# शिवसेना- वंचित युतीला आमचा विरोध नाही : जयंत पाटील

## राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेना आणि वंचित युतीला आमचा विरोध नाही. कुणी आमच्या आघाडीबरोबर चर्चा करुन ऐनवेळी बाजूला जाऊ नये याची काळजी आघाडीतील प्रमुख घटकांनी घ्यावी अशी इच्छा आणि सतर्कता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदामंत्री जयंत पाटील यांनी बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उध्दव ठाकरे गट) यांनी कुणाशीही चर्चा केली आणि नवे मित्र जोडले तरी कुणाचा विरोध नाही परंतु मित्र जोडताना ते मित्र शेवटपर्यंत राहतील आणि निवडणूक आपल्याबरोबर लढवतील याची काळजी घेणे आवश्यक आहे असे मतही जयंत पाटील यांनी व्यक्त केले. कसबा व चिंचवडबाबत महाविकास आघाडीचे तिन्ही पक्ष एकत्र बसतील व त्यावर निर्णय होईल. चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद जास्त असल्याने कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन चर्चा केली जाईल असे सांगतानाच वातावरण निर्माण करण्यासाठी मागण्या, घोषणा, ठराव करण्याचे कार्यक्रम सध्या भाजपकडून सुरू आहेत. सध्या विरोधकांवर दबावतंत्र वापरण्याचा प्रयत्न चिंचवडमध्ये भाजप करत आहे. मात्र खरी चौकशी तर पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराची करायला हवी. त्याठिकाणी चौकशी केली तर भाजपचा किती भ्रष्टाचार आहे हे स्पष्ट होईल असेही जयंत पाटील म्हणाले. आज राष्ट्रवादी काँग्रेसची आदरणीय शरद पवारसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख नेत्यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये राज्यात सध्या जे प्रश्न सुरु आहेत त्याबद्दल चर्चा झाल्याची माहिती जयंत पाटील यांनी दिली.

# शिंदे सरकारच्या राजवटीमध्ये गुंडगिरी

## महाराष्ट्र नवनिर्माण सेना सहन करणार नाही : मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** एकनाथ संभाजीराव शिंदे (मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य) यांना.मा.जिल्हाधिकारी साहेब जालना यांच्या मार्फत, दि. २३ जानेवारी रोजी चर्चा करून निवेदन दिले. पुणे जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष समीर थिगळे गोळीबार करून जीव घेणे हल्ला करणाऱ्या गुंडानवर मोका अंतर्गत गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी निवेदनात पुढे म्हटले आहे, वरील विषयावर आम्ही लक्ष वेधू इच्छितो कि महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुणे जिल्हाध्यक्ष समीर थिळगे यांच्यावर राजगुरुनगरच्या सातकरस्थळ येथील राहत्या सुदैवाने जीवित हानी झाली नाही, मागील अनेक वर्षापासून समीर तिगळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे श्रीमान राज साहेब ठाकरे यांचे कट्टर समर्थक एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून काम करत आहेत, परंतु कुख्यात गुंडांनी हा गोळीबार केला आहे, समीर यांच्या कुटुंबीयांसमोर गोळीबार केल्याने परिसरात आणि कुटुंबात कितीचे वातावरण निर्माण झाले आहे याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अद्याप आरोपी अटक झालेली नाहीत, समीर थिळगे गुंडांनी फोन करून पैशाची मागणी केली तसेच मी खेडचा भाई आहे. तुला खूप माज आला का असी धमकी देऊन तुला व



तुझ्या कुटुंबाला संपून टाकतो असे म्हणत पिस्तूल रोखून समीर थिळगे यांच्याकडे पैशाची मागणी केली होती, त्यानंतर या गुंडांनी गोळीबार केला, यामागे राजकीय षडयंत्र आहे का याचा तपास करून संबंधित सर्व लोकांवर मोका कायद्यांतर्गत तत्काळ गुन्हे दाखल करा ही महाराष्ट्र नवनिर्माण सेना जालना जिल्ह्याच्या वतीने मागणी करून अपेक्षा करत आहोत, महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हा अध्यक्ष पुणे समीर थिळगे यांच्यावर गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच पदाधिकाऱ्यांमध्ये भीती निर्माण षडयंत्र रचून दहशत निर्माण करणाऱ्या गुंडांना व त्यांच्या मास्टरमाईंड लोकांना तत्काळ मुका कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना त्वरित अटक करण्यात यावी, योग्य वेळेत गुंडांना अटक न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी असा इशारा प्रकाश सोळंके जिल्हाध्यक्ष, यांनी दिला कृष्णा गोवर्धन सोळंके मनसे तालुका अध्यक्ष परतुर, तुकाराम मनविसे तालुका अध्यक्ष परतुर, कदम, महादेव चव्हाण सोबत महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# मे महिन्यात होणार बुद्धधम्म दीक्षा सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** येथे बुद्ध धम्म दीक्षा सोहळ्याचे सात मे रोजी आयोजन करण्यात येणार असून यावेळी २० हजारांहून अधिक अनुयायी धर्मांतर करू शकतील, अशी माहिती आनंद लोंढे यांनी दिली आहे. भारतात जातीय द्वेषातून दलित, मुस्लीम, मागासवर्गीय, बहुजन जातींवर अन्याय, अत्याचार होण्याच्या घटना घडत आहेत. या सर्व असुरक्षित आणि द्वेषकारक वातावरणात जगताना दलित, सन्मानाने जगू देईल, असा पर्याय हवा, अशी दलित मनामनातील भावना असल्याचे त्यांनी सांगितले.

# बेकायदेशीर जमिनी हडप करणाऱ्यांविरोधात आदिवासी क्रांती सेना संघटना आक्रमक



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आदिवासी समाजाच्या जमिनी बेकायदेशीर हडप करणारे भूमाफियां व संबंधित प्रशासनातील अधिकाऱ्यांवर अॅट्रॉसिटी चा गुन्हा दाखल करून न्यायालयीन चौकशी करावी व पीडित आदिवासी बांधवांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी जिल्हा प्रशासनाला निवेदनातून आदिवासी क्रांती सेना संघटना महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच या मागणी संदर्भात आदिवासी क्रांती सेनेच्या वतीने ठिय्या आंदोलनातून निदर्शने करण्यात आली आहे.

धुळे एमआयडीसी शिवारातील आदिवासी जमिनी बद्दल बेकायदेशीर विक्री परवानगी तसेच बोगस दस्तावेज, बोगस सर्कल अहवाल तयार करून, हडप केलेले शेत जमिनीची चौकशी करण्यात यावी. तसेच धुळे शहराच्या हद्दीतील 99 वर्षाचा करार संपत आलेल्या सतीश सालव्हंट व पिंपरी गावाच्या शिवारातील गट क्रमांक 103 येथील बेकायदेशीर हडप केलेले आदिवासींची जमिनीची चौकशी व्हावी. शासकीय अशासकीय प्रयोजनासाठी अधिग्रहण केलेल्या जमिनीची चौकशी व्हावी.अशी मागणी आदिवासी क्रांती सेना संघटनेच्या माध्यमातून करण्यात आली आहे. सदर आदिवासींची दिशाभूल करून काही दंड दांडग्यांनी दलालांनी तुटपुंजा मोबदला देऊन बेकायदेशीर जमिनी हडप केल्या आहेत त्याचीही निपक्षपातीपणाने चौकशी करून आदिवासी बांधवांना न्याय द्यावा त्यांच्या वारसांना हक्क मिळवून द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. सदर हे आंदोलन आदिवासी क्रांती सेना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भरत जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला आहे. यावेळी पंडित सोनवणे, राजकुमार सोनवणे, प्रवीण मोरे, यांच्यासह आदिवासी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दिग्विजयसिंह यांची टीका

आधुनिक केसरी

सन २०१६ मध्ये भारताने पाकिस्तानातील उरी येथे सर्जिकल स्ट्राइक केला होता; पण याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. या मुद्द्यावरून खोट्या गोष्टी सांगितल्या जात आहेत, असा आरोप काँग्रेस नेते दिग्विजयसिंह यांनी केला आहे. 'केंद्र सरकारने सांगितले की, त्यांनी अनेक दहशतवाद्यांचा खात्मा केला; पण याचा एकही पुरावा उपलब्ध नाही. भाजप हा खोटेपणावर आधारलेला पक्ष आहे. खोट्या गोष्टी सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरविण्याचे काम भाजप करीत आला आहे, असेही दिग्विजयसिंह म्हणाले. जम्मू-काश्मीरमध्ये 'भारत जोडो' यात्रेमध्ये दिग्विजयसिंह बोलत होते. दरम्यान, काँग्रेसचे प्रमुख प्रवक्ते जयराम रमेश यांनी सिंह यांच्या विधानाशी पक्षाचा संबंध नसून, ते सिंह यांचे व्यक्तिगत मत असल्याचे सांगून हात झटकले आहेत. देशहितासाठी २०१४ पूर्वीही लष्करी मोहिमा आखण्यात आल्या असून, भविष्यात अशा कारवाईला पक्षाचा पाठिंबा असेल, असेही ते म्हणाले. दरम्यान, भाजपने दिग्विजयसिंह यांच्या टीकेला उत्तर दिले आहे. भाजपचे प्रवक्ते गौरव भाटिया यांनी त्यांना प्रत्युत्तर दिले आहे. बेजबाबदार वक्तव्य करणे ही काँग्रेस पक्षाची सवय आहे. भारतीय सुरक्षा दलाविरोधात बोललेले कुणीही सहन करणार नाही. नरेंद्र मोदी यांच्याबद्दल मनात द्वेष असल्याने राहुल गांधी आणि दिग्विजयसिंह यांच्यात राष्ट्रप्रेम शिल्लक राहिलेले नाही, असे भाटिया म्हणाले. कार्यक्रमातील टीकेनंतर दिग्विजय यांनी 'ट्विटर'वरही भाजपवर जोरदार टीका केली. 'पुरावे दिल्याचे सांगण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात कोणतेही पुरावे देण्यात आले नाहीत. पुलवामा येथे जवानांच्या वाहनाला लक्ष करण्यात आले. तेथे ३०० किलो आरडीएक्स कोठून आले? या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने नक्की काय केले? दहशतवाद्यांना पकडल्याचे तत्कालीन जम्मू-काश्मीर पोलिसांनी सांगितले. मग कोणत्या दहशतवाद्यांनी हल्ला केला, असे प्रश्न दिग्विजयसिंह यांनी विचारले. भारताच्या पंतप्रधानांची पाकिस्तानसोबतची मैत्री कोणत्या स्वरूपाची आहे, हेदेखील आम्हाला जाणून घ्यायचे आहे, असे दिग्विजयसिंह म्हणाले.

## व्रतस्थ जीवनाचे पुरस्कर्ते



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**नुकतीच गुजरातचे हिरे व्यापारी यांच्या देवांशी संघवी नावाच्या आठ वर्षीय मुलीने संन्यास ग्रहण केल्याची बातमी वाचली, तिने हा संन्यास जैन आचार्य यांच्याकडून घेतला आहे. जे वय लहान मुलांचे खेळण्याचे, बागडण्याचे असते अशा वयामध्ये साध्वी बनण्याचे स्वप्न तिने पाहिले. घरी असलेली संपत्ती, ऐश्वर्य, सोयीसुविधा यांचा त्याग करून तिने संन्यास ग्रहण करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय सोपा नाही. यामध्ये तुम्हाला एकच सूती साडी घालावी लागेल. कुठेही जायचे असल्यास चप्पल न घालता पायी चालावे लागेल. स्वतः करता भूक लागली म्हणून स्वयंपाक करता येणार नाही.**

भिक्षा मागूनच भोजनाची व्यवस्था करावी लागेल. नेहमी खरे बोलणे म्हणजे सत्य, कोणाच्याही वस्तूची लालसा न धरणे म्हणजे अस्तेय, आपल्या इंद्रियांवर संयम ठेवत ब्रह्मचर्याचे कठोर पालन, कुठल्याही जीवाची हिंसा न करणे म्हणजे अहिंसा, कोणाही कडून गरजेपेक्षा जास्त वस्तू न घेणे व आपल्याजवळ संग्रह न करणे म्हणजे अपरिग्रह, इत्यादी गोष्टींचे पालन तिला करावे लागेल. प्रेम, पैसा, करियर, जोडीदाराची अपेक्षा, संसार मूलबाळं इत्यादी सर्व कामनांचा त्याग करून संन्यास स्वीकारणे हे काही साधे काम नाही. भविष्यात गृहस्थाश्रम स्वीकारून ईश्वर भक्ती तिला करता आली असती तरीही त्या मार्गाचा त्याग तिने केलेला आहे. गुरुच्या शिष्यांमध्ये काही पोटार्थी असतात तर काही परमार्थी. काही अभावाने संन्यासी असतात तर काही स्वभावाने संन्यासी. दुसरे काही करता येणे शक्य नाही तशी परिस्थिती ही नाही त्यामुळे संन्यास घेतला असेल तर तो अभावाने सन्यासी होय. व स्वभावाने संन्यासी म्हणजे सर्व प्रकारची सुबत्ता असून सर्व प्रकारचे मार्ग सुलभ असूनही संन्यासाचा मार्ग स्वीकारणे म्हणजे स्वभावाने संन्यासी. आमच्या धर्मामध्ये चार प्रकारचे आश्रम सांगितलेले आहे. ब्रह्मचर्य आश्रम, गृहस्थाश्रम वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम. जीवनाच्या वेगवेगळ्या वयामध्ये काही जबाबदाऱ्या पूर्ण झाल्यावर व काही नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी त्याच्या प्रारंभी वेगवेगळ्या आश्रमांची व्यवस्था करण्यात आलेली होती.त्यातही संन्यास आश्रम होताच. भगवान आद्य शंकराचार्यांनी सुद्धा वयाच्या आठव्या वर्षी संन्यास घेतला होता. केरळ मध्ये कालडी नावाचे त्यांचे गाव होते. अनेक नवसांनी झालेला मुलगा म्हणजे शंकर. एकदा त्यांची आई नदीवर कपडे धूत असताना शंकर नदीमध्ये स्नान करीत होता. त्याच वेळेला एक मगर आली व तिने शंकराचा पाय पकडला. हे पाहून त्यांची आई घाबरली व मोठमोठ्यांनी रडू ओरडू लागली.त्यावेळेस शंकर तिला म्हणाला की तू मला संन्यास घेण्याची परवानगी दिली तर ही मगर माझा पाय सोडेल. पुत्र संन्यासी झाला तरीही चालेल तो जीवित तर राहील ना या आशेने आईने त्यांना तात्काळ संन्यास ग्रहण करण्याची परवानगी दिली व त्यानंतर त्या मगरीने त्यांचा पाय सोडला व शंकर काठावर आले. त्यानंतर त्यांनी संन्यास घेतला. संत ज्ञानेश्वर महाराज यांनी सुद्धा कमी वयातच संन्यास घेतला होता. समर्थ रामदासांनी सुद्धा कमी वयातच चिंता करीतो विश्वाची असे म्हणून संन्यासाचा ध्यास घेतलेला होता. गोंदवलेकर महाराज सुद्धा वयाच्या आठव्या वर्षी गुरुच्या शोधात घरातून बाहेर पडले होते. स्वामी विवेकानंदांचे उदाहरण सुद्धा आपल्याला माहीतच आहे. घरी वडिलांचे निधन झालेले, विवाहित बहिणीने आत्महत्या केलेली, नातलगांनी त्यांना राहत्या घरातून बाहेर काढण्यासाठी त्यांच्यावर कोर्ट केसेस टाकलेल्या होत्या. अशा परिस्थितीत घरी खाण्यापिण्याचीही ददातच होती. अशा परिस्थितीत सुद्धा स्वामीजींचा ईश्वर प्राप्तीचा ओढा काही कमी होत नव्हता. त्यांचे वरचेवर दक्षिणेश्वरी जाणे सुरूच होते. ज्यावेळेस रामकृष्ण परमहंसांना प्रकृती अस्वास्थामुळे काशीपूरच्या उद्यानात ठेवण्यात आले होते.त्यावेळेस मात्र नरेंद्रनाथ आपले घर सोडून तेथे जाऊन राहू लागले. घरच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्या करीता काही काळ त्यांनी नोकरी ही केली. परंतु रामकृष्ण परामहंसानी त्यांना सांगितले की नरेंद्रनाथा तुझा जन्म नोकरी, संसार करण्यासाठी नाही. गुरुची आज्ञा शिरोधार्य मानून त्यांनी ही संन्यास घेतला व संपूर्ण जगात भारताचे नाव प्रसिद्ध केले. भारतातील संन्यास आश्रम हा संपूर्ण जगाकर्ताच कुतूहलाचा विषय राहिलेला आहे म्हणूनच की काय रशियन राष्ट्राध्यक्षाची मुलगी सुद्धा भारतामध्ये गंगेच्या किनारी येऊन राहिली व तिनेही संन्यास ग्रहण केला. स्वामी विवेकानंदाच्या भगिनी निवेदिता सारख्या अनेक शिष्या या त्यांच्या त्यागी जीवनाकडे पाहून आकर्षित होऊन भारतात येऊन संन्यस्त झाल्या. भारताला ऋषीमुनींची व संन्यासाची फार मोठी परंपरा लाभलेली आहे. कुंभमेळ्यात सुद्धा आपल्याला अनेक उच्चशिक्षित तरुण संन्यासी दिसतात. काही वर्षांपूर्वी एका अशा संन्यासाला भेटण्याचा मला योग आला त्यांनी मौनव्रत धारण केलेले होते. त्यांच्यासोबतचे संभाषण हे पाटीवर त्यांनी लिहून दिलेल्या वाक्यांवरून कळत होते. त्यांनी मला विचारले कि तुम्ही काय शिकलेले आहात व काय करता मी माझी माहिती त्यांना लिहून दाखविली. त्यावर ते म्हणाले अरे वा माझेही मेकॅनिकल इंजिनिअरिंग चे शिक्षण झालेले आहे व मी मुंबई येथील व्ही जे टी आय या कॉलेजमध्ये प्राध्यापक होतो. ही माहिती जाणून घेतल्यावर कुठल्याही माणसाला आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. इतके मोठे शिक्षण घेतल्यावरही व सर्वसामान्यांना मोहविणारी नोकरी असतानाही हे व्यक्ती संन्यास कसे काय घेऊ शकतात.





राष्ट्राच्या परंवैभवाचे स्वप्न घेऊन प्रचारक म्हणून काम करणारे तरुणही याच संन्यस्त जीवनाची आकांक्षा मनात धारण केलेले असतात.रामकृष्ण मठ, स्वामी नारायण परिवारातील सन्यास घेतलेले तरुणही याच संन्यस्त जीवनाची आकांक्षा बाळगणारे असतात. परंतु आजच्या भौतिकवादी युगात सुद्धा जर तरुण पिढी संन्यासाचा मार्ग स्वीकारत असेल तर त्याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. कदाचित भौतिकवादातील फोलपणा त्यांच्या लक्षात लवकरच येत असेल.सन्यास ही आमची परंपरा आहे. शिकागो च्या सर्वधर्मपरिषदेत स्वतःचा परिचय देतांना स्वामी विवेकानंद म्हणतात "लाखो वर्ष जुन्या सन्यासी परंपरेचा प्रतिनिधी म्हणून मी तुमच्या समोर उभा आहे." आजच्या भौतिकवादी जगात सुद्धा त्यागाचे आकर्षण कायम आहे. वयाच्या आठव्या वर्षी सन्यास घेणारी देवांशी व तिला अनुमती देणारे तिचे पालक दोघेही अभिनंदनीय आहेत. भारताच्या जिवंत पणाचे प्रतीक आहेत.

## काय आहे G-20 परिषद ?



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**G- 20 संघटनेचे यजमानपद यंदा आपल्या भारत देशाकडे आले आहे. 1 डिसेंबर 2022 ते 30 नोव्हेंबर 2023 या वर्षात G- 20 समूहाचे यजमानपद भारताकडे आहे. या काळात मुंबई, दिल्ली, कलकत्ता, बंगलोर ,चेन्नई, गुहाटी, पुणे, सुरत, उदयपूर, जोधपूर, चंदिगड, त्रिवेंद्रम लखनऊ, खजुराहो, अशा पंधरा विविध शहरात यांच्या सभा आयोजित केल्या जाणार आहेत. 16 जानेवारी 2023 रोजी पुणे येथे G- 20 देशातील पायाभूत सुविधा या विषयावर चर्चा क्षेत्र आयोजीत केली होती.**

नऊ आणि दहा सप्टेंबर 2023 रोजी त्यांची शेवटची समारोप आहे बैठक नवी दिल्ली येथे होणार आहे. दिनांक 16 जानेवारी रोजी G- 20 अंतर्गत पायाभूत सुविधा कार्य गटाची पहिली बैठक संपन्न झाली.

या बैठकीला 18 सदस्य देश व आठ अतिथी देश आणि आठ आंतरराष्ट्रीय संघटनांचे 64 प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत 2023 या वर्षासाठी पायाभूत सुविधा कार्यक्रमावर चर्चा करण्यात आली . या सर्वांच्या द्वारे आपल्या भारतातील विविध क्षेत्रात जी उपलब्धी आहे आणि विकास आहे त्याचे दर्शन जागतिक पातळीवर घडवण्याची या निमित्ताने संधी प्राप्त झाली आहे .आणि त्याचा आपल्या देशाला नक्कीच मोठा फायदा होणार आहे.

परीषदेचे उद्घाटन केंद्रीय मंत्री. नारायण राणे यांचे हस्ते झाले. मुंबई ही जरी भारताची आर्थिक राजधानी असली तरी त्या पाठोपाठ आता पुणे शहर देखील भारताची आर्थिक व औद्योगिक राजधानी म्हणून पुढे आणण्याची तयारी परिषदेच्या माध्यमातून भारत सरकार करीत असल्याची माहिती यावेळी केंद्रीय अवजड उद्योग मंत्री नारायण राणे यांनी पुणे येथे दिली. सेनापती बाबत रोडवरील हॉटेल मेरीयट मध्ये G -20 परिषदेचे उद्घाटन झाले तेव्हा ते बोललेत.

G- 20 परिषदेच्या माध्यमातून राज्याला काय फायदा होणार आहे ह्याविषयी बोलताना ते म्हणाले की याचे दुरगामी परिणाम पाहायला मिळतील. G- 20 परिषदेचे सदस्य देश आणि त्यांचे प्रतिनिधी आपल्या देशाविषयी चांगल्या गोष्टी समजावून घेऊन, सांगून त्यांचे उद्योजकांना आपल्याकडे गुंतवण्यासाठी प्रोत्साहित करतील 2014 वर्षांत भारत दहाव्या क्रमांकावर होता परंतु सध्या तो पाचव्या क्रमांकावर आहे.

G,- 20 विषयी अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो की G- 20 म्हणजे काय?

G- 20 जगातील वीस देशाचे संघटन आहे. 1999 मध्ये या संघटनेची स्थापना झाली या संघटनेत ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, इंडोनेशिया, इटली, जपान, मेक्सिको, दक्षिण कोरिया, सौदी अरेबिया, रशिया, दक्षिण आफ्रिका, तुर्कस्तान, भारत, अर्जेंटिना ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेट्स, या देशांचा समावेश आहे

यावर्षी G- 20 संघटनेचे अध्यक्षपद भारताकडे आहे व "वसुधैव कुटुंबकम" संपूर्ण जग हे कुटुंब आहे ही मध्यवर्ती कल्पना असून त्याच्यावर आधारित अजेंडा आपल्या देशाने तयार केला आहे. कोरोनाच्या महामारीतून सावरताना अर्थव्यवस्था विस्कटलेली आहे प्रदूषण, पर्यावरण, तसेच हवामान बदल, इत्यादी, जागतिक समस्यांचा सामना करताना भारताने हा अजेंडा ठरवला आहे. तो जगाला लाभदायक ठरेल अशी अपेक्षा केली आहे .G- 20 च्या निमित्ताने अनेक देश यात सहभागी होत असतात आणि त्यामुळे एकाच व्यासपीठावर जागतिक संवादाची संधी G- 20 च्या निमित्ताने सर्वांना मिळते. या यादीवर नजर टाकली तर आपल्या असे लक्षात येते की संपूर्ण जगावर आर्थिक आणि सामाजिक राजकीय प्रभाव पाडण्याची क्षमता या G-20 गटामध्ये आहे.

2008 मध्ये आलेल्या जागतिक मंदीनंतर या संघटनेची व्याप्ती वाढवली गेली. आणि सदस्य देशांचे प्रमुख या परिषदेत सहभागी होऊ लागले. जागतिक पातळीवर येणाऱ्या संकटाची आणि त्यातून मार्ग काढण्याची चर्चा यामध्ये होते तसेच क्षमताही आहे, त्या दृष्टीने हे संवादाचे सक्षम असे व्यासपीठ म्हणून ही G- 20 परिषद ओळखली जाऊ लागली.

संयुक्त राष्ट्राचे जसे न्यूयॉर्क येथे एक कार्यालय आहे. परंतु येणाऱ्या परिषदेचे कायमस्वरूपी असे कार्यालय किंवा सचिवालय नाही याचा अजेंडा आणि समन्वय साधण्याचे काम G- 20 देशांचे प्रतिनिधी करतात त्यांना शेरपा म्हणून ओळखले जाते. दरवर्षी एका देशाकडे G-20 चे अध्यक्षपद येते यालाच G-20 प्रेसिडेन्सी असे म्हणतात. प्रत्येक प्रेसिडेंट प्रत्येक प्रेसिडेन्सी च्या शेवटी G-20 राष्ट्रगटाची बैठक होते आणि पुढील कारभार त्या देशाचे अध्यक्ष ही G-20 चे विद्यमान अध्यक्ष आधीच्या आणि पुढचे अध्यक्ष यांच्या राष्ट्राच्या मदतीने कारभार चालवतात. जगातली 60 टक्के लोकसंख्या G- 20 राष्ट्रांमध्ये राहते तसेच जगाच्या एकूण जीडीपीच्या 85 टक्के जीडीपी या देशातून येत असतो तसेच जागतिक व्यापार पेठेत 75 टक्के होऊन अधिक व्यापार जी 20 देशात एकवटला आहे आणि त्यामुळेच या राष्ट्रगटाला महत्त्व आहे. जी 20 हे G- 7 या औद्योगिक देशांच्या राष्ट्र गटाचे विस्तारित रूप आहे असे समजण्यात येते. विकसनशील आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना सामावून घेऊन जगाच्या अर्थव्यवस्थेला स्थिरता यावी हा या गटाचा उद्देश आहे.

देशातील विविध उद्योगाच्या तसेच इतर गोष्टींचा विकासासाठी त्या त्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य आवश्यक असते त्या दृष्टीने या देशांच्या परिषदेतून असे सहकार्य मिळवता येणे किंवा मिळणे हे सुद्धा अंतर्भूत आहे. विकासाच्या दृष्टीने अनेक करारनामे आंतरराष्ट्रीय पातळीवर होत असतात त्यासाठी सकारात्मक वातावरण निर्मिती सुद्धा या परिषदेच्या बैठकांमधून तयार होऊ शकते. व इथल्या परीषदेचा आढावा घेऊन अनेक उद्योगधंदे आपल्याकडे येऊ शकतात हे महत्त्वाचे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# माझा सन्मान भारतीय संविधानात आहे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**देशामध्ये सर्वोच्च आहे ते भारतीय संविधान. आणि त्या सर्वोच्च भारतीय संविधानाने माझा सन्मान हा सर्वोच्च केला आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे. संविधानाच्या अगोदर मला (बहुजन समाजाला) शिकण्याचा अधिकार नव्हता, बोलण्याचा, मत व्यक्त करण्याचा अधिकार नव्हता, सार्वजनिक ठिकाणी वावरण्याचा, उच्चपदावर जाण्याचा, उच्च पदस्थ लोकांसोबत राहण्याचा, सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा, होणाऱ्या अन्याया विरोधात आवाज उठवण्याचा, चांगले कपडे घालून गावभर मिरवण्याचा, एवढेच काय पण माणूस असूनही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नव्हता. परंतु संविधानाने ते सर्व अधिकार मला बहाल केले आणि मी धन्य झालो. जागतिक सन्मान मिळवून देऊन संविधानाने मला माणूस बनवले आणि माझा सन्मान केला.**

याच सन्मानामुळे आज मी शिकु शकतो, बोलु शकतो, मत मांडू शकतो, सर्वोच्च पदावर विराजमान होऊ शकतो, सार्वजनिक ठिकाणी जाऊन मी तोऱ्यात राहु शकतो, माझे मत मांडण्यासाठी मी निशस्त्र सभा घेऊ शकतो एवढा आदर सन्मान मला भारतीय संविधानाने दिला. आणि मी धन्य झालो. हजारो वर्षांपासून माझ्या पिढ्या अंधविश्वास, पाखंड, विषमता, भेदभाव, एकाच वर्णाचे वर्चस्व प्रस्थापित रहावे म्हणून त्यांना अज्ञानी आणि निरक्षर ठेऊन गुलाम बनवून ठेवले. आणि संविधानाने बघा माझ्या पिढ्या हजारो वर्षांपासून गुलाम असुन सुद्धां, ज्यांना वरच्या आवाजात बोलणे सोडा वर डोळ्यात डोळे घालून पाहिले तर पाप मानले जायचे परंतु संविधानाने मला देशाची सत्ता बनवण्याचा आणि देशाची सत्ता कोणाच्या हातात असेल हे ठरविण्याचा हक्क बहाल केला आणि इतिहास बदलून टाकला. व माझा जागतिक सन्मान केला. संविधानाने केलेल्या सन्मानाची सर दुसऱ्या कोणत्याही सन्मानात नाही. आज अनेक लोक हार, तुरे, व बेगडी सन्मानासाठी समाजामध्ये वर्चस्व गाजवून मी हार तुऱ्याच्या लायक कसा आहे असे दाखवण्याचा प्रयत्न करतात. संविधानाने दिलेल्या हक्क अधिकार न समजलेले लोक समाजाच्या हक्क अधिकाराच्या गोष्टी करतात. अर्थात सामाजिक काम करणाऱ्या सर्वच लोकांना वरील बाब लागु होत नाही. काही काही लोक समाजात जाऊन, समाजात राहून समाजाला अपेक्षित समाजकारण करतात. परंतु बरेचसे लोक समाजकारणाच्या आडून स्वतः ची प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न करतात. समाजातील लोकांनी कोणत्याही सामाजिक कार्यक्रमांमध्ये बोलवावे, हार तुरे देऊन दोन शब्द स्तुती करावी, हाती माईक देऊन बोलण्याची विनंती करावी, म्हणजे स्वतः ची जाहिरात करायला मोकळे, आणि बऱ्याच लोकांना तर समाजकारणाच्या माध्यमातून हारतुरे, मानसन्मान, स्वतःची जाहिरात आणि वेळ प्रसंगी वेगवेगळ्या माध्यमातून आर्थिक लाभ मिळेल अशी लालसा असते म्हणून ते खटाटोप करत असतात. एखाद्या ठिकाणी त्यांचा माणसन्मान नाही झाला तर त्यांचे मन दुखते, वाईट वाटते, त्यांचे मनोमन खच्चीकरण होते, ईगो दुखावल्या जातो, आणि त्यांच्या मनात भावना येतात मी इतके समाजासाठी करतो पण समाजाला त्याचे काही घेणे देणे नाही असे बोलुन समाजकार्याकडे दुर्लक्षित करणाऱ्यांना लोकांची संख्या कमी नाही. आता येथे दोन गोष्टी लक्षात घेण्यासारख्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे मी समाजासाठी किती करतो पण समाजाला त्याच घेण देण नाही, थोडक्यात काय तर मी समाज हीताचे काम करतो तरीही समाज माझ्या वर लक्ष देत नाही अशी भावना अनेक लोकांच्या मनात निर्माण होते. मग एक प्रश्न समोर येतो, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला सुधारण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले, चार मुले गमावली, बायको गमावली परंतु समाजाच्या कल्याणासाठी झटत राहिले. कोणत्याही मानापानाची अपेक्षा न करता अहोरात्र समाजहीताचा विचार करून समाजामध्ये उर्जा, प्रेरणा, स्वाभिमान, तर्क, व प्रामाणिक पणा निर्माण करून माणूस बनवले. एवढे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केले असताना आपण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालतो का? डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले ते ऐकतो का? त्यांना अपेक्षित समाजकार्य आपण करतो का? या प्रश्नांची उत्तरे स्वतः च स्वतः ला विचारले तर स्वतः चेच तोंड बंद होईल कारण स्वतः च डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांचे पालन करत नाही, तर मग समाज का तुमचे ऐकेल? का तुमचा मानसन्मान वाढवेल? दुसरी गोष्ट सामाजिक मान सन्मान नाही मिळाला तर समाज कार्या पासून दुर होण्याचा प्रयत्न करत असतात. म्हणजे आपण फक्त हारतुरे, मानसन्मान, आणि प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आर्थिक मिळकत याला समाज कार्य म्हणायचे का? बर एखाद्या ठिकाणी मानसन्मान नाही मिळाला तर समाजकार्य पासून दुर जाणे हा उपाय आहे का? भाजीमध्ये मिठ कमी झाले किंवा चपाती करपली म्हणून आपण उपाशी राहत नाही. म्हणून सामाजिक कार्यातील हारतुरे यामुळे जिवनात काय बदल होणार? समाजकार्यापासून दुर गेले तर हारतुरे मिळणार का असे प्रश्न विचारले तर उत्तरं नाहीच नसतात. समाजकार्य करताना हारतुरे, मानसन्मानाची अपेक्षा करता परंतु ज्या संविधानाने सर्वोच्च सन्मान करून दिला त्यापेक्षा महत्वाचे हारतुरे आहेत की, संविधानाने दिलेले हक्क अधिकार आणि न्याय समाजाला देणे महत्त्वाचे आहे. फक्त हार तुरे, मानसन्मान या नंतर समाजकार्य असेल तर ते काम समाजाचे नसुन स्वार्थाचे असते. आणि स्वार्थी लोकांना समाजात कधीच मानसन्मान मिळत नाही. स्वार्थी लोकांच्या अवतीभवती गर्दी भरपूर दिसेल परंतु विचार आणि आचार दिसणार नाहीत. स्वार्थी लोकांचे आयुष्य जास्त नसते याचा धडा जर आपण इतिहासाकडून घेतलाच नाही आणि स्वतः चे मत परिवर्तन केलेच नाही तर आपल्या शिक्षणाचा काय फायदा. स्वार्थी लोकांनी, ज्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मताचा अधिकार मिळवून दिला परंतु त्याच लोकांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना निवडणुकी मध्ये पाडले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर निवडणूक हारले पण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी निवडणूक स्वतः च्या स्वार्थासाठी लढली नव्हती. म्हणून निवडणूक जिंकुन सुद्धां आयुष्य हरणारे लोक येथे आहेत, आणि जे निवडणूक जिंकले होते त्यांचे नामोनिशाण समाजाने मिटवून टाकले. परंतु निस्वार्थ आणि देशहिताचे कार्य करुन समाजहीत जपणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे देशाचे खरे शिल्पकार ठरले.





समाजकार्याच्या आडून स्वहीत, वैयक्तिक प्रसिद्धी बघणारे, लोक हारतुरे आणि मानसन्मानाची अपेक्षा करतात. कोणत्याही कार्याला सुरवात करण्या अगोदरच हारतुरे आणि मानसन्मान इगोमुळे कामाला चांगली सुरवात होत नाही. हारतुऱ्या साठी समाजकार्याची झुल चढवलेले लोक जिवनाचे अंतिम सत्य नाकारतात, ज्यांना जिवनाचे अंतिम सत्याची जाणीव नाही ते समाजकार्य वा जनकल्याणाचे काम कसे करणार. जिवनाचे अंतिम सत्य हे आहे की ज्याला आपण जन्म देऊन लहानाचे मोठे करतो. आणि मोठे करताना एखादी इच्छा जरी आपल्याच मुलाची पुर्ण केली नाही तर स्वतः चा मुलगा बापाला म्हणतो तुम्ही माझ्या साठी काहीच केले नाही. आणि तो मुलगा बापाला घरात किंमत देत नाही, जर स्वतः चा मुलगा बापाला किंमत किंवा आदर देत नसेल तर समाजासाठी काहीही न करता, किंवा समाजाच्या नावावर स्वतः ची पोळी भाजुन घेतांना समजातुनच हारतुरे मिळण्याची अपेक्षा गौन आहे. हारतुरे, मानसन्मानाची हाव असणाऱ्याने विचार करायला पाहिजे मानसन्मान वैयक्तिक व्हायला पाहिजे की कार्याचा व्हायला पाहिजे. जर वैयक्तिक मानसन्मान पाहिजे असेल तर घरातील, नात्यातील लोकांनी जरी मानसन्मान नाही दिला तरी संविधानाने मानसन्मान दिलेला आहे. आणि तोच सर्वोच्च आहे. राहीला प्रश्न कार्याचा सन्मान व्हायला पाहिजे. जर कार्याचा सन्मान व्हायला पाहिजे तर वैयक्तिक लाभाच्या मागे कशाला लागायचे. सामाजिक काम करताना एखाद्या संघटनेमध्ये वा एखाद्या मोहीमेमध्ये पद मिळाले तर काम करेल अशी भुमिका असेल तर त्याला सामाजिक व निस्वार्थी काम कसे म्हणायचे. आणि पद नाही मिळाले तर मी स्वतः चा गट तयार करून स्वतः चे वर्चस्व दाखवून देण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असेल तर हे वैयक्तिक लाभ, व हारतुरे कार्यक्रम आहे, समाजहीताचा नाही. सामाजिक कार्य किंवा जनकल्याणाचे काम करताना कोणत्याही पदाचा, मानासन्मानाचा मोह न करता काम करत रहावे. जेव्हा लोकांना कामाची महती, व्यक्तीचा प्रामाणिक पणा व निस्वार्थ भाव दिसेल तेव्हा मात्र कोणत्याही कार्याचा गौरव केला जातो. कोणत्याही प्रकारचे पद, मानसन्मान माघुन मिळत नसते तर तो कतृत्वावर मिळत असते. आणि आपण समाजाचे काम करत आहोत तर त्याचा मानसन्मान करायचा की नाही हे जनता ठरवेल, आपण स्वतः च मानसन्मान माघणे म्हणजे स्वतः ची प्रतिष्ठा स्वतः च कमी करणे होय. जनता मानसन्मान सर्व काही देते परंतु काम हे निस्वार्थ, प्रामाणिक आणि समाजहिताचे पाहिजे. तेव्हा कार्याचा गौरव होऊन सामाजिक मान प्रतिष्ठाही मिळते. म्हणून माणसाने नेहमी सकारात्मक व पद, लोभ, मानसन्मानाची अपेक्षा न करता प्रयत्नशील रहावे. कारण सर्वात मोठा सन्मान हा संविधानाने केलेला आहेच. आणि तो माझा सन्मान एवढा मोठा आहे की मला हार तुरे मिळाले काय आणि नाही मिळाले काय संविधानाने केलेल्या सन्मानावर काहीही फरक पडत नाही. समाज गटबाजी, द्वेष व स्वहीत बढणाऱ्या लोकांना कंटाळली आहे. म्हणून आपण जनतेच्या हितासाठी, विकासासाठी, सामाजिक समस्येवर उपाय शोधण्यासाठी एकत्र यायलाच पाहिजे. सामाजिक करायचेच तर काम करत रहायचे पद प्रतिष्ठा माघुन मिळत नसेल कामामध्ये आडकाठी न आणता गपचूप घरात बसले तर पद प्रतिष्टेचा विचार न करणारे लोक चांगल्या प्रकारे काम करू शकतील. म्हणून निस्वार्थ आणि प्रामाणिक पणे आपण आपले काम करत रहायचे. काम चांगले असेल तर कामाचा सन्मान होईल. राहीला प्रश्न माझ्या सन्मानाचा तो सन्मान संविधानामध्ये आहे. फक्त तो कायम सुरक्षित रहावा यासाठी तरी मला मी जिवंत असल्याचा पुरावा म्हणजे अन्याया विरूद्ध आवाज उठवावा लागेल.

# नेताजी : भारताचे तेजोमय क्रांतिकारी योध्दा



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**भारत स्वातंत्र्य करण्यासाठी देशात दोन नद्यांचा उगम झाला.एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच 15 ऑगस्ट1947 ला भारत स्वतंत्र झाला.23 जानेवारी 1897 ला ओडिसा मधील कटक शहरात जन्माला आलेले नेताजी भारतासाठी चमकता तारा सिध्द झाले व स्वतंत्र भारतासाठी महान योध्दा म्हणून उदयास आले.नेताजींनी 15 वर्षाच्या वयातच स्वामी विवेकानंदांचे सर्व साहित्य वाचून काढले व देश निर्माण करण्याची ज्वाला प्रज्वलित झाली आणि देश स्वतंत्र करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी संघर्षाला सुरुवात केली.**

कोलकत्यातील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक देशबंधू चित्तरंजन दास यांच्या कार्याने नेताजी प्रभावीत झाले व त्यांच्या सोबत काम करायला सुरुवात केली.20 जुलै 1921 रोजी महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले.यावेळी गांधींजींनीसुध्दा नेताजींना दासबाबू सोबत काम करण्याचा सल्ला दिला.कारण चित्तरंजन दास हे बंगाली वकील व भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी पुढारी होते.त्यामुळे त्यांना देशबंधू असे संबोधले जात असे.1925 साली इंग्रजांच्या लक्षात आले की नेताजी क्रांतीकारकांशी संबंध ठेवतात व क्रांतीकारकांचे स्फुर्तीस्थान असल्याचे त्यांच्या लक्षात आले.ह्या कारणास्तव इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना अटक केली व कोणताही खटला न चालवीता त्यांना अनिश्चित काळासाठी म्यांमारच्या कारागृहात बंदिस्त केले. नेताजींचा संपूर्ण प्रवास अत्यंत संघर्षमय रहाला. कारण त्यांच्या व सहकाऱ्यांच्या रक्ताता-रक्तात स्वातंत्र्याची ज्वाला भडकत होती. त्यांचे एकच स्वप्न होते ते म्हणजे भारत स्वतंत्र करणे यासाठीच त्यांनी विदेशी वारी करून इंग्रजाच्या दुश्मन राष्ट्रांशी हातमिळवणी करून भारतीय संघर्षाचा मोठा लढा आझाद हिंद सेनेच्या नेतृत्वात उभा केला.तेव्हाच 15 ऑगस्ट 1947 ला तिरंगा उदयास आला. कारण इंग्रजांना देशातून पळवून लावण्यात आझाद हिंद सेनेचा मोठा वाटा आहे. आझाद हिंद सेनेची स्थापना पहिल्यांदा 29 आक्टोंबर 1915 लाख राजा महेंद्र प्रताप सिगं यांनी केली.त्यावेळी आझाद हिंद सरकारची सेना म्हणून ओळखली जायची.यांचा उद्देश भारताला इंग्रजांपासुन स्वतंत्र करने.जेव्हा दक्षिण-पूर्वी एशियामध्ये जापानच्या सहयोगाने नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी 40 हजार भारतीय स्त्री-पुरूषांना प्रशिक्षीत करून सेनेत सहभागी केले त्याला सुद्धा आझाद हिंद फौज असे नाव देण्यात आल्यानंतर सुभाषचंद्र बोस यांना आझाद हिंद सेनेचा सर्वोच्च कमाण्डर नियुक्त केल्यानंतर आझाद हिंद सेनेची संपूर्ण कमान नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सोपविण्यात आली आणि सुभाषचंद्र बोस यांचा क्रांतीकारी लढा सुरू झाला.नेताजी 1933 पासून 1936 पर्यंत युरोपमध्ये रहाले.तो काळ जर्मनच्या हिटलरचा नाझीवाद आणि इटलीचे नेते मुसोलिनीचा फासीस्टवाद असा होता.यांनी भारताच्या



स्वातंत्र्यलढ्यात सर्वतोपरी मदत करण्याचे वचन दिले.कारण या दोघांच्या निशाण्यावर इंग्लंड हाच देश होता.कारण इंग्लंडचे जगाच्या 75 टक्के देशावर अधिपत्य होते.त्यामुळे इंग्लंडचा जगावर अतीरेक वाढत होता.कारण इंग्लंडने पहिल्या विश्व युध्दानंतर जर्मनीवर एकतर्फी करार लादण्यात आले होते.त्याचाच बदला जर्मनी इंग्लंड कडून घेणार होता.भारतावरसुध्दा इंग्रजांचे राज्य होते.त्यामुळे याच संधीचा फायदा घेण्याचे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी मनात ठानले व नेताजींनी हिटलर व मुसोलिनी यांच्याशी हातमिळवणी केली.1943 मध्ये त्यांनी जर्मनीला सोडून ते जापानला जाऊन पोहोचले.जापानचे प्रधानमंत्री जनरल हिदेकी तोजो यांनी त्यांना सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. जापानमधून सिंगापूरला गेले.वयोवृध्द क्रांतीकारी रासबिहारी बोस ह्यांनी सिंगापूर येथील "फेरर पार्कमध्ये भारतीय स्वातंत्र्य परिषदेचे नेतृत्व सुभाषबाबूंकडे सोपवीले.त्याचप्रमाणे सिंगापूर इथे कॅप्टन मोहन सिंग व्दारा स्थापित "आझाद हिंद सेनेची"कमान आपल्या हाती घेतली.भारताला स्वतंत्र करण्यासाठी आझाद हिंद सरकारची स्थापना केली.तसेच "आझाद हिंद सेना" गठीत केली.या संघाचे प्रतीक चिन्ह असलेल्या झेंड्यावर डरकाळी मारणाऱ्या वाघाचे चित्र होते.कारण नेताजींची संपूर्ण कार्यशैली वाघासारखीच होती. आझाद हिंद सेनेने 18 मार्च 1944 रोजी भारतभूमीत प्रवेश केला व माऊडॉक येथे त्यांनी भारताचा तिरंगा फडकावला. नेताजी 4 जुलै 1944 ला बर्मा पोहचले.इथुनच त्यांनी भारतीयांसाठी नारा दिला " तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दुंगा".1939 ला गांधी विचारधारेला हरवुन नेताजींची कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली.यावर महात्मा गांधी म्हणाले की सुभाषचंद्र बोस यांचा विजय व माझा पराजय आहे.गांधीजींच्या या वक्तव्याने व विचारांमुळे सुभाषचंद्र बोस यांचे मन दुःखावले व स्वतःहुन कॉंग्रेस सोडली. कारण महात्मा गांधी मवाळवादी तर सुभाषचंद्र बोस जहालवादी विचारांचे होते.परंतु दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता.1944 मध्ये अमेरिकन पत्रकार लुई फिशर ह्यांच्याशी चर्चा करतांना महात्मा गांधींनी नेताजींना "देशभक्तांचा देशभक्त" असा उल्लेख केला होता. तर 4 जुन 1944 ला सिंगापूरवरून एक संदेश देतांना सुभाषचंद्र बोस यांनी महात्मा गांधी यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणुन संबोधले तेव्हा पासून महात्मा गांधींना राष्ट्रपिता संबोधल्या जावु लागले.त्यामुळे महात्मा गांधींनी अहिंसेचा मार्ग अवलंबला तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी क्रांतीकारीचा मार्ग अवलंबला. दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता. त्यामुळेच 15 ऑगस्ट1947 ला भारत स्वतंत्र झाला.18 ऑगस्ट 1945 ला भारतासाठी दुःखद समाचार आला नेताजी सुभाषचंद्र बोस टोकियोला जातांना तैवान जवळ हवाई दुर्घटने दरम्यान नेताजींचा मृत्यू झाला व त्यांचे स्वप्न अधुरे रहाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. परंतु त्यांचे मृत शरीर अजुनही मिळाले नाही.म्हणुनच नेताजींच्या मृत्युच्या कारणांवर आज देखील विवाद सुरू असल्याचे दिसून येते.आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी आपली वाममार्गाने कमवीलेली संपूर्ण धनसंपत्ती देशहितासाठी स्वखुशीने खर्च केली तर ही खरी देशभक्ती ठरेल व नेताजींना खरी आदरांजली समजल्या जाईल.आजच्या युवा पिढीमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे आचार-विचार जागृत होने गरजेचे आहे.कारण देश निर्माण,देशाची प्रगती,देशाचा विकास नेताजींच्या विचारांनीच जलदगतीने पुढे जावु शकतो.त्याच बरोबर मी देशवासियांना आग्रह करेल की नेताजींच्या126 व्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावावेत व देशात 126 कोटी वृक्ष एकाच दिवशी लावण्याचा संकल्प जनतेनी व सरकारनी घ्यावा.यामुळे संपूर्ण भारत निसर्ग रम्य होवून प्रदूषणावर मात करण्यात आपण यशस्वी होवू.सुभाषचंद्र बोस यांच्या 126 व्या जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम!जय हिंद!

# नेताजी-क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान

आधुनिक केसरी

*(मागील अंकावरून)*

25 ऑक्टोबर, 1924 रोजी कोणतेही कारण न देता सुभाषचंद्र बोस यांना अटक करून अलिपूरच्या कारागृहात डांबण्यात आले. दहशतवादाला प्रोत्साहन देत असल्याचा संशय त्यांच्यावर व्यक्त करण्यात आला.



भारत बल्हाळ
संपर्क क्र. 7588819471

अलिपूर, बेहरामपूर आणि कोलकाता येथील कारागृहात दोन वर्षे ठेवून 25 जानेवारी, 1925 रोजी सुभाषबाबूंना मंडालेच्या तुरुंगात पाठविण्यात आले. सुभाषबाबू तुरुगांत असताना बाहेर बंगाल प्रांताच्या कायदेमंळाच्या निवडणुकीत लोकांनी त्यांना निवडून दिले. मंडालेच्या तुरुंगातील रोगट व क्लेशदायक वातावरणामुळे सुभाषबाबूंना ब्रांकोनिमोनियासारखा भयंकर आजार झाला. संपूर्ण बंगाल प्रांतात त्यांच्या सुटकेची मागणी होऊ लागली.

संपूर्ण देशभरात ब्रिटिश शासनाच्या विरोधात जनक्षोभ उफाळून येत आहे, हे पाहून ब्रिटिश शासनाने 16 मे 1927 रोजी सुभाषबाबूंची बिनशर्त मुक्तता केली. बंगालसह संपूर्ण देशात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. सुभाषबाबूंचे सर्वत्र स्वागत झाले. सुभाषबाबू तुरुंगात असतानाच देशबंधू चित्तरंजनदास यांचे निधन झाले होते. त्यांच्या मृत्यूने बंगाल प्रांतात निर्माण झालेली पोकळी फक्त सुभाषबाबूच भरून काढू शकणार होते. बंगाली जनतेने त्यांना बंगाल प्रांतिक परिषदेचे अध्यक्षपद बहाल केले. सर्व देश त्यांच्या उदयोन्मुख नेतृत्वाकडे आशेने पाहत होता. मद्रास येथे 1928 मध्ये भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात सुभाषबाबूंना काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून निवडण्यात आले. त्याच वर्षी सुभाषबाबूंनी पं. जवाहरलाल नेहरूंसोबत 'इंडिया इंडिपेन्डन्स युथ लीग' ही युवकांची संस्था स्थापन केली. महाराष्ट्रासह अनेक प्रांतांच्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्षपद सुभाषचंद्र बोस यांना मिळाले होते. त्यांची लोकप्रियता सतत वाढत होती.

1928 साली कोलकाता येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. यात अध्यक्ष मोतीलालजी नेहरू यांनी वसाहतीच्या स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मांडला. त्या ठरावाला सुभाषचंद्र बोस आणि पं. नेहरू यांनी विरोध दर्शविला. त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मांडण्याचा आग्रह धरला; परंतु त्यांचा ठराव फेटाळला गेला. पुढे 1929 मध्ये लाहोर येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद जवाहरलाल नेहरूंना देण्यात आले. त्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्याचा ठराव मान्य करण्यात आला. या अधिवेशनातील भाषणात सुभाषबाबूंनी संपूर्ण बहिष्काराची कल्पना मांडली. ती मागणी अधिक जहाल ठरवून नाकारण्यात आली.

26 जानेवारी, 1930 हा स्वातंत्र्यदिन म्हणून पाळला जावा, असेही राष्ट्रीय सभेने ठरविले. त्या दिवशी संपूर्ण स्वातंत्र्याचा जयजयकार होणार होता. सुभाषबाबूने त्यापूर्वीच प्रतिसरकारच्या स्थापनेचीही कल्पना मांडली होती. त्यांच्या जहाल विचारांचा धसका घेतलेल्या इंग्रज सरकारने त्यांना नियोजित कार्यक्रमाच्या अगोदरच अटक केली आणि अलिपूरच्या तुरुंगात त्यांची रवानगी केली. तिथे त्यांच्यावर एका वार्डरने दंडुक्याने प्रहार केला. संपूर्ण देशभर त्याचा निषेध नोंदविण्यात आला. जनतेने सुभाषबाबूंना कोलकाता महानगरपालिकेच्या महापौरपदी निवडून दिले. महापौरपदावरून त्यांनी जनतेची निःस्वार्थ सेवा केली. 26 जानेवारी, 1931 रोजी सुभाषबाबूंच्या नेतृत्वाखाली कोलकाता शहरात एका भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. इंग्रज सरकारने मिरवणुकीवर लाठीहल्ला केला. सुभाषबाबू त्यात जखमी झाले. मात्र सरकारने उलट सुभाषबाबूंनाच दोषी ठरवून त्यांना सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.

दरम्यान, इंग्रज सरकारने 23 मार्च, 1931 रोजी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना फासावर चढवले. संपूर्ण देशातील तरुण त्यामुळे हळहळले. सुभाषबाबूंनी या तीन क्रांतिकारकांचा जाहीर गौरव केला. भगतसिंगांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय नवजवान भारत' सभेने खास अधिवेशन भरविले आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांना त्या अधिवेशनाचे अध्यक्षपद बहाल केले. अध्यक्षीय भाषणात सुभाषबाबूंनी समाजवाद, स्त्रियांची उन्नती, जातिसंस्थेचे निर्मूलन, ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकण्याचा योजनाबद्ध कार्यक्रम, भगतसिंग यांच्या महान बलिदानाचा गौरव असे काही मुद्दे मांडले. त्यांनी गांधी-आयर्विन करारालाही विरोध दर्शविला. 1931 च्या डिसेंबर महिन्यात सुभाषबाबूंनी महाराष्ट्रात झंझावाती दौरे केले. संपूर्ण महाराष्ट्र एक नव्या चैतन्याने भारावून गेला. 1932 च्या जानेवारी महिन्यात सुभाषबाबूंना पुन्हा अटक झाली. त्यांना गुप्तपणे शिवणी येथील तुरुंगात टाकले. तुरुंगातील प्रतिकूल वातावरणामुळे ते गंभीररीत्या आजारी झाले. त्यांना दररोज ताप यायचा. वारंवार भोगाव्या लागलेल्या तुरुंगवासामुळे त्यांची प्रकृती खालावत चालली होती. त्यांना क्षयरोगासारख्या भयंकर आजाराने ग्रासले. संपूर्ण देशभरातून त्यांच्या सुटकेची मागणी केली जात होती. शेवटी शासनाने त्यांना काही निर्बंध लादून उपचारासाठी परदेशात जाण्याची परवानगी दिली. मात्र भारतात येण्याची त्यांना परवानगी नव्हती.

1933 ते 1936 या तीन वर्षांच्या कालावधीत सुभाषबाबूंचे वास्तव्य ऑस्ट्रियातील व्हिएन्ना येथे होते. प्रकृतीच्या उपचारासोबतच त्यांनी युरोप खंडातील राजकीय परिस्थितीचा सखोल अभ्यास केला. डी. व्हिलेरा, केमाल व इतर अनेक नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी जागतिक मदतीचे काही आराखडे मनात बांधले. आयर्लंडच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास त्यांनी नीट अभ्यासला.



याच दरम्यान विठ्ठलभाई पटेल यांनी सुभाषबाबूंना त्यांच्या संपूर्ण संपत्तीचे विश्वस्त नेमले. दरम्यान, सुभाषबाबूंचे वडील जानकीनाथजी बोस अत्यवस्थ असल्याची तार त्यांना मिळाली आणि हद्दपारीचा आदेश मोडून सुभाषबाबू भारतात परतले. त्यांनी भारताच्या भूमीवर पाऊल ठेवताच विमानतळावरच त्यांना अटक करण्यात आली आणि कडक बंदोबस्तात घरी नेण्यात आले.

शेवटच्या क्षणीही वडिलांची भेट होऊ शकली नाही. त्या करुणप्रसंगीही कपटी ब्रिटिश शासनाने त्यांच्या हातात एक शासकीय आदेश सोपविला.

त्यात लिहिले होते, "आपणास, आपल्या एल्गिन रोडवरच्या घरात स्थानबद्ध करण्यात येत आहे. कुटुंबीय वगळता तुम्हाला कुणालाही भेटता येणार नाही. पत्रव्यवहार, फोन संभाषण बंद राहील."

जानकीनाथजींच्या अंत्ययात्रेला हजारोंचा समुदाय जमला होता. तिथे 'राम नाम सत्य है' च्या ऐवजी 'वंदे मातरम्'चा मंत्रघोष करीत लोक चालले होते. तीन आठवड्यानंतर सुभाषबाबूंना 10 जानेवारी, 1935 रोजी पुन्हा युरोपात जावे लागले. जाताना भारतीय जनतेला त्यांनी जड अंतःकरणाने निरोप दिला. स्वातंत्र्याचा लढा अधिक तीव्र करण्याचे त्यांनी आवाहन केले. युरोपात पोहोचल्याबरोबर सुभाषबाबूंनी आयर्लंडच्या स्वातंत्र्याचे प्रणेते डी.व्हेलेरा यांची भेट घेतली.

युरोपात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचा फायदा भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी कसा करून घेता येईल यासंबंधी ते विचार करू लागले. त्याचवेळी भारतात सुभाषबाबूंची प्रचंड उणीव जाणवत होती. जवाहरलाल नेहरूंनी सुभाषबाबूंवर लादलेले निबंध उठविण्याची मागणी केली. सुभाषबाबू भारतात येण्यासाठी बेचैन झाले होते. अखेर हद्दपारीचा आदेश धुडकावून सुभाषबाबू एका इटालियन बोटीने भारतात यायला निघाले. मुंबईच्या 'अलेक्झांड्रा' बंदरावर त्यांच्या स्वागतासाठी प्रचंड जनसमुदाय जमला होता. सर्वत्र 'वंदे मातरम्'चा जयघोष निनादत होता. स्वागतासाठी जमलेल्या लोकांना आपल्या लाडक्या नेत्याला पुष्पहारदेखील अर्पण करता आले नाहीत. बंदरावर उतरताच सुभाषबाबूंना अटक करून आर्थर रोडवरील तुरुंगात नेण्यात आले. तीनच दिवसानंतर पोलिसांनी त्यांना येरवड्याच्या मध्यवर्ती कारागृहात नेऊन डांबले. सुभाषबाबूंच्या या अटकेविरुद्ध संपूर्ण देशात प्रचंड आंदोलन छेडण्यात आले. 10 मे, 1936 हा दिन 'सुभाष दिन' म्हणून पाळण्यात आला. पंडित नेहरूंसह अनेक नेत्यांनी सुभाषबाबूंच्या सुटकेची मागणी रेटून धरली. जनक्षोभ लक्षात घेऊन ब्रिटिश शासनाने सुभाषबाबूंना 17 मार्च, 1937 रोजी मुक्त केले.

**'फॉरवर्ड ब्लॉक'ची स्थापना**

शिक्षण संपल्यापासून सुभाषबाबू सतत स्वातंत्र्यलढ्यात प्राणपणाने सहभागी झालेले होते. सतत तुरुंगवास, अटक, छळ, हालअपेष्टा, वैयक्तिक सुखाचा संपूर्ण त्याग सुभाषबाबूंनी सहन केला होता. त्यांची लोकप्रियता परमोच्च शिखरावर पोहोचलेली होती. काँग्रेस अध्यक्षपदाचा सन्मान त्यांना मिळावा, अशी सर्वांची अपेक्षा होती. 19 फेब्रुवारी, 1938 रोजी हरिपुरा येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात सुभाषबाबूंची काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्या दिवशी अध्यक्षपदावरून त्यांनी केलेले भाषण हे त्यांच्या वैचारिक बैठकीचे संपूर्ण दर्शन घडविणारे होते. समाजवादाचा पुरस्कार, साम्राज्यवादाचा विरोध, जगातील परिस्थितीचा फायदा घेऊन इंग्रजांची सत्ता भारतातून संपुष्टात आणण्याचे निकराचे प्रयत्न, इंग्रजांच्या फोडा आणि झोडा नीतीची निंदा, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सर्वधर्मसमभाव, सर्वांना समान हक्क असे अनेक महत्त्वाचे मुद्दे सुभाषबाबूंनी या भाषणात विस्ताराने मांडले.

काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून सुभाषबाबूंनी सबंध देशभर झंझावाती दौरे केले. काँग्रेसने जहाल भूमिका घ्यावी असा त्यांचा आग्रह होता. त्यांच्या प्रचंड लोकप्रियतेमुळेच 1939 च्या त्रिपुरा काँग्रेसच्या अधिवेशनात गांधीजींचा विरोध असूनही सुभाषबाबूंनी पट्टाभिसितारामय्या यांचा पराभव केला आणि ते पुन्हा एकदा काँग्रेसच्या अध्यक्षपदी विराजमान झाले. त्यानंतर सुभाषबाबूंना जहाल ठरवून काँग्रेस कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी राजीनामे दिले. त्या वेळी सुभाषबाबूंना 103 डिग्री ताप असूनही ते अधिवेशनात सहभागी झाले होते. त्यांचे भाषण शरद बोस यांनी वाचून दाखविले. ते अत्यंत संतुलित भाषण होते. काँग्रेसचे ऐक्य अबाधित राहावे असा आग्रह त्यांनी व्यक्त केला होता. गांधीजींबद्दल त्या भाषणात त्यांनी अत्यंत आदराची भावना व्यक्त केली होती. संपूर्ण स्वातंत्र्याची निर्वाणीची मागणी ब्रिटिश शासनाकडे करावी, त्यासाठी त्यांना ठराविक कालमर्यादा द्यावी. संपूर्ण स्वातंत्र्य दिले नाही तर त्यासाठी देशव्यापी सत्याग्रह आणि लढा उभारावा, जगातील राजकीय परिस्थितीचा फायदा घ्यावा असे मुद्दे सुभाषबाबूंनी मांडले होते. सुभाषबाबूंनी सुचविलेला हा निकराचा लढा काँग्रेसने पुढे 1942 मध्ये उभारला; पण 1939 च्या या अधिवेशनात मात्र सुभाषबाबूंना जहाल ठरविण्यात आले. ज्या दुर्दैवी पद्धतीने त्यांना एकाकी पाडण्यात आले, त्यामुळे पुढचा इतिहास बदलला. सुभाषबाबूंनी नाइलाजास्तव 'फॉरवर्ड ब्लॉक'ची स्थापना केली आणि ब्रिटिशांविरुद्ध लढा तीव्र केला. मुंबई, महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, मध्य प्रांत अशा सर्व प्रांतांत फॉरवर्ड ब्लॉकच्या सभा झाल्या. सुभाषबाबूंसोबत काँग्रेसमधील पुरोगामी नेते आणि सेनापती बापट, श्री. कामत, कॉ. रुईकर, सरदार शार्दुलसिंग व इतर कार्यकर्ते कार्यरत होते. फॉरवर्ड ब्लॉकच्या रामगड येथील अधिवेशनात राष्ट्रव्यापी आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला.1940 मध्ये नागपूरच्या अधिवेशनात अस्थायी सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. संपूर्ण देशभरातून सुभाषबाबूंच्या सभांना लाखो लोक जमू लागले. ब्रिटिश शासनाने सुभाषबाबूंना लगेच अटक केली. "THE DAY OF RECKONING' या लेखाचे कारण सांगून अटक झाली असली तरी खरे कारण मात्र वेगळेच होते. ब्रिटिश शासनाला सुभाषबाबूंची धास्ती वाटत होती हे खरे कारण होते. युद्ध सुरू झाले होते. **क्रमश :**




# साप हा शेतकऱ्यांचा मित्र

आधुनिक केसरी


2) हिमोटॉक्सिकः-या विषाचा परिणाम रक्तावर होतो. **उदा :** घोणस, फुरसे

**सापाचे प्रजनन :** बहुतेक साप वर्षातून एकदाच प्रजनन करतात आणि त्यांचा काळही एकच असतो. साप उन्हाळ्यात मिलन करतात तर पावसाळ्यात प्रजनन. म्हणूनच पावसाळ्यात पिल्लांचे प्रमाण जास्त दिसून येते. मिलन काळात मादी एक प्रकारचे समागम द्रव्य (SEX PHEROMONES) सोडते ज्याच्या गंधाने आसपासचे नर या मादीकडे आकर्षित होतात. कित्येकदा एकापेक्षा जास्त नर या मादीकडे आकर्षित होतात आणि त्यांच्यामध्ये मिलनासाठी स्पर्धा लागते. अश्या वेळी दोन नर साप एकमेकांना विळखा घालून उंच उभारून दुसऱ्याला खाली पडण्याचा प्रयत्न करतात. याला आपण मिलन समजतो पण हे मिलन नासून मादीला मिळवण्यासाठी केलेली एक लढाई असते. जो जास्त उंच उभारेल त्यालाच मादी सोबत मिलनाचा हक्क असतो. मिलनावेळी नर मादी एकमेकांना विळखा घालून कित्येक तास जमिनीवर या स्थितीत पडून असतात. मिलनानंतर नर व मादी वेगवेगळ्या दिशेला निघून ते आयुष्यभर जोडीने राहत नाहीत. सापाचे प्रजनन दोन प्रकारे होते. काही साप अंडी जातात. घालतात (अंडज) तर काही प्रत्यक्ष पिल्लं देतात (जारज). काही सापांमध्ये फक्त मादीच असते नर नसतो. (उदाः- वाळा सर्प) म्हणजेच या सापांमध्ये मिलन होत नाही तर अनिषेकजनन (PARTHENOGENESIS) या प्रक्रीये द्वारे प्रजनन होते. काही सापांच्या माद्या नराचे शुक्राणू बिजनलिका (OVIDUCT) मध्ये साठवून ठेवतात आणि योग्य वेळी फलीत करून अंडे किंवा पिल्ले देतात. एका अभ्यासानुसार मादी 5 वर्षापेक्षा अधिक काळापर्यंत नराचे शुक्राणू तिच्या बिजनलिकेमध्ये साठवून ठेवू शकते. अंडी घातल्यानंतर पिल्ले 40 ते 100 दिवसांनी अंड्याच्या बाहेर पडतात. अंडी घातल्यानंतर मादी अंड्यांचे रक्षण करत नाही. अपवाद नागराज, नाग, अजगर, नागराज हा एकमेव साप आहे जो घरटे बनवतो आणि त्यात अंडी घालतो.नागराजाची मादी अंड्यातून पिल्ले बाहेर येईपर्यंत उपाशी राहून घरट्याचे रक्षण करते. काही वेळेस नर सुद्धा घरट्याचे रक्षण करत असल्याचे दिसून आले आहे.



सागर सोनवणे
संपर्क 7757847104

**सर्पदंश व मांत्रिक :** साप म्हणजे साक्षात मृत्यू असे आपण समजतो. पण सगळेच साप विषारी नसतात. याउलट बहुतांश साप बिनविषारी असतात. विषारी सापाने दंश केला तरी वेळेवर उपचार मिळाल्यास माणूस वाचू शकतो. त्यातही विषारी साप चावताना शरीरात विष सोडेलच असे नाही.इतकं असून सुद्धा सर्पदंशाने भारतात सुमारे ५०,००० हून अधिक लोक मृत्युमुखी पडतात. याचे मुख्य कारण म्हणजे सर्पदंशावीषयी असलेले अज्ञान. एकीकडे तंत्रज्ञान भरारी घेत असताना दुसरीकडे मात्र आजही आपण अंधश्रद्धेच्या विळख्यातून बाहेर पडल्याचे दिसत नाही. सर्पदंश झाल्यानंतर काय करावे हे बऱ्याच लोकांना माहिती नसतं आणि म्हणूनच असे लोक मांत्रिकाकडे जाणे पसंत करतात पण खरच मांत्रिक सर्पदंशावर उपचार करू शकतो का? त्याच्याकडे अशी कोणती डिग्री असते ज्याचा अभ्यास करून तो हे उपचार करतो? त्याला खरच उपचार करता येत असतील तर मग इतके मोठ मोठे दवाखाने उभे करण्याची गरज काय होती? आणि प्रत्येक दवाखान्यात सर्पदंशावर उपचार करण्यासाठी एकतरी मांत्रिक असायला हवा होता, तो तिथे का दिसत नाही? असे प्रश्न अंधश्रद्धा बाळगणाऱ्या लोकांच्या मनात मुळीच येऊ शकत नाही. याचे कारण म्हणजे त्यांना आलेले (दिशाभूल करणारे) अनुभव. बऱ्याच वेळेस सर्पदंश हा बिनविषारी सापाचा असतो.आणि अश्या सापांच्या दंशामुळे माणसाच्या जीवितास कसलाही धोका नसतो. हि गोष्ट सर्वसामान्यांच्या लक्षात येत नाही आणि ते उपचारा साठी मांत्रिकाकडे जातात. मांत्रिकही तसा डोक्याने अर्ध- हुशार असतो. त्याला लक्षात येतं की हा सर्पदंश बिनविषारी सापाचा आहे पण तो आपल्याला असे सांगत नाही (धंद्यातले सिक्रेट सांगितले तर त्याचा धंदा बंद पडेल ना). तो म्हणतो "तुमच्या माणसाला भयंकर विषारी सापाने दंश केला आहे. पण घाबरू नका मी माझ्या मंत्राने **क्रमश :**



# खेळांकडे दुर्लक्ष नको....!

आधुनिक केसरी


पूर्वीच्या काळी पारंपारीक खेळाला महत्व होते. ऊन्हाळ्याची सुट्टी लागली की मामाच्या गावाला जायचे सुट्टीत मनसोक्त खेळायचे, बागडायचे व आनंद घ्यायचा लंपडाव, क्रिकेट, सागरगोटे, गोट्या, विठी दांडु, सुरपारंब्या, कॅरम, संगीत खुर्ची, आट्यापाट्या, लगोरी, खो खो, कबड्डी, सापशिडी अशी खेळ मुलं उत्साहाने खेळायची. त्यामुळे मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहायचा. सुट्टीत मुलं खेळांचा आंनद घ्यायची . त्यामुळे मैदानी खेळाबरोबर विचारविनिमय होत असे. पारंपारीक खेळ खेळताना त्यात स्नेह भावना होती. ऐकमेकांना मदतीची भावना त्यात होती. मुलांमध्ये अनेक नेतृत्व गुण मुलांमध्ये विकसित होत असे. परंतु हल्ली सोशल मिडियाचा वाढता वापर,फेसबुक व्हाट्सअप, अशा साधनांमुळे मुलं खेळापासून कोसो दुर राहु लागले. मुले गेम्सच्या आहारी गेली. संगणक, मोबाईलच्या युगात मुलांना खेळायला,बागडायला वेळ मिळत नाही. लहान मुले मोबाईलमध्ये व्यस्त आहेत. सोशल मीडियाच्या करमणुकीच्या साधनांमुळे मुलांचे खेळाकडे सपशेल दुर्लक्ष होत आहे. मामाचा गाव तर दुरच राहीला. मामाच्या गावापासून मुलं कोसो दुर गेली. लहान मुले आपलं गाव हरवून गेली. खेळाची मैदान ओस पडली. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे मुलांचं खेळाकडे दुर्लक्ष होत आहे.



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

या आभासी जगातून मुलांनी बाहेर पडण्यासाठी आवश्यकता आहे. पुन्हा एकदा खेळाच्या मैदानाकडे वळण्याची आवश्यकता आहे. मुलांना पूर्वीसारखे मदानाकडे वळवण्याची गरज आहे. सुदृढ आरोग्यासाठी खेळ महत्वाचा आहे. प्रत्येकाने रोज कोणताना कोणता खेळ खेळला पाहिजे. आपल्याला जो आवडेल तो खेळ खेळा. खेळामुळे ताणतणाव कमी होतो. मन प्रसन्नचित्त राहते. चिरतरूण राहते. त्यासाठी मुलांनी मैदानी खेळाकडे वळले पाहिजे. मानसिक ताणतणावापासुन दुर राहणे साठी शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना गोडी लागण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहीजे तसेच क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले पाहिजेत. पालकांनी देखिल मुलांकडुन खेळांचा सराव करून घेतला पाहिजे. मुलांकडे दुर्लक्ष करता कामा नये. मुलांनी यशस्वी व्हावे असे वाटत असतील तर खेळाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

# गणेश गोळे : मित्रत्व जोपासणारा ध्येयवेडा माणूस



सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र. : 9422880080

आधुनिक केसरी

**ज्याच्या सोबत बालपण घालवलं, सुखदुःख वाटली, सोबत खेळलो,बागडलो,तारुण्यात देखील ह्या मैत्रीला कधी तडा गेला नाही. मात्र एकदिवस तो एका अपघातात मरण पावतो अन त्याच्या मरणाला जे कारण ठरलं ते कारण इतरांच्या मृत्यूचे कारण ठरू नये म्हणून तो त्या मित्राच्या आठवणीत २४ तास राबतो...कृतिशील काम करतो आणि याशिवाय समाजातल्या लोकांना वेगवेगळ्या माध्यमातून प्रबोधन करतो असा एक ध्येय्यवेडा माणूस समाजात आपल्या अवतीभोवती वावरतो ,त्याचं कार्य सर्वांना कळतं पण ते आपण गांभीर्याने घेत नाही हे समाजाचे दुर्दैव म्हणू नये तर काय म्हणावे...? गणेश गोळे हे या ध्येय वेड्या माणसाचे नाव. वाशीम जिल्ह्यातील केनवड चा रहिवाशी. मिस्त्री कामाच्या निमित्ताने डोणगाव येतो. मुलगा व्यवसाय संभाळण्याजोगा झाला म्हणून आपले बस्तान मेहकरात बसवतो आणि समाजात "गोडवा" पसरवत चार ही दिशेने भ्रमण करतो.**

गणेश गोळे यांच्या आयुष्यात दोन दुर्दैवी प्रसंगाने बदल घडवून आणला. एका अपघातात सख्खे काका मरण पावतात.रक्ताचे नाते असल्याने त्या अपघाती मृत्यूचे दुःख वाटते.हे दुःख बाजूला पडत असतांना ज्याच्या सोबत बालपण घालवले,खेळ खेळले, एक संत्रा गोळी दोघांनी चिऊचा घास समजून खाल्ली असा संजय देवराव पिंपळे नावाचा लंगोटी यार संसाराची- लेकराची जबाबदारी खांद्यावर असतांना अपघातात मरण पावतो, हे दुःख वाट्याला आल्यानंतर तो फक्त दुःख करत बसला नाही तर अपघाताच्या कारणांचा शोध घेतला आणि त्यातून त्याला जे जाणवलं ते अमलात आणून आजपर्यंत त्याने कृतीतून अनेकांचे संसार वाचवले. कित्येक महिलांच्या कपाळावरील कुंकू,बाप,मुलगा अशी अनेक नाती केवळ एका कृतीच्या माध्यमातून गणेश गोळे यांनी वाचविली आहेत असे जर का म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

गणेश गोळे यांचा मित्र संजय पिंपळे हे सोयाबीन घेऊन परिवारासह ट्रॅक्टर ने जात असतांना परिवारातील इतर सर्व सदस्य ट्रॅक्टर मध्ये बसलेले आणि मित्र संजय हा त्याच ट्रॅक्टर च्या ट्रॉली मध्ये एकटाच पाठीमागे बसलेले असतात. एक वाहन येते आणि ट्रॅक्टर ला धडक देते,परिवारातील इतर सदस्य वाचतात मात्र पाठीमागे ट्रॉलीत बसलेला मित्र अपघातात मरण पावतो. ट्रॅक्टर च्या ट्रॉली ला रिफ्लेक्टर लावलेले नसल्याने पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनाला समोर ट्रॅक्टर असल्याचे कळत नाही आणि अपघात होतो.त्या ट्रॉली ला 2 रुपयांचे रिफ्लेक्टर जर असते तर पाठीमागून येणाऱ्या वाहनांच्या प्रकाशात ते चमकले असते अन हा अपघात घडलाच नसता व अपघातच घडला नसता तर मित्र जीवानिशी गेला नसता व परिवार उघड्यावर पडला नसता याचा खोलवर परिणाम गणेश गोळे यांच्या मनावर झाला आणि तेव्हापासून हा वेडा माणूस खिशात स्व खर्चाने रिफ्लेक्टर घेऊन फिरतो.ज्या वाहनाला रिफ्लेक्टर नसेल मग ती दुचाकी असो की मुलांची सायकल,अथवा ट्रक, एव्हढेच काय तर बैलगाडी ला देखील मागून आणि समोरून ते गाडी- वाहन थांबवून रिफ्लेक्टर लावतात.या माध्यमातून या माणसाने नकळतपणे शेकडो संसार वाचविण्याचे काम केले आहे. दिसायला साधे वाटणारे हे काम... अनेक महिलांच्या कपाळावरील कुंकू वाचवणारे ठरले,या कार्याने अनेक पाल्यांच्या डोक्यावरील पालकांचा हात कायम ठेवला आहे.





एव्हढ्याच कार्यावर थांबेल तो हा माणूस कसला..? वृक्षारोपणाचे महत्व जाणत एक वेगळी शक्कल या माणसाने काढली आहे. ज्याचा कुणाचा वाढदिवस असेल,त्या व्यक्ती पर्यंत गणेश गोळे पोहचतात आणि वृक्ष भेट देऊन तो फोटो सोशल मीडियावर टाकतात. समोरचा गरीब की श्रीमंत,मोठा की लहान हे न बघता दररोज हा माणूस कुणाला ना कुणाला वृक्ष भेट देतो म्हणजे देतोच. गोळे यांच्या ह्या भूमिकेमुळे घराघरात नकळतपणे अडगळीत पडलेल्या अनेकांचे वाढदिवस परिवारात साजरे होत आहेत,हे देखील वृक्षारोपणाच्या महत्वासहहे दुसरे विशेष ठरले आहे. आतापर्यंत 54 वेळा रक्तदान केलेल्या ह्या सद्गृहस्थाने ३ वेळा १३८० चे अंतर पळत पळत पार केले आहे. आग्रा ते राजगड किल्ला हातात पेटती मशाल घेऊन पहिल्यावर्षी ३ तर यावर्षी तब्बल ५६ जणांचा या मोहिमेत समावेश होता. नरवीर सरनौबत पिलाजी गोळे यांचे १४ वे वंशज ऍड मारुती आबा गोळे ,नरवीर सरनौबत पिलाजी गोळे प्रतिष्ठाण पुणे यांचे सोबत ह्या मोहिमेत ते सहभागी झालेले असतात.



मराठ्यांचा ज्वाज्वल्य इतिहास जागृत करण्यासाठी ही मोहीम हाती घेतल्या गेलेली आहे. एकूण समाजात जिकडे तिकडे स्वकेंद्री झालेली माणसंच अधिक प्रमाणात बघायला मिळत असतांना इतरांना सुखी ठेवण्यासाठी झटणारी माणसं समाजात खऱ्या अर्थाने गोडवा पेरणारी असतात,फक्त अशी माणसं समजून घेत जपता आली पाहिजेत.

***तेरी पहचान भी ना खो जाये कही,***
***इतने चेहरे ना बदल,थोडी सी शोहरत के लिये..***

समाजात स्वतःच्या खोट्या प्रतिष्ठेसाठी लोकं आपली मुखवटे बदलतात,अशा काळात अपघातात मरण पावलेल्या मित्राच्या दुःखाला केवळ कवटाळून न बसत,इतरांचे जीव वाचविण्याच्या कामाचा श्रीगणेशा करणारा गणेश गोळे म्हणूनच गोडवा चा विषय बनतो. त्याची हळवी,कातर कामगिरी काळजात घर करून असलेल्या मित्राच्या अकाली जाण्याला समर्पित असते, मित्राच्या जाण्याची जखम तुरळक माणसे काळजावर मायेने जोजवतात त्या उदात्त पठडीतला गोळे.

गोळे यांच्या ह्या कार्याचा धांडोळा घेतांना कवी स्व अनिल पाटील ह्यांच्या काही ओळी आठवतात,

***वाटेत जीवनाच्या तू भेटलास दोस्ता***
***इतरांहून निराळा, तू वाटलास दोस्ता***
***आनंद और होता एकत्र पोळण्याचा***
***आधीच का निखारा वेचलास दोस्ता !***

# आझाद हिंद सेनेचे सरसेनापती सुभाषचंद्र बोस



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्य चळवळीतील थोर क्रांतिकारक नेते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती सुभाषचंद्र बोस यांचा आज १२६ वि जयंती. २३ जानेवारी १८८७ रोजी कटक येथे नेताजींचा जन्म झाला. नेताजींना आठ भावंडे होती. नेताजी लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. वयाच्या १५ वर्षीच नेताजींनी हिमालयाच्या दिशेने प्रस्थान केले. पण त्यांना गुरू दर्शन झाले नाही म्हणून त्यांनी स्वामी विवेकानंद यांचे साहित्य वाचून त्यांना गुरू बनवले. कॉलेजमध्ये असताना एका इंग्रज शिक्षकाने भारतीयांना दूषणे दिली तेंव्हा नेताजींनी उभे राहून त्या शिक्षकाला जाब विचारीत निषेध नोंदवला. इतकेच नाही तर त्या शिक्षकावर कारवाई व्हावी यासाठी कॉलेजमध्ये बंद पुकारला याचा राग मनात धरून कॉलेज प्रशासनाने त्यांना कॉलेजमधून काढून टाकले.**

१९२१ साली इंग्लंडला जाऊन नेताजींनी इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा दिली त्यात ते चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. नेताजींनी काहीकाळ सिव्हिल सर्व्हीसमध्ये नोकरी देखील केली. पण भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी सिव्हिल सर्व्हिसच्या नोकरीवर पाणी सोडले. तेंव्हा गांधीजींची असहकार चळवळ जोरात सुरू होती. असहकार चळवळ समजून घेण्यासाठी व स्वातंत्र्य चळवळीची पुढील दिशा ठरवण्यासाठी त्यांनी गांधीजींची भेट घेतली. महात्मा गांधींनी त्यांना चित्तरंजन दास यांच्याकडे पाठवले. चित्तरंजन दास हे त्यांचे राजकीय गुरू बनले. इंग्लंडची राणी कोलकोत्याच्या दौऱ्यावर येणार आहे हे समजल्यावर नेताजींनी या दौऱ्यावर बहिष्कार टाकण्याची योजना आखली. इंग्रजांना त्याची कुणकुण लागताच त्यांनी नेताजी आणि चित्तरंजन दास यांना अटक केली. सहा महिने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात असताना त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र आणि मानसशास्त्र या विषयांचे वाचन केले. तुरुंगातून मुक्त झाल्यावर त्यांनी भारतातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला आणि ते राजकारणात सक्रिय झाले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष बनले. पुढे त्यांनी इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना करुन तरुणांना संघटित केले. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात नेताजींना पुन्हा अटक झाली. गांधी आयर्विन करारानंतर त्यांची मुक्तता झाली. ते कोलकोत्याचे महापौर बनले. गांधी आयर्विन कराराला नेताजींनी विरोध केला त्यामुळे त्यांचे महात्मा गांधीशी मतभेद झाले. १९३२ साली सशस्त्र क्रांतिकारी संघटनेशी संबंध जोडून त्यांना अटक करण्यात आली. पण प्रकृतीच्या कारणावरून त्यांना तुरुंगात न ठेवता देशातून हद्दपार करण्यात आले. तीन वर्ष ते व्हिएन्ना येथे राहिले. तिथे त्यांनी युरोपातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. १९३७ साली गांधीजींच्या विरोधाला न जुमानता त्यांनी त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनात अध्यक्षपदाची निवडणूक लढवली. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांनी पट्टाभीसीतारामय्या यांचा पराभव केला. या निवडणुकीमुळे महात्मा गांधी नाराज झाले. हा आपलाच पराभव आहे असे ते मानू लागले. बहुसंख्य काँग्रेसजनांनी गांधीजींचेच नेतृत्व मान्य केले. त्यामुळे नेताजींनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली. नागपूर अधिवेशनात अस्थायी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. पण संकल्पित सत्यागृहापूर्वीच त्यांना अटक करण्यात आली. अटक केल्यानंतर नेताजींनी अन्नत्याग करु अशी धमकी दिली.



या धमकीला घाबरून इंग्रजांनी त्यांना तुरुंगात न ठेवता त्यांच्या घरीच नजरकैदेत ठेवले. नजरकैदेत असतानाच त्यांनी वेषांतर करुन पेशावर गाठले तेथून ते जर्मनीला गेले. जर्मनीत त्यांनी भारतीयांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले. त्यांनी तेथील भारतीयांना संघटित केले. जर्मनीमध्ये ते एडॉल्फ हिटलरला भेटले. बर्लिनमध्ये त्यांनी आझाद हिंद रेडिओ व फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली. १९४३ ला नेताजींना जपानवरून आमंत्रण आले. जर्मनीहून जपान व्हाया मादागास्कर असा सबमरीन प्रवास करीत ते जपानला पोहचले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी त्यांनी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना केली. नेताजी स्वतः राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, संरक्षण मंत्री व सरसेनापती बनले. या राष्ट्राला जपान, जर्मनी, ब्रह्मदेश, इटली यासह ११ देशांनी मान्यता दिली. नेताजींनी तरुणांना आझाद हिंद सेनेत सहभागी होण्याचे आव्हान करीत तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा...अशी घोषणा केली. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो तरुण आझाद हिंद सेनेत सामील झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आझाद हिंद सेनेने जपानी लष्कराच्या साहाय्याने भारतावर आक्रमण केले. दोन्ही फौजांनी इंग्रजांकडून अंदमान निकोबार बेटे जिंकली. ब्रह्मदेशमधून आझाद हिंद सेनेच्या फौजा भारताकडे निघाल्या मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे आझाद हिंद सेनेला माघार घ्यावी लागली. रंगून आकाशवाणी वरुन नेताजींनी भाषण करुन इंग्रजांशी कोणत्याही प्रकारचा समजोता न करण्याचे, फाळणी न करण्याचे लढा चालूच ठेवण्याचे आव्हान केले. महायुद्धात जर्मनी, इटली यांचा पराभव झाला. जपानने शरणागती पत्करली तेंव्हा नेताजींनी रशियाला जाण्याचा निर्णय घेतला. १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी विमानातून माणचुरीयाच्या दिशेने जात होते. प्रवासादरम्यान त्यांचे विमान बेपत्ता झाले. २३ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या दोनयी वृत्तसंस्थेने जगाला कळवले की १८ ऑगस्ट रोजी नेताजींच्या विमानाला अपघात झाला त्यात नेताजींचे निधन झाले. १९९२ साली भारत सरकारने नेताजींना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देण्याची घोषणा केली पण मृत्यूबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देणे अवैध आहे असे म्हणत त्यांच्या कुटुंबीयांनी हा पुरस्कार नाकारला. तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा... असा नारा देत भारतीयांमध्ये स्वातंत्र्य लढ्याची चेतना निर्माण करणाऱ्या नेताजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# एमपीएससीला का नको उच्चशिक्षित -अनुभवी जिल्हा माहिती अधिकारी

आधुनिक केसरी



नितीन जाधव
संपर्क क्र. 9326398001

जाणून बुजून ठराविक उमेदवारांसाठी नातेवाईक. आप्तेष्ट त्यासाठी केलेले भरती नियोजन आहे असे दिसते. एक तर उच्चशिक्षित अभ्यासू बीजे. एमजे. उत्तीर्ण झालेल्या पत्रकारांसाठी उत्तम दर्जाची नोकरी उपलब्ध नाही. वर्षानुवर्षे एखाद्या दैनिकात. साप्ताहिकात वार्ताहर. पत्रकार म्हणून काम करायचे. सरकार दरबारी आपल्या लेखणीच्या माध्यमातून आवाज उठवत अनेक प्रश्न मार्गी लावायचे. विविध प्रकारचे समाज जागृती पर पुस्तकांचे लिखाण करायचे आपले ज्ञान बुद्धिमत्ता समाज विकासासाठी समर्पित करायची हेच कार्य पत्रकार बांधव वर्षानुवर्षे करत आलेले आहेत. आज कुठेतरी दहा पाच वर्षांनी जिल्हा माहिती अधिकारी, माहिती संचालक, वरिष्ठ सहाय्यक संचालक पदाची जाहिरात प्रसिद्ध झाली. तेव्हा उच्चशिक्षित पत्रकार खुश झाला होता परंतु तुम्ही केवळ डिप्लोमाधारक पदवीधर असाल तरच एम पी एस सी च्या ऑनलाईन वेबसाईट वरती तुमचा अर्ज अपलोड होत आहे.. तुम्ही बी जे. एम जे.उच्चशिक्षित अनुभवी पत्रकार असाल तर तुमचा अर्जच घेतला जात नाही. आता हे उत्तीर्ण झालेले डिप्लोमाधारक जिल्हा माहिती अधिकारी. मंत्रालयातील पुस्तके प्रकाशन विभागाचे संचालक. मंत्रालयातील जनसंपर्क विभागाचे संचालक. वरिष्ठ सहाय्यक संचालक या पदावर ती विराजमान होणार आहेत. एमपीएससी नेमकं करतय काय..? दाल मे बहुत कुछ काला है.. आज आपण शांत बसलो तर अशाच पद्धतीने सेटिंग वापरून पद भरती केली जाते काय असा सवाल उपस्थित होतो ..खरा पत्रकार वार्ताहर नेहमीच वंचित राहिला आहे.. अनुभवी उच्चशिक्षित वार्ताहर च्या बाजूने आवाज उठवण्यासाठी पत्रकार संघटनांनी, वृत्तपत्र सृष्टीतील सर्वच घटकांनी. डिजिटल मीडियातील सर्व पत्रकारांनी वेब पोर्टल वेबसाईट तसेच साप्ताहिक व वृत्तपत्र च्या माध्यमातून न्याय देणारा मुद्दा उचलून धरावा व बातम्यांच्या माध्यमातून सदरच्या प्रकरणाची पोलखोल करावी. मोठ्या टीव्ही चॅनेल ने सुद्धा सदरचा मुद्दा उचलून धरावा. चॅनेल वरती विचारवंतासोबत त्या क्षेत्रातील वरिष्ठ तज्ञांसोबत चर्चा घडवून आणावी.. तसेच एमपीएससीने सुधारित जाहिरात काढून अर्ज भरण्यासाठी एक महिन्याचा अवधी द्यावा.. उच्चशिक्षित अनुभवी पत्रकार बांधवांना प्राधान्य द्यावे.. अन्यथा चुकीच्या जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनाच आपल्या उच्चशिक्षित अभ्यासू वार्ताहर च्या माध्यमातून दर्जेदार बातम्या पुरवाव्या लागतील व सरकारचे निर्णय धोरणे जनसामान्यांपर्यंत आपल्याच माध्यमातून पोहोचवाव्या लागतील. सदरची बाबा अतिशय गंभीर असून राज्याचे मुख्यमंत्री सन्माननीय एकनाथ भाई शिंदे यांनी सदरच्या प्रकरणात लक्ष घालावे व एमपीएससीच्या व्यवस्थापन समितीला आदेश द्यावा व सदरची जाहिरात पुन्हा प्रसिद्ध करून त्या पदाची पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या उच्चशिक्षित पत्रकाराला न्याय द्यावा . महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने सरकारला विनंती करण्यात येत आहे.



# पेरियार रामासामी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आधुनिक केसरी

**भीमराव सरवदे हे आंबेडकरी चळवळीचे केवळ कार्यकर्तेच नव्हे तर आंबेडकरी चळवळीसाठी वैचारिक भरण पोषण करणाऱ्या अभ्यासक, संशोधन तथा विचार मंथनातील एक महत्त्वाचे नाव आहे. आपल्या महाविद्यालयीन तरुण वयातच त्यांनी आपली वैचारिक दृष्टी आणि सामाजिक आकलनाचे कार्य निश्चित केले. दक्षिणेतील जातीमुक्ती, आंबेडकरी विचार कार्य चळवळ, पेरियार रामासामी यांची मानवमुक्ती, समतावादी त्यासोबतच धर्म चिकित्सेची मीमांसा, अभ्यास यांचा एकूणच ध्यास भीमराव सरवदे यांनी आरंभीच घेतला. त्यातूनच त्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार रामासामी यांच्या अनुबंधाची शोधयात्रा सुरू झाली. एलआयसीसारख्या प्रचंड आर्थिक उलाढाल असणाऱ्या व्यस्त संस्थेत वरिष्ठ शाखा व्यवस्थापक पदाचा कार्यभार सांभाळत हे त्यांचे चळवळ, वैचारिक लेखन नक्कीच कौतुकाचा विषय आहे.**

भीमराव सरवदे यांची आत्तापर्यंत अनुवादित, वैचारिक, चिंतनपर व संशोधनात्मक १३ अभ्यासपूर्ण ग्रंथसंपदा प्रकाशित झालेली असून शेकडो प्रासंगिक लेख व भाषणे प्रसिद्ध झाली आहेत. पेरियार रामासामी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा या दोन महामानवांच्या नातेसंबंधांचा अनुबंध अधोरेखित करणारा १८४ पृष्ठांचा ग्रंथ असून मराठी भाषेतील या नाविन्यपूर्ण विषयावरील पहिलाच ग्रंथ आहे. यात सतरा प्रकरणे आहेत. यात सामाजिक, राजकीय, वैचारिक, धर्मचिकित्सा, समकालीन राजकीय घडामोडी, स्वातंत्र्य-सामाजिक-राजकीय चळवळीचा उहापोह या अनुषंगाने पेरियार रामासामी यांचे विचार, कार्य तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचे उपरोक्त संदर्भान्वये चर्चा-चिंतन केले आहे. दोन्ही महान महापुरुषांच्या वैचारिक तमतांतरांची तुलनात्मक चिकित्सा करत विविध कार्य व विचार चिंतनातून अनुबंध स्पष्ट केला आहे. पेरियार रामासामी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथात भीमराव सरवदे यांनी दोन्ही सामाजिक- धार्मिक व राजकीय क्रांतिकारी महामानवांच्या विचारांचा त्यांच्यातील अंतर्बाह्य परस्पर पूरक तसेच वैचारिक मतभेदांचा संदर्भासह अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषतः धर्मासंबंधीची व राष्ट्रीयत्वाबाबतची मते, सामाजिक क्रांतिकारक बदल, काँग्रेस आणि महात्मा गांधींचे धोरण, जातीनिर्मूलन, धर्मांधता, हिंदू कोडबिल, राष्ट्रीय भाषा धोरण, जाती आणि राष्ट्रीय एकात्मता, दुसरे महायुद्ध आणि काँग्रेस, पुणे करार, मुस्लिम धर्म, बॅ. मोहंमद अली जिना अशा अनेक मुद्द्यांना चर्चेत ठेवून तर कधी चर्चेला चालना देऊन व विचार मंथनातून धर्मनिरपेक्ष भारताचे स्वप्न साकारलेले पाहावयास मिळते. पेरियार आणि बाबासाहेब यांची तुलनात्मक दृष्टी, पेरियार यांचा परिचय, बालपण, आंदोलन, धर्मयुद्ध या प्रकरणांसोबतच या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार आणि बॅ. जिना यांची भेट, राष्ट्रवाद, सामाजिक राजकीय स्वातंत्र्यातील संघर्ष-मतभिन्नतेची सरवदे चर्चा करतात. कुटुंब नियोजन, लोकसंख्या वाढ, स्त्रियांचे सुधारणाविषयक कार्य, पत्रकारितेतील पेरियार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अमूल्य योगदान, पेरियार यांचा रशिया दौरा, संघ परिवाराचे भेद, भीती, भ्रष्ट नैतिक मूल्ये यांच्या अनुरोधाने भीमराव सरवदे यांनी या ग्रंथात चर्चा केली आहे. सनातन, धर्मांध, विषमतापूर्ण व्यवस्थेवर प्रहार करत मानवमुक्तीची उपासना, करुणा, समता, बंधुभाव मूलभूत स्वातंत्र्य व सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन पेरियार रामासामी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले सर्वस्व पणाला लावले. उपेक्षित, बहुजन, अल्पसंख्यांक, स्त्रिया व वंचितांना न्याय देण्यासाठी व्यवस्था, सरंजाम, धर्ममार्तंड व उच्च वर्गाशी लढा दिला. याचा सखोल लेखाजोखा सदर ग्रंथात भीमराव सरवदे करून देतात. दोन्ही महापुरुषांचे परस्परांशी असणारे वैचारिक नाते, ऋणानुबंध प्रकरणात त्यांनी स्त्रीविषयक विचार, धर्मातील विषमता, अस्पृश्य शूद्रांना मनुस्मृती पुरस्कृत वर्णव्यवस्थेने दिलेली वागणूक, समाज-राष्ट्र याबाबतची आधुनिक वैज्ञानिक मते, अस्पृश्यता उद्धार, जाती निर्मूलन, शूद्र-मजूर, लोकशाही, शासन-राज्यव्यवस्था याबाबतीतील विविध घटना-प्रसंगाबातून पेरियार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परस्पर पूरक संबंधाचा अन्वयार्थ सरवदे उलगडून




दाखवतात. सुरुवातीच्या उमेदीच्या काळात सरवदे पेरियार रामासामी यांच्या विचार कार्याकडे आकृष्ट झालेले दिसतात. ते त्यांनी पेरियार यांचे चरित्र ग्रंथ व पेरियार यांच्या भाषणांचे व लिखाणांचे मराठी भाषेत केलेले अनुवाद यातूनच या विषयाचे लेखकाशी वैचारिक नाळ जुळल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धर्मनिरपेक्ष, जाती निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन व तात्विक विचार करणाऱ्या सर्वच अभ्यासकांना या ग्रंथामुळे निश्चितच नवा विषय व नवी दिशा मिळणार आहे. आंबेडकरी आणि वैचारिक चळवळीचे भरण-पोषण या ग्रंथामुळे नक्कीच होणारे आहे. संघ परिवारातील सनातन विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार यांच्यात वैमनस्य दाखवण्याचा वृथा अट्टाहास कसा करतात तेही सरवदे यांनी येथे सप्रमाण दाखवून त्यांचे कार्य, ध्येय, उद्दिष्ट व विचारातील साम्य संदर्भासह ते दर्शवतात म्हणून या ग्रंथाचे संदर्भमूल्यही आपोआपच वाढते. भक्ती किंवा व्यक्तीपूजा ही अधःपतन आणि शेवटी हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हटले होते, हाच धागा पकडून या ग्रंथात भीमराव सरवदे म्हणतात, डॉ. आंबेडकरांनी योग्य इशारा दिल्याप्रमाणे, आता सत्तेची भूक असलेल्या प्रतिगामी ब्राह्मणवादी तत्त्वज्ञानाने धार्मिक द्वेषाशी हातमिळवणी करून देशाच्या विकासाला खीळ घातली जात आहे आणि देशद्रोहाचा नंगानाच केला जात आहे. या परिस्थितीत, डॉ बाबासाहेब आंबेडकर व पेरियार रामासामी यांचे तत्त्वज्ञान आणि त्यांच्या नेतृत्वाखालील संघर्षाचा इतिहास दीपस्तंभ म्हणून उभा असून तो आपल्याला सामाजिक दडपशाहीचे ओळखण्यास मार्गदर्शन करत आहे. विद्यमान राजकीय परिस्थितीवरील हे लेखकाचे भाष्य अत्यंत बोलके व समर्पक असून मरगळलेल्या आंबेडकरी चळवळीस आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी दिलेला हा इशाराच आहे, असे वाटते! इ. व्ही. रामासामी नायकर हे स्वतः कट्टर स्वराज्यवादी आणि सामाजिक क्रांतीचे अनन्य भक्त आहेत. ते कट्टर गांधीभक्त होते आणि देशाकरिता हालअपेष्टा व तुरुंगवासही त्यांनी भोगला आहे. त्यांचा आत्मा सामाजिक व राजकीय क्रांतीकरिता पंडित नेहरू व सुभाष बाबू पेक्षा रतिभरही कमी तळमळत नाही. हे पेरियार बाबतीत डॉ बाबासाहेब आंबेडकर १९२८ मध्ये मत व्यक्त करतात तर पेरियार यांनीही डॉ. बाबासाहेब यांना आपला, देशाचा नेता म्हणून स्वीकारले आहे. ते गांधीभक्त असताना गांधीच्या हयातीत म्हणतात, मी आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपला नेता म्हणून स्वीकारले आहे आणि शोचितांचे राष्ट्रीय नेते म्हणून सुद्धा स्वीकारले आहे. माझा ठाम विश्वास आहे की, केवळ डॉ आंबेडकरच अस्पृश्यावरील अत्याचारांचे समूळ उच्चाटन करू शकतात. डॉ आंबेडकर हेच आपले सर्वांचे नेते आहेत. हा अनुबंध संदर्भ, घटना, प्रसंग व विचारांच्या आधारावर सरवदे अभ्यासपूर्ण व संशोधक वृत्तीने मांडतात. म्हणूनच हा ग्रंथ वाचकांना व चळवळीला दिशादर्शक ठरणार आहे. या ग्रंथाच्या मुखपृष्ठावर दोन्ही महापुरुषांचे हास्यमुद्रेत असलेले प्रासंगिक छायाचित्र दोघांच्या नातेसंबंधातील सखोलता स्पष्ट करते. **पुस्तकः पेरियार रामासामी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखकः भीमराव सरवदे, प्रकाशकः विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव**

**पृष्ठेः १८४**

**मूल्यः रु. ३००/-**

प्रा. डॉ. नवनाथ गोरे
9423181957

# अवकाश होतेय पृथ्वीबाहेरचे मोठे कचरा हाऊस



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**रशियाच्या आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाला उल्का धडकल्याने त्याचा बचाव होणे अशक्य असल्याचे मानले जात आहे. रशियाच्या अंतराळ स्थानकातील कुपीत गळती होऊ लागल्याने अंतराळवीरांना पृथ्वीवर येण्यास अडचण निर्माण झाली आहे. अवकाश स्थानकावर आणीबाणीची स्थिती निर्माण झाली तर अंतराळवीरांना साधारणपणे तीन तासांत पृथ्वीवर परत आणले जाते. पण रशियाच्या अवकाशस्थानकातील सध्याची स्थिती नाजूक असून जर परिस्थिती आणखी बिघडली तर सर्व सात अंतराळवीरांना आणणे शक्य होणार नाही, अशी भीती डिडियर शुमेट यांनी व्यक्त केली.**

अंतराळवीरांना परत आणण्यासाठी नवीन अंतराळयान 20 फेब्रुवारी रोजी पाठविणार असल्याचे रशियाची अवकाश संशोधन संस्था 'रॉसकॉसमॉस'ने सांगितले आहे.

अंतराळात वैश्विक वस्तूंचा आणि मानवनिर्मित कचरा लक्षणीय प्रमाणात आढळून येत आहे. लहान-लहान उल्का अवकाशयानावर आदळणे हे काही दुर्मिळ नाही. सूक्ष्म उल्का एका सेकंदाला 19 ते 30 किलोमीटर वेगाने फिरू शकतात. बंदुकीतून झाडलेल्या गोळीपेक्षाही खूप वेगाने त्या फिरत असतात. म्हणूनच अवकाश स्थानकाची मोठी निरीक्षण खिडकी ही जेव्हा वापरात नसेल तेव्हा संरक्षक साधनाच्या अत्यंत जाड आवरणाने बंद केलेली असते. लहान उल्का दूरवरच्या विश्वातून आणि अत्यंत वेगाने येत असल्याने त्यांचा माग ठेवणे शक्य होऊ शकत नाही. परंतु अवकाश संशोधन संस्था ज्ञात उल्कावर्षावांचे निरीक्षण करतात. असंख्य लहान मोठ्या उल्का सतत विघटनाच्या अवस्थेत असतात. सृष्टीचे हे चक्र कधीच थांबणारे नाही.

शस्त्रास्त्रांच्या चाचण्यांसाठी क्षेपणास्त्रांद्वारे उपग्रह नष्ट करणाऱ्या देशांकडून अवकाशातील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात लक्षणीय भर पडत आहे. मॉस्कोने क्षेपणास्त्र चाचणी दरम्यान स्वतःचा एक उपग्रह 2021 मध्ये नष्ट केला. त्यावेळी त्याचे दीड हजारापेक्षा जास्त तुकडे झाले होते. यामुळे 'आयएसएस'वरील अंतराळवीरांना सुरक्षित आश्रय घ्यावा लागल्याने 'नासा'ने रशियावर टीका केली होती.चीनने 2007 मध्ये त्याचा एक हवामान उपग्रह पाडला, त्यावेळी साडेतीन हजारपेक्षा जास्त तुकडे निर्माण झाले होते, असा 'नासा'चा दावा आहे. उपग्रह आणि अवकाशातील वस्तूंच्या अपघातातूनही कचरा वाढत असल्याचे दशकभरापासून दिसत आहे. रशियाच्या सैन्याचा एक निरुपयोगी उपग्रह 2009 मध्ये 'यूएस इरिडियम कम्युनिकेशन' उपग्रहाला धडकला होता. भविष्यात अशा घटना गंभीर स्वरूप घेतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे. अंतराळातील वाढता कचरा ही पृथ्वीसाठी गंभीर समस्या बनत चालली आहे. हा कचरा केवळ मानवनिर्मित नाही, तर त्याहीपेक्षा अधिक वैश्विक वस्तूंचाही आहे. परंतु मानवनिर्मित अवकाशातील कचरा पृथ्वीवरील रहिवाशांसाठी धोका वाढवत आहे. अमेरिकेची अंतराळ संस्था - नासाही याबाबत चिंतेत आहे. याविषयी विज्ञान मासिक- सायन्समध्ये, नासाचे शास्त्रज्ञ जे.सी. लिओ आणि एन.एल. जॉन्सन यांनी एका संशोधन अहवालात लिहिले आहे की, आपल्या जवळच्या अंतराळात असे कोट्यवधी मानवनिर्मित तुकडे पृथ्वीच्या कक्षेत तरंगत आहेत, जे आगामी काळात भयावह दृश्य देऊ शकतात. या अहवालात म्हटले आहे की, सध्या सुरू असलेल्या अंतराळ मोहिमा अजिबात थांबवल्या गेल्या तरी (जे आता शक्य नाही) अंतराळात इतके उपग्रह आहेत की ते तेथे कचऱ्याचेचे प्रमाण वाढवत राहतील.

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात मोठी अडचण म्हणजे हा कचरा गोळा करून पृथ्वीवर परत आणण्याची कोणतीही योजना नाही. तथापि, अनेक देश आता या स्पेस वेस्ट मॉनिटरिंग योजनांची आखणी आणि अंमलबजावणी करत आहेत. काही काळापूर्वी इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इसरो) ने अंतराळ परिस्थिती जागरूकता आणि व्यवस्थापन संचालनालय (डीएसएसएएम) स्थापन केले, जे अंतराळातील कचऱ्याचे निरीक्षण करते. या संचालनालयाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, गेल्या वर्षी इस्रोने आपल्या उपग्रहांना कचऱ्याच्या टक्करी होण्यापासून वाचवण्यासाठी वीस बचाव कार्ये हाती घेतली होती. वास्तविक एवढ्या मोठ्या प्रमाणात हा कचरा कुठून येतो, असा प्रश्न उपस्थित होत आहे. हा कचरा सूर्यमालेतील लघुग्रहांच्या झीज आणि तुटण्या-फुटण्यातून उद्भवतो असा एक सामान्य समज आहे. काही कचरा बाहेरच्या अवकाशातून उल्काच्या रूपातही येतो. पण ही समस्या तेव्हा वाढू लागली जेव्हा मानवाने आपले अवकाशयान अवकाशात पाठवायला सुरुवात केली आणि वेगवेगळ्या उद्देशांसाठी वेगवेगळ्या कक्षेत कृत्रिम उपग्रह बसवायला सुरुवात केली. जेव्हा यापैकी काही उपग्रहांनी काम करणे बंद केले किंवा वाहनांमधील काही वस्तू अवकाशातून बाहेर पडल्या किंवा त्या खराब झाल्या, तेव्हा हे सर्व कचऱ्यामध्ये बदलले.

याचे ताजे उदाहरण म्हणजे रशियाने अंतराळ स्थानक सेंटरला (आयएसएस) सहकार्य करण्यास नकार दिल्याने 2030 मध्ये ते कचरा ठरण्याची शक्यता आहे. माणसाला अंतराळात पोहोचण्याचे अनेक फायदे आहेत आणि तसे तोटेही. गैरसोय म्हणजे एकीकडे तिथे कचरा निर्माण होत आहे आणि दुसरे म्हणजे अंतराळ युद्धाचा धोकाही वाढत आहे. यावर विश्वास ठेवणे कठीण जाईल, परंतु हे खरे आहे की सर्वात जुना मानवनिर्मित कचरा अजूनही अवकाशात आहे.

2018 मध्ये चिनी अंतराळ केंद्र थियांगॉन्ग-1 कचऱ्याच्या रूपात कधीतरी पृथ्वीवर आदळू शकते, अशी बातमी आल्यावर अंतराळ कचऱ्याच्या भीतीने डोके वर काढले. 2016 मध्ये चिनी अंतराळ संस्थेशी या केंद्राचा संपर्क तुटला. नंतर तो पृथ्वीवरच पडल्याचे सांगण्यात आले. मात्र, पृथ्वीच्या पृष्ठभागावर येईपर्यंत सुमारे





नऊ टन वजनाच्या अंतराळ स्थानकाचे वजन एक ते चार टनांपर्यंत कमी झाल्याच्या बातमीने काहीसा दिलासा मिळाला. पण नासाचे पंचाहत्तर टनांहून अधिक वजनाचे स्कायलॅब 1979 साली पृथ्वीवर पडले तेव्हा जगभरात खळबळ उडाली होती, पण कोणतीही हानी न होता समुद्रात पडून ती नष्ट झाली होती.गेल्या सहा-सात दशकांमध्ये विविध देशांच्या अवकाशातील हालचाली वाढल्याने तेथे पृथ्वीवरून पोहोचणारा कचरा वाढत आहे. जुलै 2016 मध्ये, यूएस स्ट्रॅटेजिक कमांडने अंतराळातील सतरा हजार आठशे बावन्न कृत्रिम वस्तूंची नोंद केली, त्यात एक हजार चारशे एकोणीस कृत्रिम उपग्रहांचा समावेश होता. पण तो फक्त मोठ्या वस्तूंचा विषय होता. यापूर्वी 2013 च्या अभ्यासात एक सेंटीमीटरपेक्षा लहान 17 कोटी तुकडे आढळले होते आणि एक ते दहा सेंटीमीटर आकाराच्या कचऱ्याची संख्या सुमारे 7 कोटी होती. अंतराळात यादृच्छिकपणे फिरणाऱ्या या गोष्टी कोणत्याही अंतराळ मोहिमेचा काळ बनू शकतात. काही काळापूर्वी युनिव्हर्सिटी ऑफ साउथॅम्प्टनच्या संशोधकांनी, गुगल आणि स्पेस एक्स सारख्या खाजगी कंपन्यांच्या भविष्यातील अंतराळ कार्यक्रमांवर नजर टाकून अवकाशात तयार होणाऱ्या कचऱ्यांच्या नवीन शक्यतांचे मूल्यांकन केले. संशोधकांच्या मते, एकीकडे गुगल आणि एलोन मस्क यांची कंपनी स्पेसएक्स येत्या काही वर्षांत जगात वायरलेस इंटरनेटचा वेगाने विस्तार करण्यासाठी आणि पर्यटकांना अंतराळात नेण्यासाठी शेकडो रॉकेट, वाहने आणि उपग्रह अवकाशात पाठवणार आहेत. या योजनांच्या आधारे पुढील काही वर्षांत हे उपग्रह अवकाशात आल्यामुळे त्यांच्यातील टक्करींचे प्रमाण पन्नास टक्क्यांनी वाढेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. सध्या दरवर्षी उपग्रह आणि त्यांचे तुकडे यांच्यात टक्कर होण्याच्या अडीचशेहून अधिक घटना घडतात.काही काळापूर्वी नासाने अंतराळातील या कचऱ्याला जबाबदार असलेल्या देशांची यादी तयार केली होती. यातील पहिला क्रमांक रशियाचा आहे. त्यापाठोपाठ अमेरिका, फ्रान्स, चीन, भारत, जपान आणि युरोपियन स्पेस एजन्सी यांचा क्रमांक लागतो. सर्वात जास्त कचरा पृथ्वीपासून पाचशे पन्नास मैल ते सहाशे पंचवीस मैलांपर्यंत पसरलेला आहे. पहिला स्पुतनिक-1 उपग्रह अवकाशात पाठवल्यापासून मानवाने हजारो टन कचरा पृथ्वीच्या बाहेर अंतराळात फेकला आहे. गेल्या सुमारे पन्नास वर्षात दळणवळण उपग्रह, अवकाश प्रयोगशाळा, मानवरहित वाहने, अंतराळात पाठवलेली मालवाहू वाहने यामुळे अवकाश हे पृथ्वीबाहेरचे एक मोठे कचरा हाऊस बनले आहे. याशिवाय निसर्गाने अशा हजारो लहान-मोठ्या वस्तूंना आपल्या पृथ्वीजवळ अंतराळात स्थान दिले आहे, जे केव्हाही पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करू शकतात आणि मानवी संस्कृतीचा संपूर्ण विनाश करू शकतात. आगामी दशकात उपग्रह अवकाशात सोडताना अवकाशात सोडले जाणारे प्रक्षेपकाचे तुकडे पृथ्वीवर कोसळून व्यक्तीला गंभीर इजा होण्याची किंवा त्या व्यक्तीचा मृत्यू होण्याची सहा ते दहा टक्के शक्यता असेल, असा इशारा एका अभ्यास अहवालात देण्यात आला आहे. हे टाळण्यासाठी प्रक्षेपण करतानाच संबंधित देशाने प्रक्षेपकाचे विलग झालेले भाग सुरक्षित ठिकाणी कोसळविण्याची सोय करावी; यासाठी त्यांना अधिक खर्च आला तरी चालेल, पण जीव वाचू शकतो, असा सल्लाही अहवालाद्वारे देण्यात आला आहे. उपग्रह अवकाशातील कक्षेत सोडण्याच्या प्रक्रियेदरम्यान प्रक्षेपकाचे काही भाग टप्प्याटप्प्याने विलग केले जातात. ते अवकाशात पृथ्वीच्या कक्षेजवळ तसेच फिरत राहतात. प्रक्षेपकाचे काही तुकडे पृथ्वीच्या कक्षेत शिरताच वेगाने खाली येतात. यातील बहुतेक तुकडे आकाशातच जळून खाक होतात, मात्र काही मोठे तुकडे जमिनीपर्यंत पोहोचतात. कॅनडामधील ब्रिटिश कोलंबिया या विद्यापीठातील संशोधकांनी गेल्या तीस वर्षांत अवकाशात सोडलेल्या उपग्रहांची माहिती संकलित करून त्याचा अभ्यास केला आणि पुढील दहा वर्षांत अवकाशातील या कचऱ्यापासून उत्पन्न होणाऱ्या धोक्याबाबत इशारा दिला आहे. त्यांचा हा अभ्यास अहवाल 'नेचर अ‍ॅस्ट्रॉनॉमी' या जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला आहे.2020 मध्ये एका प्रक्षेपकाचा बारा मीटर लांबीचा पाइपचा तुकडा आयव्हरी कोस्ट येथील इमारतीवर कोसळला होता.

प्रश्न असा आहे की या समस्येवर उपाय काय? हा कचरा अवकाशातून गोळा करून पृथ्वीवर परत आणणे हाच यावर उपाय असल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.मात्र आजही एवढ्या प्रभावी तंत्रज्ञानाचा शोध लागलेला नाही, ज्यामुळे अवकाशातील कचरा साफ करता येईल. परंतु असे तंत्रज्ञान भविष्यात प्रक्षेपित होणाऱ्या उपग्रहांच्या इंजिनांमध्ये आणि बूस्टर रॉकेटमध्ये बसवता येऊ शकते जेणेकरुन वापर केल्यानंतर ते अंतराळात न राहता ते पुन्हा पृथ्वीवर पडतील.

# अखंड हरीनाम सप्ताह; एक वेगळी अनुभूती

आधुनिक केसरी

**भाग्यवंता घरी भजन कीर्तन!**



विश्वास सोहोनी
मो. 9850995652

**त्यांची वाट पाहे रघुनंदन!**
महात्माफुले नगरमधे मागील १७ वर्षापासून साजरा होत असलेला अखंड हरीनाम सप्ताह हा दर वर्षांच्या जानेवारी महिन्यात संपन्न होत असलेला एक भक्तीमय सोहळा आहे. अतिशय वेगळा अनुभव देणाऱ्या या सप्ताहाची दर वर्षी सर्वजण अतिशय आतुरतेने वाट बघत असतात.
भक्ती रसात चिंब भिजवून टाकणारा हा हरिभक्तांचा सोहळा सर्वच भक्तांना मनोमन आनंद देऊन जात असतो... देणाऱ्याने देत रहावे घेणाऱ्यांने घेत रहावे! अखंड सात दिवसात भक्ती रसात रमून जावे!

असा हा सोहळा मनाला कायम समाधान देत असतो... माझ्या मते प्रत्येक भागाची काही वैशिष्ट्ये असतात त्या नुसार चिंचवडमधील महात्माफुले नगरचे वैशिष्ट्य म्हणजे अखंड हरीनाम सप्ताह.
जानेवारी महिन्यात येणाऱ्या गणेश जयंती अगोदर या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. संपूर्णपणे लोकसहभागातून संपन्न होणारा सप्ताह म्हणून चिचंवडमधे या सप्ताहाची ओळख आहे.
छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान व त्यांचे सर्व सहकारी हा सप्ताह अतिशय आखीव रेखीव पद्धतीने आयोजित करीत असतात....
या सप्ताहातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे कार्यक्रमाचे ठिकाण. सुदैवाने फुलेनगरला गणेश मंदिराचा परिसर लाभला आहे.या मंदिराच्या अतिशय सुरेख परिसरात हा सप्ताह उत्साहाने साजरा होत असतो... अंखड सात दिवस चालणारा हा कार्यक्रम भक्तांना संगीत, आध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक माहितीचा खजिनाच उघडून देत असतो. काय आहे या सप्ताहाची जादू! हरिनामामुळे मनाची स्थिरता! संगीतातून मनशांती! आध्यात्मिक माहितीतून समाधान! धार्मिक संवादातून आत्मिक शांती! किर्तनातून समाज जागृती महा प्रसदामुळे अन्नाची गोडी व




महत्त्व! या व अशा माध्यमातून हा सोहळा भाविकांना भरभरुन सुख व शांती देत असतो. या सात दिवसात दिवसभर कार्यक्रम चालू असतात परंतु संध्याकाळी सात वाजता भाविकांचे पाय आपसूक गणेश मंदिराकडे किर्तन ऐकण्यासाठी वळू लागतात.
काय मिळते या हरिनाम सप्ताहातून! मनापासून सांगतो!
अखंड हरिनामाचा गजर, आध्यात्मिक वातावरण,
भजन आणि संगीत, चांगले विचार, संत महात्म्य,
आत्मिक शांतता, अविट गोडीचा महाप्रसाद,
जीवा भावाचे मित्र, या अष्टकातून फुलेनगरचे एक मोठे कुटुंबच उभे राहते व खांद्याला खांदा लावून सर्व जण या सप्ताहासाठी झटत असतात. हा सप्ताह म्हणजे, सुख दुःख शेअर करायला मिळते विचारांची देवाण घेवाण होते.
चांगल्या वाईटाची जाणिव होते अखंड हरिनाम सप्ताह काय शिकवजतो! संयम, स्वयं शिस्त, विचार करण्याची बुद्धी, नियमितपणा, नियोजन, घेण्यापेक्षा देण्यावर भर, दृष्टीकोन सहकार्याची भावना हा अमुल्य ठेवा या सप्ताहातून सर्वाना मिळत असतो माझ्या मते हा सप्ताह सर्वांना विचार करायला ही शिकवतो राम कृष्ण हरी !

# स्मरणीय क्षणांची 'जागृतिस्वप्ने'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**एका विशिष्ट स्थलकालात पात्रांच्या परस्परसंबंधातून घडलेल्या घटनांचे विशिष्ट हेतूने केलेले उत्कंठावर्धक चित्रण म्हणजे कथा होय. मानवी समुहात कथाकथनाची परंपरा पुर्वापार चालत आली आहे. कथाबीज, कथानक, पात्रे, घटना- प्रसंग, स्थळ- काळ - वेळ, त्यांची बोली, व्यक्तिमत्त्व या घटकांनी कथा परिपूर्ण होत असते. कथा वाचताना वाचक त्यातील पात्रे, घटना, कथेतील प्रसंग यांच्याशी भावनेने जोडला जातो. लेखक आपल्या कल्पनाशक्तीने ते कथानक फुलवत असतो.**

आजुबाजुला वावरणाऱ्या अनेक व्यक्तीना आपण पाहत असतो. अशीच पात्रे आपल्याला कथांमध्ये सापडतात. लेखकाला ही पात्रे आयुष्याच्या प्रवासात कुठे ना कुठे भेटलेली असतात. शेवटी अनुभव हाच मोठा शिक्षक असतो. कथात्म साहित्याचा हा प्रकार खुप रंजक आहे. त्यातून दीर्घ कथा, लघुकथा जन्मल्या. ग्रामीण कथा, दलित कथा, विज्ञान कथा, साहस कथा असे कथेचे अनेक प्रकार निर्माण झाले.
गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे, व्यंकटेश माड़गूळकर, जी.ए. कुलकर्णी, दिवाकर कृष्ण अशा अनेक लेखकांनी कथा या साहित्यप्रकारात मोलाची भर घातली. ह्याच साखळीचा भाग होण्याचा आणि कथेला सुंदर आज चढ़वण्याचा प्रयत्न लेखक पुरुषोत्तम आचार्य यांनी केला आहे. 'जागृतिस्वप्ने' हा लेखक पुरुषोत्तम आचार्य यांचा पहिला कथासंग्रह.
जागृतिस्वप्ने या शीर्षकापासूनच पुस्तक वाचनाची ओढ़ निर्माण होते. ज्या गोष्टी आयुष्यात अनपेक्षितपणे घड़तात ती स्वप्नवतच वाटतात. नाही का ! शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या कथासंग्रहात आठवणींची शिदोरी आहे. नोकरीच्या निमित्ताने लेखकाची अनेक ठिकाणी बदली झाली. पण कोकणातलं वास्तव्य त्यांना अनेक अनुभव देऊन गेलं, अनेक जीवाभावाची माणसे भेटली. त्या अनुभवांचा, आठवणींचा स्वप्नवत वाटणारा प्रवास म्हणजे 'जागृतिस्वप्ने'. प्रथम पुस्तकाची अनुक्रमणिका पाहिली तर त्यात अनेक खाद्यपदार्थांची नावे दिसतात. नाचणीची भाकरी, आमरस, खोबऱ्याच्या वड्या, सोलकढ़ी, तांदळाची भाकरी इत्यादी. ही नावे वाचून थोड़ा आश्चर्य वाटेल. पण ह्या प्रत्येक पदार्थांसोबत त्या त्या खास आठवणी जोडल्या गेल्या आहेत. प्रथम पुरुषी निवेदन असलेल्या या पुस्तकातील कथांमध्ये पदोपदी भेटतो तो निसर्ग. लेखक हा संवेदनशील आहे , निसर्गात रमणारा आहे, प्रत्येक क्षणाचा तो आनंद घेतो आणि कृतज्ञता हा भाव व्यक्त करताना लेखक कुठेही डगमगत नाही.
कोकण म्हणजे स्वर्ग असे म्हटले जाते. समुद्रकिनारा, नारळाची झाडे, कौलारू घरे, तेथील संस्कृती, खाद्य संस्कृती, पेहराव, सण- उत्सव सगळेच फार सुंदर. या कथासंग्रहात लेखकाने कोकणातील निसर्गसौंदर्य इतके सुंदर पध्दतीने रेखाटले आहे की, पुस्तक वाचताना वाचक त्यात गुंततो. संपूर्ण दृश्य तो मनात कल्पतो. या कोकण वास्तव्यात लेखकाला अनेक अनुभव आले. ज्या लोकांशी आपले कोणतेही नाते नसले तरी काही नाती आपलेपणाने निर्माण होतात. या प्रवासात लेखकाला अशा अनेक व्यक्ति भेटल्या ,ज्यामुळे त्यांना माणुसकीचे दर्शन घड़ले. कोकणातील एक खास वैशिष्ट्य म्हणजे तेथील प्रेमभाव, आपुलकी.. घरात कोणीही पाहुणा आला तरी यथासांग पाहुणचार केल्याशिवाय त्याला जाऊ देतच नाहीत. आपल्याकडे जे काही असेल त्यातील एकमेकांना देणे, ही संस्कृती... निरोप देताना सुद्धा कोकणातील खाऊ शिदोरी म्हणून दिला जातो. खरेच ही आपुलकी, मदत करण्याची वृती ह्या सगळ्या भावना लेखकाने अनुभवल्या आहेत आणि तेच त्यांच्या लेखणीतून सहजपणे ओघवत्या शैलीत उतरले आहे.




सहज, साधी कथा सांगण्याची लेखकाची शैली मनोवेधक आहे. त्यामुळे पुस्तक संपूर्ण वाचल्याशिवाय खाली ठेववत नाही. कुठेही पात्रांचा भड़ीमार नाही. अगदी नेमक्या पध्दतीने लेखकाने लेखन केले आहे. हे पुस्तक म्हणजे नुसती गोष्ट नाही बरे! यात निसर्गभ्रमंती आहे, विविध स्वभावांच्या व्यक्ती आहेत, त्या त्या पात्रांचे व्यक्तिचित्रणही यात अगदी समर्पक केले आहे. जागेपणी पडलेली ही सुंदर स्वप्ने,स्मृति लेखकाने मनात जपुन ठेवल्या होत्या, त्या स्मृति पुस्तकाद्वारे कायमच्या शब्दबद्ध झाल्या आहेत. या पुस्तकाला प्रकाशक प्रा. संतोष राणे यांनी मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ मानसी एकबोटे यांनी सजवले आहे. मुखपृष्ठ फार मनोहारी आहे. विद्या आचार्य यांनी पुस्तकाची पाठराखण केली आहे. अशा सुंदर आठवणींचा भाग होण्यासाठी हे पुस्तक वाचलेच पाहिजे.
**( जागृतिस्वप्ने / पुरुषोत्तम आचार्य / शारदा प्रकाशन / मूल्य : १४० रुपये )**



# यश आणि नशिब

आधुनिक केसरी

यशस्वी होण्यासाठी प्रयत्न आणि मेहनतीला दुसरा पर्याय नाही. परंतू कधी कधी अपार मेहनत करूनही इच्छित यश मिळतेच असे नाही तेव्हा आपण थकून जातो. आपल्या आत्मविश्वासाला तडा जातो आणि नकळत आपण नकारात्मक विचारांच्या बाजूने वळू पहातो. प्रयत्नांना नशिबाची साथ मिळाली की माणूस यशस्वी होतो. हे वाक्य खुप प्रसिद्ध आहे. प्रयत्न आपण करू शकतो पण नशिब कुठून आणायचे. हे नशिब म्हणजे नेमकं काय..? इथे मात्र प्रत्येक जण निरूत्तर होतो. प्रयत्नांना नशिबाची साथ आणायची कुठून हा प्रश्न तसाच शिल्लक रहातो. मित्रांनो, हे नशिब म्हणजे दुसरं तिसरं काही नसून आपली आंतरीक तळमळ, आपल्यातला सकारात्मक दृष्टिकोन असतो. संपूर्ण विश्वासाने जर एखाद्या कामात स्वतःला झोकून दिलं आणि येणाऱ्या प्रत्येक समस्येवर मात करण्याचा दृढनिश्चय केला तर यशस्वी होणे सहज शक्य आहे.सतत जर अपयश येत असेल तर नक्की समजून जा आपले प्रयत्न कुठेतरी कमी पडत असावेत किंवा यशाकडे जाणारा मार्गच चुकला असावा.



जयेश अर्जुन माधव
संपर्क 9167710614

# कुणाला कमी समजू नये

आधुनिक केसरी

एका गावामध्ये एक खूप चांगले पंडित राहत होते. एकदा नेपाळचे राजे सामान्य वेशात पंडितांमागे फिरू लागले, माझ्या आजोबांचे पिंडदान करून द्या, माझ्याजवळ काहीच पैसे नाहीत. थोडेसे लाडू भरून आणलेत तेच दक्षिणा म्हणून स्वीकार करून घ्या. जे लोभी पंडित होते त्यांना पैशाची हाव होती त्यांनी या सामान्य वेशातील राजांना नकार दिला. अशा वेळेस राजांना तेथील एक पंडित गाठ पडला. त्याला महाराजांनी पिंडदान करण्याची विनंती केली. त्याने ती कबूल केली. तो म्हणाला, भाऊ! पैशाची काही बाब नाही. मी पिंडदान करून देतो.

त्या पंडिताने फाटक्या तुटक्या कपडयात आलेल्या राजांचे पिंडदान पूर्ण करून दिले. यावर महाराज खूश झाले. त्या वेळेस ते त्याला म्हणाले, पंडितजी! या कार्यानंतर काही न काही दक्षिणा मी तुम्हास देणे लागतो. मी घरून काही लाडू आणले आहेत त्याचा तुम्ही स्वीकार करावा. मात्र या लाडूचे गाठोडे तुम्ही घरी जाऊन उघडावे.

पंडित म्हणाले, बरं भाऊ, तुम्ही गरीब दिसता पण तुम्ही प्रेमाने दिलेल्या लाडूचा मी स्वीकार करतो. या नंतर पंडितास ते गाठोडे देऊन राजे निघून गेले. पंडिताने घरी जाऊन जेवायला बसायची तयारी केली. अचानक त्याला लाडूची आठवण झाली त्यावर त्याने ते गाठोडे सोडून पाहिले असता तो चकित झाला. कारण त्या गाठोडयात वीस सोन्याचे लाडू होते.

**तात्पर्य :** कधीही कुणाला कमी समजू नये कारण कोणत्या रुपात कोण असेल याचा भरवसा नाही.

# भावासाठी बहिणीने यमदुताला हरविले... नांदेडच्या लक्ष्मीचा पराक्रम !!

आधुनिक केसरी

विजेच्या तारेला चिकटलेल्या लहान भावाला



राजू जाधव
मांगूर, जि.बेळगांव

वाचविण्यासाठी चक्क यमदुताला हरवणाऱ्या बिलोली तालुक्यांतील थडीसावळी येथील १३ वर्षीय लक्ष्मी येडलेवार या विद्यार्थिनीला यंदाचा राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार जाहीर झाल्याची बातमी वाचनात आली नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील थडीसावळी येथील लक्ष्मी येडलेवार असे पुरस्कार प्राप्त करणाऱ्या मुलीचे नांव आहे २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी दिल्लीत हा पुरस्कार लक्ष्मीला प्रदान करण्यात येणार आहे.थडीसावळी येथे लक्ष्मी घरात अभ्यास करत असताना चुलत भाऊ आदित्यचा ओरडण्याचा आवाज आला. लक्ष्मीने बाहेर येऊन पाहिले तर आदित्य हा विजेच्या तारेला चिकटलेला दिसला. क्षणाचाही विचार न करता त्याच्या दिशेने धावली भावाचा शर्ट पकडून त्याला बाजूला खेचून काढले लक्ष्मीने धाडस दाखवले मात्र यावेळी लक्ष्मीचा तारेला स्पर्श झाल्याने ती बेशुद्ध पडली. त्यानंतर तिच्यावर आणि आदित्यवर रुग्णालयात उपचार करण्यात आले.

या दोघांचाही जीव वाचला. लक्ष्मीने दाखविलेल्या धाडसाची चर्चा गावभर पसरली होती ग्रामपंचायतीच्या वतीने तिचा सत्कार देखील करण्यात आला लक्ष्मीने जिवाची बाजी लावून लहान चुलत भावाचा जीव वाचवला. केंद्र सरकारने लक्ष्मीच्या धाडसाची दखल घेत तिची बाल शौर्य पुरस्कारासाठी निवड केली आहे. तिला प्रजासत्ताक दिनी दिल्लीत पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. लक्ष्मीला मिळालेल्या पुरस्काराने तिच्या पालकांसह पंचक्रोशीत आनंद व्यक्त केला जात आहे.भारत सरकारकडून शौर्य गाजवणाऱ्या बालकांना हा पुरस्कार दिला जातो लक्ष्मी येडलेवार या विद्यार्थीनीला पुरस्कार जाहीर झाल्याने आणि लक्ष्मीने दाखविलेल्या धाडसाची देशपातळीवर दखल घेतल्याने तिच्या गावगाड्यात



आनंदाचे वातावरण पसरले आहे या शौर्य पुरस्काराने आत्मविश्वास वाढलेल्या लक्ष्मीला आगामी काळात खुप शिकून डॉक्टर किंवा कलेक्टर व्हायची इच्छा असल्याचे तिने बोलून दाखविले आहे येत्या २६ जानेवारी रोजी देशाच्या राजधानीत हा पुरस्कार लक्ष्मीला प्रदान केला जाणार आहे निश्चितच लक्ष्मीने भावाला वाचविण्यासाठी दाखविलेले धाडस इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल हे मात्र नक्की !!

# शिवसेना -वंचित आघाडी एकत्र आल्याने धुळ्यात जल्लोष

## एकत्र येऊन एकमेकांना शुभेच्छा देत केला आनंद साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गेल्या कित्येक दिवसापासून वंचित बहुजन आघाडी व शिवसेना एकत्र येण्याची चर्चा सुरू होती परंतु वंचित बहुजन आघाडीचे मा.प्रकाश आंबेडकर यांच्या युती संदर्भात काही मागण्या व अडचणी असल्यामुळे हा विषय कित्येक दिवसापासून प्रलंबित होता. परंतु सोमवारी बाळासाहेब आंबेडकर व शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांची पत्रकार परिषद घेण्यात आली. त्या पत्रकार परिषद मध्ये युतीची घोषणा केली गेली. त्याच प्रकारे धुळे जिल्ह्यात युती संदर्भात आनंदा साजरी करण्यात आला या ठिकाणी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दोन सज्जन व्यक्ती एकत्र आले व विरोधकांच्या मनात धडकी भरली. येणाऱ्या महाराष्ट्रमध्ये ज्या विधानसभा निवडणुका असतील यामध्ये आमच्या दोन्ही पक्षांची ताकद शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडी ताकद ही भारतीय जनता पार्टीला दाखवून देऊ व धुळे जिल्ह्यात जो भ्रष्टाचार चालू आहे त्या संदर्भात शिवसेना आक्रमक तर आहे. परंतु आता दोघी पक्ष एकत्र येऊन खांद्याला खांदा लावून भ्रष्टाचाराला लढा देऊ असे किरण जोंधळे यांनी सांगितले. ज्यावेळेस आक्रमक आणि अभ्यासू एकत्र येतात तेव्हा इतिहास घडल्याशिवाय राहत नाही शिवशक्ती आणि भीमशक्ती पुन्हा एकदा एकत्र आल्याने आमदार खासदार पालिका किंवा इतर निवडणुकांसाठी आम्ही सर्व एकत्र येऊन एकजुटीची ताकद दाखवून देऊ असे वंचित आघाडीचे धुळे जिल्हा संघटक शंकर खरात म्हणाले. या वेळी शंकर खरात, किरण जोंधळे, डॉ. सुशील महाजन, अतुल सोनवणे,धीरज पाटील, कैलास पाटील, संदीप सूर्यवंशी,किरण गायकवाड, महेंद्र बोरसे, नितीन म्हसदे, प्रवीण साळवे, सुरेश लोंढे, व इतर असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# प्रकाश क्षीरसागर राष्ट्रीय कविसंमेलनात

आधुनिक केसरी न्यूज



**पणजी :** इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रांगाझा या येथील सरकारी संस्थेतर्फे घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय कविसंमेलनात ज्येष्ठ गोमंतकीय साहित्यिक प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांच्या कवितांची निवड करण्यात आली आहे. येत्या २५ जानेवारी, २३ रोजी दुपारी तीन वाजता इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझाच्या सभागृहात प्रो. नरेश सक्सेना यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कविसंमेलनात ते आपल्या रचना सादर करतील. प्रकाश रामचंद्र क्षीरसागर हे गोव्यातील नामवंत साहित्यिक असून त्यांचे सद्गुरू सीताराम महाराज चरित्रामृत, गर्भावल्या संध्याकाळी, मातीचे डोहाळे, झेलून दुःख माझे गेला खचून रस्ता (गझल संग्रह), जमाना बदलल्याचं चिन्ह दुसरं काय (कवितासंग्रह), कवितेच्या जन्मावेळी, दहकता अंगार आहे हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांना त्यासाठी विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. माणसांची खैर नाही हा ललितसंग्रह कर्नाटक विद्यापीठात अभ्यासक्रमात असून त्याशिवाय आजि म्या कृषक पाहिला हा कथासंग्रहही प्रकाशित आहे. शिवाय माणसांची हाव सांगा संपणार तरी कधी व कृतज्ञ पशु आणि पक्षी आनंदते सृष्टी हे ललित वैचारिक लेख संग्रह प्रकाशित आहेत.



# 'होम मिनिस्टर' कलेचा अविष्कार : सिनेमास्टार घाटसावळीकर

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** माजलगावमध्ये राजस्थानी मल्टीस्टेट व क्युरेस किड्स व बन्सल कोचिंग क्लासेस यांच्या वतीने संक्रांत सणानिमित्त सुंदर अशा खेळ, उखाणे, गीत, विविध स्पर्धा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिनियस होम मिनिस्टर पुणे यांचा हा कार्यक्रम भरगच्च कार्यक्रमांनी माजलगाव शहरातील महिलांसाठी हळदीकुंकू च्या निमित्ताने साजरा करण्यात आला. या मध्ये प्रथम बक्षिस पैठणी साडी कलंत्री अर्चना यांनी पटकावली तर दुसरे बक्षिस कुकर अंकिता भुतडा यांनी मिळवले. तिसरे बक्षीस अर्चना करवा यांना मिळाले. उत्तेजनार्थ बक्षीसे एकोणीस शेवट प्रर्यत स्पर्धा मध्ये टिकून आपले कर्तृत्व दाखविणाऱ्या महिलांना देण्यात आले. भरगच्च महिला असलेल्या कार्यक्रमात सगळ्यांनी गीतांचा, खेळांचा आनंद लुटला. या कार्यक्रमाचे सुंदर व अति बहारदार सुत्र संचालन संतोषकुमार जेथलिया यांनी केले. या कार्यक्रमात मंगलताई सोळंके यांनी हजेरी लावुन महिलांचा उत्साह वाढवला. हा कार्यक्रम घेण्यासाठी. अर्चना जेथलिया, मंगल भुतडा, पुनम मुंदडा, सुरेखा जेथलिया, दीपा जेथलिया, हेमा लडडा, अनिता मुंदडा, उज्वला कदम, लोढा, डॉ. उर्मिला जाजू, अनिता बियाणी, इत्यादी महिलांनी हा कार्यक्रम सुंदर व नियोजन पद्धतीने घेतला.

# वाहनांच्या कर्णकर्कश आवाजाने अपघात वाढले; जि.प.सदस्य जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे जळगाव शहरातून सुसाट बुलढाणा व औरंगाबाद, कडे धावणाऱ्या वाहनांच्या कर्णकर्कश आवाजामुळे फर्दापूर शहराची शांतता भंग होत आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. याकडे लक्ष देऊन कर्णकर्कश आवाज करणाऱ्या दुचाकी वाहनचालकावर कारवाई करावी असे शहरातील सुज्ञ नागरिकांतून बोलले जात आहे. शहरातील मुख्य रस्त्यावरून तसेच महाविद्यालय परिसरातील रस्त्यावरून कर्णकर्कश आवाजाची वाहने सुसाट वेगाने धावत असतात, दिवस आणि रात्री ध्वनी प्रदूषणाची ही पातळी किती असावी हे पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार ठरवून दिलेले आहे. याचे जाणून-बुजून उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस मोटर वाहन कायद्यानुसार आर्थिक दंडाची तरतूद केली आहे. त्यामुळे ज्या माध्यमातून ध्वनी प्रदूषण होऊ शकते, त्या सर्वांना हा कायदा लागू आहे, मात्र ध्वनी प्रदूषणाचा कायदा अस्तित्वात असूनही या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे आहे. याचे मानवी जीवनावर व दिसून येत आहे. ध्वनी प्रदूषण पर्यावरणावर गंभीर परिणाम होत होत असताना व सुसाट वेगाने असल्याचे दिसून येत आहे. धावणाऱ्या वाहनांवर अद्यापही वेगावर मर्यादा आणणे कारवाई होत नाही. यामुळे आवश्यक** मोठ्या टवाळखोर युवकांच्या दुचाकी आवाजामुळे मानवी जीवनावर वाहनाचे अपघात होण्याची विपरीत परिणाम होतो. सततच्या शक्यता नाकारता येत नाही. धूम मोठ्या आवाजामुळे कानाची स्टाईल मध्ये गाड्यांचे वेड मेंदूला जोडणारी नस हळूहळू असलेल्या काही मुलांनी कमजोर होऊन नकळतपणे बधीर दुचाकींना फॅन्सी सायलेन्सर व पणा येतो. त्यामुळे व्यक्तीमध्ये अशा जीवन जगणे असह्य केले आहे.

# शिक्षिकेचे मंगळसूत्र पळवले

आधुनिक केसरी न्यूज

**बदलापूरः** हळदी कुंकवाचा कार्यक्रम आटोपून घरी परतणाऱ्या एका शिक्षिकेचे मंगळसुत्र दोन दुचाकीस्वार चोरट्यांनी लांबवले आहे. बदलापूर पूर्वेतील छत्रपती शिवाजी चौक ते महात्मा गांधी चौक रस्त्यावर हा प्रकार समोर आला. यावेळी त्यांना अडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना गाडीने उडवून देण्याची धमकीही चोरांनी दिली. या प्रकारानंतर परिसरात खळबळ पसरली असून बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गीतांजली देवेंद्र समुद्र या शिक्षिका गोळेवाडी परिसरातून हळदी कुंकवाचा कार्यक्रम आटोपून आपल्या घरी जात होत्या.

# परदेशातील शेतकऱ्यांसारखा माझा शेतकरी बाप कधी समृद्ध होणार ?

## पुष्पाताई बोंडे : 10 वे अखील भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** 10 वे अखील भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन मोझरी जिल्हा अमरावती येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्मृतिस्थळावर दिनांक 21 व 22 जानेवारी रोजी पार पडले. समारोप सत्राच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ट शेतकरी नेते माजी आमदार ऍड. वामनराव चटप, प्रमुख पाहुणे गुरुदेव सेवा मंडळाच्या राष्ट्रीय अध्यक्षा मा. पुष्पाताई बोंडे, श्री. लक्ष्मणराव गमे, डॉ. विजय बोंडे संमेलनाचे कार्याध्यक्ष गंगाधर मुटे, आयोजक दिलीप भोयर हे व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रथम विश्वस्तरीय लेखनस्पर्धेत विजेते स्पर्धक व पत्रकार पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

यानंतर मान्यवरांच्या भाषणात मा. पुष्पाताई बोंडे म्हणाल्या, संत तुकडोजी महाराजांच्या पदस्पर्शाने व याच सभागृहात अनेक वेळा घुमलेल्या त्यांच्या वाणीने पावन झालेल्या या सभागृहात आज शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी साहित्यिकांच्या साहित्याने वाचा फोडण्यासाठी व सरकारला शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी भाग पाडायला लावणारे हे 10 वे अखील भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन गंगाधर भाऊ यांनी येथे आयोजित केले. हे खरोखर कौतुकास्पद आहे. या संमेलनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या दशा, शेतकऱ्यांचा आवाज, शेतकऱ्यांच्या अवहेलना, शेतकऱ्यांच्या नापीक जमिनी म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्या, या शेतकऱ्यांच्या जगण्याला वाचा फोडण्याचे आणि त्यांच्या जगण्याला दिशा देण्याचे काम ही शेतकरी चळवळ, हे शेतकरी साहित्य संमेलनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावरती लेखन स्पर्धा, परिसंवाद, कविसंमेलन, गजल मुषायरा या माध्यमातून साहित्यिक व या संमेलनास आलेले पत्रकार बांधव करत आहेत. म्हणून माझा या सर्व चळवळीला सलाम आहे. जगातील अनेक देशातील शेती नोकरीनिमित्त फिरतांना मी पाहिली असता परदेशातील एक शेतकऱ्यांचे उदाहरण देताना




त्यांनी सांगितले की, 30 हजार एकर शेती एक शेतकरी सांभाळत असताना एकटा शेतकरी एअर कंडीशन ट्रॅकरमध्ये बसून एकाच वेळी 40 पंपाच्या साहाय्याने एकाच वेळी 25 एकर शेतीत एकाच वेळी फवारणी करतो. तर इकडे माझा शेतकरी पाठीवर पाणी,हातात फवारणीचे यंत्र, तोंडाला फडके बांधून फवारणी करतो. बोलतांना वाणी धजत नाही,अंगावर शहारे येतात, मग प्रश्न पडतो. परदेशातील आधुनिक यंत्रसामुग्रीने युक्त असा सुखी सधन माझा शेतकरी बाप कधी होणार ? ही आर्त हाक पुष्पाताई बोंडे बोलताना व्यक्त करतात. कार्यक्रमास महाराष्ट्रातील साहित्यिक मोठया संख्येने उपस्थित होते. आभार गणेश मुटे यांनी मानले.

**कष्टतो इथे मी फक्त भाकरीसाठी**
अखिल भारतीय मराठी शेतकरी संमेलनात विविधांगी गझल रंगल्या
कोणीतरी यांची पडजीभ छाटली पाहिजे , नाटकी बोलतात साले
की, गरिबी हाटली पाहिजे . .

...........................................

**आणि आज माझ्या कापसाला भाव द्या**
मग भलेही शहराला तुमचे नाव द्या . .
अशा एकापेक्षा एक सरस आणि खुमासदार गझलांनी उपस्थित रसिकांच्या मनाचा ठाव घेतला . कविसंमेलनाचे अध्यक्षस्थानी साहित्यिक राजेंद्र फंड व कवियत्री धनश्री पाटील व संयोजक गंगाधर मुटे यांच्यासह अनेक नामवंत कवी आणि गझलकार उपस्थित होते .

# कुंभाची तयारी अंतिम टप्प्यात; दहा लाख भाविक येण्याचा अंदाज

## सहा दिवसीय कुंभात विविध राष्ट्रीय संत महात्मे भाविकांना मार्गदर्शन करणार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** येत्या २५ ते ३० जानेवारी दरम्यान गोद्री येथे अखिल भारतीय हिंदू गोर बंजारा व लबाना नायकडा समाज कुंभ होत आहे. या कुंभाची सर्व व्यवस्थात्मक तयारी पूर्ण होत आली आहे. धर्म स्थळ, कुंभ स्थळ, निवास व्यवस्था, वाहन तळ, यातायात, भोजन व्यवस्था इ. व्यवस्था पूर्ण होत आल्या आहेत. या सहा दिवसीय कुंभात विविध राष्ट्रीय संत महात्मे भाविकांना मार्गदर्शन करण्यासाठी येणार आहेत आणि साधारण १० लाख भाविक या सहा दिवसीय कुंभ सोहळ्यात येतील असा अंदाज आहे. तेलंगना, कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्यप्रदेश व महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून बंजारा, लबाना व नायकडा समाज येणार आहे. या पार्श्वभूमीवर माध्यमांना माहिती देण्यासाठी नुकतीच पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेला अखिल भारतीय हिंदू गोर बंजारा व लबाना समाज कुंभ संचालन समितीचे अध्यक्ष पूजनीय श्याम चैतन्य महाराज यांनी संबोधित केले. यावेळी कुंभ जनजागृती समिती चे अध्यक्ष भानुदास चव्हाण सुद्धा उपस्थित होते.

पूज्य श्याम चैतन्य महाराज म्हणाले बंजारा समाज हा हिंदू धर्म जाणणारा व मानणारा समाज आहे. परंतु बंजारा समाजाला धर्मांतरण करण्यासाठी लक्ष केले गेले आहे. संतांच्या संपर्कातून माहित झाल्यानुसार ३५०० तांड्यामध्ये प्रत्यक्ष ख्रिश्चनीकरण सुरू झाले आहे किंवा ख्रिश्चनांशी संपर्क आल्याने त्यांनी हिंदू संस्कार सोडले आणि चर्च मध्ये जात आहेत. पण आपल्या दाखल्यावर ST किंवा NT लिहून घेतात असे सुद्धा छुपे ख्रिश्चन आहेत.

काही जण गोर धर्म हा स्वतंत्र धर्म असून बंजारा हिंदू नाहीत असा अपप्रचार करत आहेत. लातूर येथे बंजारा समाजाने हिंदू संस्कार सोडावे आणि गोर धर्मीय संस्कार अंगीकारावे म्हणून दबाव टाकण्यात आला आहे. बंजारा समाजाचे होणारे ख्रिस्तीकरण रोखण्यासाठी आणि समस्त बंजारा, लबानाव नायकडा समाज एकत्र येण्यासाठी २५ ते ३० जानेवारी दरम्यान हा कुंभ होत आहे व त्याचे आयोजन संतांनी आणि बंजारा समाजाने केले आहे. कुंभ आयोजन निश्चित झाल्यावर त्या त्या गावातील नाईक आणि कारभारी यांचे तांडाशः एकत्रिकरण ९५०० तांड्यावर झाले. यासाठी बंजारा समाजाचे २१८ कार्यकर्ते पुर्णपणे ३ महिन्यापासून सेवा देत आहे. तसेच बंजारा समाजाचे ४०० संत जागरणासाठी तांड्यावर फिरले आणि त्यात्या क्षेत्रात छोट्या मोठया ५५०० बैठका व संमेलन झाले. प. पू. बाबूसिंग जी महाराज, प.पू. गोपालजी चैतन्य महाराज, प.पू. सुरेशजी महाराज , श्री. श्यामजी चैतन्य महाराज, प.पू.महंत १००८ श्री रामसिंग महाराज, प.पू.१००८ श्री श्री चंद्रसिंगजी महाराज हे संत अनेक गावी जाऊन त्यांनी भेटी दिल्या आहेत व समाजाशी प्रत्यक्ष संपर्क साधला आहे.


पाचशे एकर क्षेत्रात गोद्री कुंभाची जय्यत तयारी सुरु; दहा लाख भाविक येण्याचा अंदाज सात नगरांची निर्मिती, पन्नास हजार भाविकांची निवास व्यवस्था होणार, जामनेर तालुक्यातील गोद्री येथे पाचशे एकर क्षेत्रात अखिल भारतीय हिंदू गोर बंजारा व लबाना नायकडा समाज कुंभाच्या तयारीला वेग आला असून भाविकांच्या निवास व्यवस्थेसाठी सात नगरांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये पन्नास हजार भाविकांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच दिवसभरात कुंभमेळ्यात येणार्‍या दीड लाख भाविकांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यासाठी भोजन तयार करण्यासाठी सात मोठी स्वयंपाक घरे उभारण्यात आली आहेत. अडीचशे एकरच्या मंडपातील गोद्री कुंभात सहा डोम व नव्वद संत कुटीया उभारण्याचे काम सुरू आहे. त्यात मुख्य सभागृहाचा डोम जर्मन हँगर उज्जैन येथून येणार आहे. कुंभात सभा मंडपाचा डोम हा मुख्य डोम असणार आहे. याठिकाणी विशेष मान्यवर येणार असल्याने त्यादृष्टीने त्यांची उभारणी करण्यात येणार आहे.

**भोजन वितरण व्यवस्था :** गोद्री येथील कुंभमेळ्यात दाखल होणाऱ्या भाविकांसाठी दिवसभर अन्नक्षेत्रात भोजनाची व्यवस्था असणार आहे. कुंभस्थळी मुख्य सभामंडपाच्या समोरील बाजूस ही भाविकांसाठी भोजनाची व्यवस्था आहे. त्यात दररोज दीड लाखापेक्षा अधिक भाविक दिवसभरात भोजन करतील, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

**चार हेलीपॅडची उभारणी :** सहा दिवसीय कुंभासाठी देशभरातून विविध राष्ट्रीय संत, राजकीय नेते, मंत्री तसेच विशेष अतिथी येणार आहे. येणाऱ्या प्रमुख पाहुण्यांच्या सोयीसाठी चार हेलीपॅडची उभारणी करण्यात येत आहे.

**महिलांसाठी स्वतंत्र नगराची निर्मिती :** कुम्भासाठी दहा लाख भाविक तेलंगाना, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक व महाराष्ट्र या राज्यातून येणार आहेत. त्यांच्या सोयीसाठी सात नगरांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यापैकी एक स्वतंत्र नगर महिलांसाठी असणार आहे. तसेच अडीच ते तीन हजार महिलांसाठी राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या नगरात मंडपात निवास व्यवस्थेसह अंघोळीसाठी स्नानगृहे साकरण्यात येत आहेत. त्यात पिण्याच्या पाण्यासह अत्याधुनिक पध्दतीच्या शौचालयाची उभारणी करण्यात आली आहे.

# डॉ. छाया महाजन यांच्या पुस्तकाचे पुणे येथे प्रकाशन




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठी वाङ्‌मय क्षेत्रातील ख्यातनाम लेखिका प्रा. डॉ. छाया महाजन यांच्या प्रदीर्घ लेखन प्रवासातील चाळीसावे पुस्तक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पुणे येथे सोमवार दि. 30 जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. नवी पेठ येथील पत्रकार भवनात सायंकाळी साडेपाच वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर हे भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी हे उपस्थित राहणार आहेत. साकेत प्रकाशनच्या वतीने आयोजित या पुस्तक प्रकाशन समारंभास साहित्य प्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन साकेत भांड आणि प्रतिमा भांड यांनी केले आहे.

# हजरत सय्यद जमालशाह वली उर्स उत्सव कमिटीची कार्यकारणी घोषित

## यंदा जश्न-ए-फुलंब्री म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा होणार उर्स

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरातील ग्राम दैवत व हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेले हजरत सय्यद जमाल शाह वली (रह) दर्गा शरीफ यांचा उर्स शरीफ यंदा १० फेब्रुवारी रोजी साजरा होणार आहे. उर्सा निमित्त 9 फेब्रुवारी रोजी संदल शरीफचा कार्यक्रम असणार आहे.

यंदा 9 ते 12 फरवरी पर्यंत असे चार दिवस विविध कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहाने उर्स साजरा करण्यात येणार आहे. उर्स शरीफ च्या निमित्ताने येथील नागरिकांनी रविवारी 22 जानेवारी रविवार रोजी दर्गाह परिसरात बैठक घेऊन उर्स उत्सव समितीच्या कार्यकारणीची निवड करुन घोषित केली आहे. या वेळी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अयुब पटेल, कार्याध्यक्षपदी शाकेर पटेल आणि उपकार्याध्यक्षपदी भगवान गंगावणे यांची निवड करण्यात आली आहे तर उपाध्यक्ष पदी संजय प्रधान, रिजवान खान, तर कोषाध्यक्ष पदी हरिदास घडामोडे, उप कोषाध्यक्ष पदी प्रशांत नागरे, सह कोषाध्यक्ष पदी राजू शहा, सचिव पदी उमेश दुतोंडे, उपसचिव पदी समाधान कुडके, सहसचिव पदी शाहेद पटेल, सरचिटणीस पदी अजय गंगावणे,उप सरचिटनीस पदी कृष्णा ढोके,सहसरचिटणीस पदी मोसीन हुसैनी, संघटक पदी जावेद खान, उपसंघटक पदी जमाल शेख यांची निवड सर्वानुमते करण्यात आली असून सर्व शहरवासीयांना सदस्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर बैठकीत हजरत सय्यद जमाल शाह वली यांचा उर्स शरीफ जश्न-ए-फुलंब्री म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. समितीतर्फे उर्स निमित्त महफिल-ए-समां, कव्वाली मुकाबला, मॅट कुस्ती स्पर्धा, बाईक रेसिंग स्पर्धा सह आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून यंदा 9 ते 12 फेब्रुवारी असे चार दिवस विविध कार्यक्रमांसह उर्स शरीफ मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येणार आहे.





या बैठकीत उत्सव समितीचे सर्व सदस्य सहीत मुजावर मुजम्मील सिद्दीकी, इमरान खान, जमीर पठाण, आसिफ पटेल, इस्माईल खान, अकबर शाह, अझहर सय्यद, सय्यद जुल्फेखार, हाजी फिरोज पठाण, आरेफ पटेल, हाफिज मन्सुरी, शाकेर पठाण, गुड्डू शेख, हाजी सय्यद अन्वर, असलम शहा, शाहरुख शहा, दादाराव तुपे, हुसेन पटेल, फरहान शाह, इम्रान शेख साकिब अत्तार, अन्सार पटेल, सद्दाम शेख, रंगा भुईगड, एहसान कुरेशी, आमेर शेख, दरबार शाह, रफीक शेख, यांच्यासह शेकडो शहरवासी उपस्थित होते.

# पित्याला मान खाली घालावी लागेल असे गैर वर्तन करू नका : देवकीनंदन महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** देशातील तरुण मुलींची बदलत चाललेली मानसिकता अत्यंत विदारक आहे , देशातील तरुण मुलींनो आपल्या जन्मदात्या पित्याला तूमच्या गैर वर्तनाने समाजात वावरताना मान खाली घालुन जगण्याची वेळ कदापिही आणू नका, पित्याने तुमच्यासाठी केलेल्या कर्तव्याला जाग्या रहा व भारतीय सनातन धर्म, संस्कृती व नितीमूल्यांचे पालन करून हिंदू धर्माच्या तत्व नुसार जगा हीच सर्वात मोठी भेट तुमच्या पित्याला द्या असे कळकळीचे आवाहन सोमवार (ता.२३)रोजी वैजापूर येथील श्रीमद भागवत कथा कार्यक्रमात श्री देवकीनंदन ठाकूरजी महाराज यांनी चौथ्या दिवसाचे भागवत कथेचे पुष्प गुंफतांना विशाल संख्येने उपस्थित असलेल्या मुली, महिला व पुरुषांना केले,ते पुढे म्हणाले की,भारतीय संस्कृतीत महिलांना मोठे स्थान आहे. याचे भान ठेवत उपस्थित मंडळींना विशद केले की"ज्या कुटुंबात महिलांना तुच्छतेची, अपमानाची व हिनतेची वागणूक देऊन त्यांच्यावर हात उचलून त्यांच्यावर अन्याय केला जातो त्या घरात लक्ष्मी(धन) थांबत नाही, ज्या कुटुंबात स्त्रीयांचा सन्मान केला जातो तेथे देवतांची भ्रमंती असून लक्ष्मी(धन) तेथे भरभरून येते व टिकून राहते, भागवत कथेत आज भगवान श्रीकृष्ण यांचा जन्म दृश्य रुपात दाखविण्यात आला. या समयी कार्यक्रम स्थळी जमलेल्या पुरुष व महिला, मुलींनी नाचून,नाचून आपला आनंद व्यक्त केला. कथा आरंभी च सूत्र संचलन करताना जेष्ठ समाजसेवक ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांनी भारत सुपुत्र नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून उपस्थिताना दिनाचे महात्म्य विशद केले.



# बॅन्ड्समनची रिक्तपदे भरणार कधी ?

## उच्च न्यायालयाची गृहखाते व पोलिस महासंचालकांना विचारणा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** बॅन्ड्समनपदाची भरतीप्रक्रीया किती दिवसात राबवणार अहात ? याबाबत गृह विभाग तसेच राज्याचे पोलिस महासंचालक यांना उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने विचारणा केली आहे. औरंगाबाद येथील रहिवासी राजेंद्र बोर्डे व लातूर येथील रहिवासी सूरज म्हस्के या वादक कलावंतांनी दाखल केलेल्या रिट याचिकेत शासनास उद्देशून उच्च न्यायालयाने वरील सवाल केला.

याबाबत हकिगत अशी की, नोव्हेंबर 2022 मध्ये राज्य शासनाच्या गृह विभागाने पोलिस खात्यातील सुमारे 18,000 रिक्त पदांच्या मेगाभरतीसाठी जाहिरात प्रकाशित केली. तथापि, यात बॅन्ड्समन पदाच्या एकाही जागेचा समावेश नव्हता. पोलिस खात्यात राज्यभरातून जिल्हानिहाय बॅन्डपथके कार्यरत आहेत. खेरीज राज्य राखीव पोलिस बलाची 19 बॅन्डपथके व रेल्वे पोलिस दलाची चार बॅन्डपथके आहेत. घटनात्मक पदांवर कार्यरत अतिमहत्वाच्या व्यक्तींना सलामी देणे, ध्वजवंदना, मानवंदना देणे अशी दायित्व बॅन्डपथकांना पार पाडावी लागतात. बॅन्डपथकातील भरतीसाठी सर्वसाधारण शारीरिक पात्रतेचे निकष जसे की उंची व छाती यांच्या मापनासंबंधीचे मानके तुलनेने शिथीलक्षम असतात. राज्यभर मोठ्या प्रमाणात पोलिस खात्यास बॅन्ड्समन पदांची आवश्यकता असूनही मेगाभरतीत यापदांकडे दुर्लक्ष करण्यात आले, अशी व्यथा याचिकाकर्त्यांनी गृहखाते व पोलिस महासंचालक यांच्याकडे निवेदन सादर करून मांडली.

याचिकाकर्ते बोर्डे हे सॅक्सोफोन, क्लॅरिनेट, ट्रम्पेट, युफोनियम, साईड ड्रम वादनात पारंगत असून म्हस्के हे ट्रम्पेट वादनात निपुण आहेत. पात्रता असूनही आपण जाहिरातीअभावी रोजगाराच्या संधीस मुकणार अशी शंका याचिकाकर्त्यांना वाटल्याने त्यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली.

दरम्यान, राज्य पोलिस महासंचालक यांनी राज्यभरातील पोलिस आयुक्त व अन्य विभाग प्रमुखांना पत्रद्वारा विचारणा करून राज्यभरातून बॅन्ड्समनची सुमारे 1,480 पदे रिक्त असून सदर रिक्त पदे भरण्याबाबत येणाऱ्या संभाव्य खर्चाचे विवरण मागितले. यामुळे बॅन्ड्समन पदांची शासनास आवश्यकता असल्याचे स्पष्ट होत आहे, कालबध्द पध्दतीने सदर भरतीप्रक्रीया राबवल्यास यापदासाठी परिश्रम व रियाज करणाऱ्या हजारो उमेदवारांचे खाकी वर्दी परिधान करून देशसेवा करण्याचे स्वप्न साकार होईल, असे मुद्दे याचिकाकर्त्यांनी उपस्थित करण्यात आले.

याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकून मा. न्या. रविंद्र घुगे व न्या संजय देशमुख यांच्या खंडपीठाने वरीलप्रमाणे आदेश केला. गृह खाते व राज्य पोलिस महासंचालक यांनी याचिकेतील मुद्द्यांबाबत 10 फेब्रुवारी 2023 पर्यंत आपले म्हणणे सादर करावे असे न्यायालयाने म्हटले असून पुढील सुनावणी 20 फेब्रुवारी 2023 रोजी ठेवण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड चैतन्य धारूरकर हे काम पहात आहेत. शासनाच्यावतीने ॲड सुजीत कार्लेकर हे बाजू मांडत आहेत.



# अमृतमहोत्सव मशाल रॅलीचे उत्साहात स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयात दिनांक 24 जानेवारी रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आयोजित आझादी का अमृतमहोत्सव कार्यक्रमांतर्गत मशाल रॅलीचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. रॅलीच्या आगमनावेळी ह.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष मा.श्री परमेश्वर कदम साहेब, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते या मान्यवरांनी मशाल रॅलीचे महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर स्वयंसेवकाकडून मशाल घेऊन स्वागत केले. याप्रसंगी स्वयंसेवक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा दिल्या तसेच देशभक्तीपर गीतांच्या प्रसारणाने संपूर्ण वातावरण देशभक्तीमय झाले. याप्रसंगी विद्यापीठाने दिलेल्या शपथेचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्यानंतर रॅलीच्या संदर्भाने डॉ. विठ्ठल जायभाये यांनी भूमिका विशद केली. त्याचबरोबर रॅलीचे विद्यापीठ समन्वयक प्रा. डॉ.जयंत बोबडे यांनी रॅलीचे कार्यक्रम संक्षिप्त स्वरूपात कथन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते यांनी सर्व सन्माननीय व्यक्तींचे स्वागत करून अशा कार्यक्रमांची युवकांसाठी नित्य गरज असल्याचे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संतोष रनखांब यांनी तर आभार डॉ.मुकुंदराज पाटील यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर महाविद्यालयामध्ये रॅली सोबत आलेले पोस्टर प्रदर्शन भरवण्यात आले. महाविद्यालयाच्या सर्वच विद्यार्थ्यांनी पोस्टरचा मनमुराद आनंद घेतला. पोस्टर प्रदर्शन संपल्यानंतर राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली. या रॅली सोबत विद्यापीठ प्रतिनिधी डॉ.जयंत बोबडे, डॉ.प्रल्हाद भोपे डॉ.दिगंबर रोडे आणि दहा स्वयंसेवक उपस्थित होते. या सर्व उपस्थितितांचे शेवटी प्राचार्य डॉ.वसंत सातपुते सरांनी आभार व्यक्त केले आणि ही रॅली पुढील कार्यक्रमासाठी पाथरीकडे मार्गस्थ झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. डॉ.बालासाहेब काळे, प्रा. अंगद फाजगे, प्रा.डॉ. गोविंद वाकणकर आदींनी परिश्रम घेतले.





# जि.प.प्रा.शा. आवलगाव बु. येथे स्वातंत्र्यसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** जि.प.प्रा.शा.आवलगाव बु. येथे स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती अनोख्या पध्दतीने साजरी करण्यात आली. पोलीस व भारतीय सेनेच्या वेशभुषेत, संचलन करत नेताजींना विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. शालेय समितीचे अध्यक्ष कचरु थोरात, मुख्याध्यापक संजय जपे सर, निलेश जोशी सर, जैवाळ सर,गजम सर,हिवाळे सर एजाज बेग, शारदा ताई ठेगडे आदी उपस्थित होते.

# पसायदान नेत्र रुग्णालयाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** डॉ.श्रीकांत पांडुरंग थोरात यांच्या पसायदान नेत्र स्पेशालिटी रुग्णालयाचा रोहयो मंत्री तथा औरंगाबादचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांचा हस्ते सोमवारी 23 जानेवारी रोजी फित कापून शुभारंभ करण्यात आला. तालुक्यातील रुग्णांना अद्यायावत नेत्रसेवा मिळावी, या उद्देशाने पसायदान नेत्र रुग्णालयात कॉम्प्युटरद्वारे चष्म्याचे नंबर काढण्याची सोय. आधुनिक फेको मशीनद्वारे मोतीबिंदु शस्त्रक्रिया, बुबुळाचे आजार व उपचार व शस्त्रक्रिया, सुसज्य ऑपरेशन थियटर, तिरळेपणा व काचबिंदु निदान, उपचार, मधुमेह रुग्णांसाठी नेत्रपटल तपासणी, ऑपरेशननंतर येणारी जाळी लेझरच्या नेत्ररोगाबाबतची सर्व परिपूर्ण सेवा उपलब्ध व्हावी, या दृष्टिकोनातून या रुग्णालयामध्ये उपचार घेता येणार आहे. याप्रसंगी ब्रम्हकुमारीज राजयोगिनी शिला दिदि, राजयोगिनी सुमन दिदि, मुंबई महानंदचे संचालक नंदलाल काळे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, डॉ. सुनील गायकवाड, ॲड. सदाशिव जाधव, कृष्णा मापारी,पांडुरंग थोरात, सरपंच संजय थोरात,आप्पासाहेब थोरात, महादेव थोरात उपस्थित होते.



# लातूर जिल्हा डिजिटल मीडिया परिषदेच्या अध्यक्षपदी गोपाळ कुलकर्णी यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील जेष्ठ पत्रकार गोपाळ नारायण



कुलकर्णी यांची लातूर जिल्हा डिजिटल मीडिया परिषदेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात येत आहे.. ही नियुक्ती पुढील दोन वर्षांसाठी असेल अशी घोषणा डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी आज केली आहे. गोपाळ कुलकर्णी हे माध्यम वृत्तसेवा नावाचे युट्यूब चॅनल चालवितात.. दर्जेदार युट्यूब चॅनल म्हणून वाचकांची त्याला पसंती मिळाली आहे. गोपाळ कुलकर्णी ३० – ३५ वर्षे पत्रकारितेत सक्रीय असून विविध दैनिकातील कामाचा दांडगा अनुभव आहे. डिजिटल मिडिया परिषदेचे जिल्ह्यात नेटवर्क उभे करून जिल्हा, तालुका शाखा स्थापन करण्याच्या सूचना गोपाळ कुलकर्णी यांना देण्यात आल्या आहेत.. एस.एम देशमुख यांनी गोपाळ कुलकर्णी यांचं अभिनंदन केलं आहे. या निवडीबद्दल गोपाळ कुलकर्णी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सुभाषचंद्र बोस व स्व. बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना करून भारतीय स्वातंत्र्यलढ्याला स्फूर्ती दिली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे ध्येय समोर ठेवून अविश्रांत परिश्रम घेतले. नेताजी सुभाषचंद्र बोस आणि स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या लेखणीत व कुंचल्यात सामाजिक व राजकीय परिस्थितीवर मार्मिक भाष्य करण्याचे सामर्थ्य होते. आपल्या अमोघ वक्तृत्वाद्वारे मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणारे शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे आणि



नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिनी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, येथे समितीच्या पोलीस निरीक्षक श्रीमती सुनीता शिंदे मॅडम, यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस आणि स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यालयात जयंती साजरी करण्यात आली..! यावेळी, श्रीमती सुनीता शिंदे मॅडम, मुकुंद मुळे, सिद्राम रणभिरकर, विठ्ठल आडे, संजय पाटील, साजिद हासमी, शिवाजी देशमुख, वैजनाथ मुंडे, बाबू कांबळे, सोनू दरेगावकर, मनोज वाघमारे, शंकर होणवडजकर, सुनील पतंगे, अनिकेत वाघमारे, मोशीन शेख यांची उपस्थिती होती.

# बौद्ध विहारात वाचनालय सुरु करावे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील बौद्ध विहारांमध्ये सुशिक्षित तरुणांसाठी वाचनालय सुरु करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन अजिंठा बुद्धविहार आणि मेडिटेशन संस्थेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. निवेदनात अजिंठा बुद्धविहार संस्थेचे अध्यक्ष आनंद लोंढे यांनी म्हटले आहे की, धुळे जिल्हा हा बहुसंख्य मागासवर्गीयांचा जिल्हा आहे... त्यात सुशिक्षित तरुणांची शहरासह गावपातळीवर मोठी संख्या आहे. बऱ्याच ठिकाणी लोकवर्गणीतून व शासन निधीतून गावोगावी व शहरातही मोठ्या संख्येने बौद्ध बिहार व समाज मंदिरे उभारली आहेत. येथील बौद्ध विहारांमध्ये शांततेचे व मैत्रीचे वातावरण असते. या बुद्धविहारात सुशिक्षित तरुणांसाठी ( शहरातील व ग्रामीण भागातील) आपल्यामार्फत वाचनालय सुरु करण्यात यावे. सद्या काही समाजकंटक देशात अराजकतेचे वातावरण पसरवित आहेत. या बुद्धविहारात वाचनालय सुरु झाल्यास शहरातील व गावातील सर्व जाती-धर्मांचे तरुण अभ्यासासाठी एकत्र येवून मैत्रीचे व बंधुतेचे नाते निर्माण होवून समाज



प्रगतीशील व्हावयास मदत होईल. सध्या सर्वत्र खाजगी व शासनाची नोकरभरती सुरु आहे किंवा सुरु होणार आहे. यामुळे बऱ्याच तरुणांना गावात वाचनालय नसल्यामुळे पैसे देवून इतर अभ्यासिकांमध्ये प्रवेश घ्यावा लागत आहे. आधीच बेरोजगारी आणि त्यातून या अतिरिक्त खर्चामुळे हे तरुण पुस्तकी ज्ञानापासून वंचित राहतात.

यवतमाळ जिल्ह्यातील म. जिल्हाधिकाऱ्यांनी बौद्धविहारात वाचनालय सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. तो निर्णय अत्यंत स्तुत्य व समाज एकसंघ करणारा आहे.

सदर निवेदनाची तात्काळ दखल घेवून आपण आपल्या जिल्ह्यात बौद्धविहारात वाचनालय सुरु करण्याचा निर्णय घ्यावा असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देतांना आज़ाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद लोंढे, समाज समता संघाचे धुळे जिल्हाध्यक्ष किरण गायकवाड, वंचित बहुजन आघाडीचे धुळे जिल्हा संघटक शंकर खरात, प्रा. नागसेन बागुल, अनिल ठाकूर, अमोल शिरसाठ, संदीप गांगुर्डे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in




# अनुकंपाधारकांच्या नियुक्तीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** महाराष्ट्र राज्य नगरपरिषद कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील ३५ अनुकंपाधारकांना त्वरित सेवेत नियुक्ती द्यावी म्हणून महाराष्ट्र राज्य नगरपरिषद कर्मचारी समन्वय समितीचे राज्याचे जनरल सेक्रेटरी अँड.सुनील वाळूजकर, सोलापूर जिल्हाध्यक्ष कॉ. सिद्धाप्पा कलशेट्टी, कामगार नेते महादेव आदापुरे, नानासाहेब वाघमारे, शिवाजीराव पाटील,शरद वाघमारे, धनराज कांबळे, भीम किर्गल, खाजाप्पा दादानवरू यांच्या नेतृत्वाखाली आज जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करून धरणे आंदोलन करण्यात आले यावेळी बोलताना अँड.सुनिल वाळूजकर यांनी सांगितले की, सन २००४ पासून सोलापूर जिल्ह्यातील विविध नगरपालिकेमधील अनेक कर्मचारी मयत झाले आहेत अशा मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा योजनेखाली त्वरित सेवेत नियुक्ती द्यावी म्हणून शासनाने वेळोवेळी निर्देश दिलेले असताना सुद्धा अद्याप पर्यंत गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून अनेक अनुकंपाधारक आजही नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत शासनाने जिल्हास्तरावर याबाबत प्रतीक्षा सूची ठेवण्याबाबत निर्णय दिले आहेत व नगरपालिका अथवा इतर विभागांमध्ये रिक्त जागा असल्यास त्या जागेवर यांची समावेशन करण्याबाबत ही सुचना दिलेल्या आहेत असे असताना प्रत्येक वर्षी केवळ सेवानिष्ठतेनुसार अनुकंपा प्रतीक्षा सूची यादी तयार केली जाते परंतु प्रत्यक्षात एकही अनुकंपाधारक यांना न्याय दिला जात नाही त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय समोर 23, 24, 25 जानेवारी 2023 रोजी धरणे आंदोलन करण्यात आले तसेच 25 जानेवारी 2023 पर्यंत अनुकंपाची नियुक्ती न झाल्यास 26 जानेवारी रोजी सर्व अनुकंपाधारक आपल्या कुटुंबीया समवेत आत्मदहन करणार असल्याची माहिती यावेळी अँड. सुनिल वाळूजकर व कॉ. सिद्धाप्पा कलशेट्टी यांनी दिली यावेळी सर्व अनुकंपाधारक उपस्थित होते.

# वेगवेगळ्या ठिकाणी चौघांची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहरात वेगवेगळ्या भागात वास्तव्यास असणाऱ्या चार जणांनी आत्महत्या केली. तिघांनी गळफास घेतला तर एका महिलेने पेटवून घेत आत्महत्या केली. या चारही जणांच्या आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही. पहिली घटना शिवाजी चौकातील निसर्ग गार्डन रो हाऊसलगत घडली. येथील बंगल्याच्या भांडारगृहाच्या खोलीत राहुल मोरे (४६, सायखेडे रुग्णालयामागे, इंद्रनगरी) यांनी छताच्या पाईपला दोरी बांधून गळफास घेतला. याबाबत सुहास महाले यांनी दिलेल्या माहितीवरून अंबड पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली. दुसरी घटना श्रमिकनगर भागात घडली. श्रीजी हाईट्समध्ये राहणारे विनोद बोरसे (३२) यांनी घरातील पंख्यास ओढणी बांधून गळफास घेतला. ही बाब लक्षात आल्यावर सतीश शेलार यांनी त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात नेले. परंतु, तत्पुर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले. याच परिसरातील रेखाबाई बागले (३८, अशोकनगर) यांनी राहत्या घरात अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून घेतले. त्यात त्या ६० टक्के भाजल्या. मुलगा अक्षयने त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असतांना त्यांचा मृत्यू झाला. या दोन्ही घटनांप्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या नोंदी करण्यात आल्या आहेत. मंदा सौदे (४०, वाल्मिक मंदिराजवळ, गायकवाड मळा, गोरेवाडी) ही महिला मुद्रणालय आवारात सरपण घेण्यास गेली होती. या ठिकाणी बाभळीच्या झाडाला गळफास घेऊन त्यांनी आत्महत्या केली. सायंकाळी ही घटना उघडकीस आली. या बाबत पती सुभाष सौदे यांनी दिलेल्या माहितीवरून नाशिकरोड पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली.

# जादूटोणा विरोधी कायदा अधिक कठोर करावा : अंनिस

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** रामकुंड परिसरात काही हिंदुत्ववादी संत, महंतांनी अंधश्रध्दा निर्मूलन समिती केवळ हिंदू धर्मीयांना लक्ष्य करीत असल्याचा आरोप केला असताना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने त्यांचा हा दावा खोडून काढला आहे. जादूटोणा विरोधी कायद्यातंर्गत दाखल पहिल्या शंभर गुन्ह्यात २० गुन्हे मुस्लिम व्यक्तींविरोधात असल्याचे अंनिसने म्हटले आहे. जादूटोणा विरोधी कायद्याची अधिक प्रभावीपणे अमलबजावणी करण्यात यावी, कायदा अधिक कठोर करण्यात यावा, अशी मागणीही अंनिसने केली आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येनंतर महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी कायदा लागू झाला. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. या कायद्याला नऊ वर्ष पूर्ण झाले असून दिड हजाराहून अधिक गुन्हे या कायद्याअंतर्गत दाखल झाले आहेत. हा कायदा केवळ हिंदू धर्मातील लोकांना लागू पडेल, असा आक्षेप काही लोकांनी घेतला होता. आजही घेतला जात आहे. परंतु, हा कायदा सर्व धर्मांसाठी लागु असल्याचे अंनिसने म्हटले आहे.



# स्त्रियांनी स्वतःमधील गुणवत्ता ओळखून पुढे येण्याची गरज : सरपंच सुनंदाताई भुसे

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** कासेगाव येथे मकर संक्रांतीच्या हळदी कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता यावेळी 'मुलींनी छोट्या छोट्या गोष्टींमधून धडे घेतले पाहिजेत कारण समाजात स्त्री ही मोठी शक्ती असून ती स्वतः घडता घडता कुटुंबियांना घडवते. राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यापासून ते आत्तापर्यंतच्या कर्तबगार महिलांची उदाहरणे घेतली तर त्यातून अनेक बाबी स्पष्ट होतात. जॉब, करिअर, जबाबदाऱ्या, मातृत्व, नेतृत्व या टप्प्यांतून जाताना स्त्रियांना तारेवरची कसरत करावी लागते.
कोणतीही तक्रार न करता घेतलेल्या जबाबदाऱ्या अत्यंत कौशल्याने त्या पार पाडत असतात. स्त्री ही दुबळी नसते. तिच्यामध्ये चातुर्य, क्षमता, कल्पकता, सहनशीलता, धाडस, भावनिकता असे विविध गुण सामावलेले असतात. स्त्रियांनी स्वतःमधील गुणवत्ता ओळखून त्यांनी पुढे येण्याची गरज आहे.' असे प्रतिपादन कासेगाव ग्रामपंचायतच्या सरपंच सौ सुनंदाताई भुसे यांनी केले.
कासेगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विशेष करून महिलांसाठी आयोजित केलेल्या हळदी कुंकू 'महिला जनजागृती'च्या या कार्यक्रमामध्ये कासेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभांगी गुंजाळ व डॉ संध्या पाटील सौ. राहीताई संग्रामसिंह देशमुख या प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करत होत्या. दीप प्रज्वलनानंतर सौ. राहीताई देशमुख यांनी 'महिलांमध्ये जनजागृती करणे का आवश्यक आहे? यांची माहिती दिली.



# सुरेश मंत्री यांच्या विचार मंथनचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** स्तंभलेखक सुरेश मंत्री यांच्या विचार मंथन या पुस्तकाचे प्रकाशन घाटनांदुर येथे आयोजित पहिल्या ग्रामीण मृदगंध साहित्य संमेलनाच्या उद्घाटन समारंभात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. सुरेश मंत्री हे सोमनाथ बोरगाव श्री दत्त माध्यमिक विद्यालयात सहशिक्षक पदावर कार्यरत आहेत. विचार मंथन हा लेख संग्रह आहे. भारतात शिक्षण व्यवस्थेत निर्माण झालेली मरगळ झटकण्यासाठी अशा कृतीशील शिक्षकांची गरज भागविणारे सुरेश मंत्री यांच्या विचार विश्वामध्ये शैक्षणिक, सामाजिक, राजकिय, आर्थिक, विज्ञान व तंत्रज्ञान अशा मानवी जीवनातील अत्यावश्यक विविध क्षेत्र व त्यात निर्माण झालेले प्रश्न-समस्या, त्यावरील उत्तरांची चर्चा यांना स्थान आहे. ही केवळ समकालीन प्रश्नांची चर्चा असली तरी सुद्धा मानवाच्या भविष्यासाठी, भावी पिढ्यांसाठी, शाश्वत विकासासाठी कोणती पावले उचलली जाणे आवश्यक आहे आणि संपूर्ण मानवी समूहासाठी उत्तरे शोधणारी ही लेखमाला आहे. त्यामुळे हे पुस्तक केवळ तत्कालीन समस्यांचा आढावा घेणारे लेखन ठरत नाही. याची उपयुक्तता सर्वकालिन आहे. विचारमंथन हे पुस्तक व्यक्तिमत्व विकास, नेतृत्व विकास, सुजाण पालकत्व, जबाबदार नागरिकत्व अशा कोणत्याही अंगाने वाचकाने पुस्तक हातात धरल्यानंतर त्याला हवे ते मुद्दे या पुस्तकात मिळू शकतात. या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक अमर हबीब, ज्येष्ठ कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर, नुकत्याच नेपाळ मध्ये झालेल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष दगडू लोमटे, आमदार सतीश चव्हाण व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**भडगाव :** अतिक्रमणाबाबत तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने त्रस्त झालेल्या भडगाव तालुक्यातील कजगाव येथील तरुणाने सोमवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयात अंगावर पेट्रोल ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केला. मात्र, वेळीच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. भूषण पाटील असे तरुणाचे नाव आहे. कजगाव येथे शासकीय जमिनीवर अतिक्रमण वाढले आहे. मात्र, काही राजकीय पुढाऱ्यांमुळे अतिक्रमणधारकांवर कारवाई केली जात नसल्याची भूषण पाटील याची तक्रार आहे. अतिक्रमण हटवून तेथे बसस्थानक होईल एवढीच जागा आहे. मात्र, जिल्हा प्रशासनाकडे पाटील याने वेळोवेळी तक्रारी केल्या. त्यामुळे त्रस्त झालेला पाटील हा सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आला. जिल्हाधिकारी कार्यालय आवारातच अंगावर पेट्रोल ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केला.

# 'आयुष्य बदलवणारे 161 विचार' पुस्तकाचे दिमाखात प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथे आयुष्य बदलवणारे 161 विचार पुस्तकाचे प्रकाशन मुकुंदवाडी, औरंगाबाद येथे मोठ्या थाटात पार पडले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.पी.एम.वाघ (अध्यक्ष : कै.मगनराव वाघ पा.सेवाभावी शिक्षण संस्था) होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रदीप सोळुंके (महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते , साहित्यिक ,कीर्तनकार) , श्री. रमेशजी अवचार सर (अध्यक्षःवरद शिक्षण संकुल), ब्रम्हा गिरी (पी. आय. वेदांतनगर), रमेश पवार (अध्यक्ष : पार्थ शिक्षण संकुल) विनोद शिंदे (अध्यक्ष : ज्ञानज्योत शिक्षण संकुल), प्रा. ज्ञानेश्वर ढाकणे (सचिवः संत ज्ञानेश्वर अकॅडमी), डॉ. भाऊसाहेब गोंगे, रत्नाकर कोठावदे सर (शिक्षक, कवी, लेखक किशोर ठुबे (अध्यक्ष गरुडझेप मित्रमंडळ), दीपक खोतकर (सरचिटणीस भाजपा युवा मोर्चा), बाबासाहेब शिंदे (शहर उपाध्यक्ष राष्ट्रवादी) अख्तर पटेल (सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी) प्रा. संदीप मस्के (राज्य-उपाध्यक्ष CCA), प्रा. आप्पासाहेब मस्के पा. (राज्य-कोषाध्यक्ष CCA), प्रा. अजाबराव मनवर (समन्वयक CCA) , प्रा. संजय तांगडे (सह कोषाध्यक्ष CCA) प्रा. अरुण पठाडे (सह सचिव CCA) प्रा. राजेशजी इप्पर (प्रसिद्धी प्रमुख CCA), प्रा. विठ्ठल सोसे (सोशल मीडिया प्रमुख CCA), राजेभाऊ सोळंके, प्रा. रघुनाथ जाधव, प्रशांतजी कोचर, सुनीलजी बडसल, अभिजित दळवी सर, अंबादास कदम सर, वायाळ, प्रा. कल्याण काजळे, जयश्री वाघ , चव्हाण मॅडम, सोंजे मॅडम, काळे मॅडम, माहोर मॅडम, सोनवणे मॅडम, गौरव वाघ, सौरव वाघ इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास कदम यांनी केले तर आभार प्रा. रघुनाथ जाधव सर यांनी मानले.



# श्री गणेश जयंती

आधुनिक केसरी न्यूज

गणेशलहरी ज्या दिवशी प्रथम पृथ्वीवर आल्या, म्हणजेच ज्या दिवशी गणेशजन्म झाला, तो दिवस होता माघ शुद्ध चतुर्थी. तेव्हापासून गणपतीचा आणि चतुर्थीचा संबंध जोडला गेला. माघ शुद्ध चतुर्थी ही 'श्री गणेश जयंती' म्हणून साजरी केली जाते. या तिथीचे वैशिष्ट्य म्हणजे, या तिथीला श्री गणेशाचे तत्त्व हे नेहमीच्या तुलनेत 1 सहस्त्र पटीने कार्यरत असते.

**महत्त्व :** गणपतीची स्पंदने आणि पृथ्वीच्या चतुर्थी तिथीची स्पंदने सारखी असल्याने ती एकमेकांना अनुकूल असतात; म्हणजेच त्या तिथीला गणपतीची स्पंदने जास्त प्रमाणात पृथ्वीवर येऊ शकतात. प्रत्येक मासातील चतुर्थीला गणेशतत्त्व हे नेहमीच्या तुलनेत पृथ्वीवर 100 पटीने कार्यरत असते. या तिथीला केलेल्या श्री गणेशाच्या उपासनेने गणेशतत्त्वाचा जास्त लाभ होतो.

**गणेशजयंतीला गणेशतत्वाचा लाभ होण्यासाठी करावयाची उपासना :** या दिवशी गणपतीचा भावपूर्ण नामजप 3 ते 9 माळा करण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे गणपतीच्या प्रतिमेचे अथवा मूर्तीचे पूजन केल्यास गणपतीची शक्ति आणि चैतन्य यांचा अधिक लाभ होतो. गणपति अथर्वशीर्ष म्हटल्यासही लाभ होतो.

**शुभकार्यात प्रथम गणेशपूजन का करतात ? :** गणपति हा दिशांचा अधिपति आहे. गणेशपूजन केल्यामुळे



दिशा मोकळया करतो. त्यामुळे ज्या देवतेची आपण पूजा करीत असतो, ती पूजास्थानी येऊ शकते. गणपति (नाद) भाषेचे देवांच्या (प्रकाश) भाषेत रूपांतर करतो, त्यामुळे मनुष्याच्या प्रार्थना देवतांना कळतात. गणपति हा विघ्नहर्ता आहे. गणपतीचे वाहन : वृ-वह म्हणजे वहाणे यापासून वाहन हा शब्द बनला आहे. देवांचे वाहन हे त्यांच्या कार्यानुसार त्या त्या वेळी बदलते. उंदीर हे गणपतीचे नित्याचे वाहन, पण त्याची इतरही वाहने आहेत. उदा. युद्धासाठी सिंह. हेरंब गणपतीचे वाहन सिंह, तर मयूरेश्वराचे वाहन मोर आहे. श्री गणेशाची उपासना म्हणून प्रतिदिन खालील गोष्टी कराव्यात :

1. **अथर्वशीर्षाचे पठण :** आपल्या वाणीत चैतन्य असले की, आपल्या बोलण्यात गोडवा येतो. अथर्वशीर्षाच्या पठणाने आपले उच्चार स्पष्ट होतात आणि वाणीत गोडवा येतो. यासाठी अथर्वशीर्षाचे पठण करावे.
2. **अधिकाधिक प्रार्थना :** आपण ज्या भाषेत बोलतो, तिला नादभाषा म्हणतात. इतर देवतांपेक्षा श्रीगणपतीला आपली भाषा अधिक कळते; म्हणून अधिकाधिक प्रार्थना करून त्याची कृपा संपादन करावी.
3. **मानसपूजा :** मानसपूजा म्हणजे मनाने केलेली पूजा. मानसपूजेमुळे मनाला उत्साह मिळतो. याला कोणतेच बंधन नसते. आपल्याला या पूजेद्वारे आपल्या आवडीची वस्त्रे, आवडीची वस्तू देता येते. आपण मनाने सतत श्री गणपतीच्या सहवासात राहून आनंदी राहू शकतो.'

# हुतात्मा पानसरे हायस्कूल शाळेत स्वंयशासन दिन उत्साहात



आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** येथील हुतात्मा पानसरे हायस्कूल शाळेत भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सोमवार( ता.23 ) जानेवारी रोजी स्वंय शासन दिन उत्साहात साजरा करण्यांत आला. यावेळी विद्यार्थाच्या आत्मविश्वास वाढवा व सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा घेण्यात आले. स्वयंशासन दिनी मुख्याध्यापक म्हणून कु. परळे संजना दिंगाबर, उपमुख्यापक गाडीवान पारस शिवराज ,बिरादार विनायक रामराव, पर्यवेक्षक कु. पाटील दिपाली पर्यवेक्षक कु. आदिती भालेराव, अनुप सवळे शुभम गोडिगवार नंदिनी , कार्यलयीन प्रमुख क यांच्यासह 60 शिक्षक 68 शिक्षीका एकूण स्वयंशासन 128 विद्यार्थानी एक दिवस शिक्षक पदाधिकारी बनले होते. पाच वी ते दहाव्या वर्गातील चिमुकल्याना ज्ञानार्जन करीत सर्व वर्ग सांभाळले . तसेच सेवक श्रम प्रतिष्ठेतुन स्वंयस्फूर्तिने सेवकांनी व कर्मचाऱ्यांची काम केले. स्वयंशासन व वेगवेगळे कर्मचाऱ्यांची म्हणजे आज जे हमी शिक्षक म्हणून एक दीवस जे अनुभवले खरच शिक्षक बनने खरच खूप अवघड आहे. शिक्षक शिकवीत असताना हमी बाकावर बसून गोडळ करणे सोपे आहे पण शिक्षकांना किती त्रास होतो आज खऱ्या खऱ्या अर्थाने आज एक दिवस शिक्षक बनून मी अनुभवले विद्यार्थिनी म्हणत होती.

यावेळी संस्थेचे सचिव विश्वनाथ पाटील बनाळीकर, माजी मुअ डी.डी. कुलकर्णी, गटशिक्षण अधिकारी रविशंकर मरकंटे, केंद्रप्रमुख उस्केलवार सर पत्रकार संपादक, शिवराज गाडीवान जेष्ठ पत्रकार, जे. पी. मिसाळे, महेश जोशी, पत्रकार बाबुराव गोणारकर, संपादक मनोज बुदेले, पोतन्ना लखमावाड, शिवसेना धर्माबाद संचालक दिनेश सारडा, कैलास ईनानी ,सर्व मित्रमंडळ पालक यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थना शुभेच्छा दिल्या. शाळेचे मुअएम सन्मुख बेंबरेकर, उपमुआ आर. गायकवाड, पर्यवेक्षक मोहन पुलकंठवार, नरेश जिंदमवार, वेळपत्रक अनिल सुत्रावे शंकर सोनटक्के जोशी यांनी तयार केले सर्व शिक्षक व एक दिवसाचे शिक्षक यांना अरुण भुसलवाड यांनी सुरेख नियोजन करून भोजनाचा आंनद दिला. सर्व कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रिया कदम गौरवी कानगुले आभार वैदही अरगुलवार हीने केला.

# ध्वज फडकावून 'हाथ से हाथ जोड़ो' अभियानाची सुरूवात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** "हाथ से हाथ जोड़ो" या अभियानाची सुरूवात आज औरंगाबाद जिल्हा कॉग्रेस कमिटी कार्यालय "गांधी भवन" शहागंज येथे कॉंग्रेस पक्षाचा ध्वज फडकावून करण्यात आले. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी व महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमिटीच्या अदेशान्व "हाथ से हाथ जोड़ो" या अभियानाची सुरूवात करण्यात येत आहे.

भारतीय स्वातंत्र्यानंतर निघालेली ही ऐतिहासिक BHARATJODOYATRA कन्याकुमारी ते जम्मू काश्मीर मा. राहुल गांधी जी यांच्या नेतृत्वाखाली निघालेली ही "भारतजोड़ोयात्रा" देशातील सर्वच राज्यात व महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातून जाऊ न शकल्यामुळे उर्वरित राज्यात व महाराष्ट्रातील उर्वरित सर्वच जिल्ह्यात ऐतिहासिक भारतजोड़ोयात्रेचे उदिष्टे व संदेश देशातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी व या यात्रेच्या माध्यमातून देशातील सर्वसामान्य जनता मा. राहुल गांधी यांच्याशी महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, नोकरभरती, खाद्यतेल, इंधनाचे वाढलेले भरमसाठभाव आणि महिला, दलित, अल्पसंख्याक होणारे अन्याय अत्याचार, हल्ले, धार्मिक, जातीय ताणतणाव गेल्या ८-९ वर्षात मोठ्या प्रमाणात वाढलेल्या भावना अनेकांनी व्यक्त केल्या आहेत. यासाठी केंद्रातील व राहतील ह्या हुकुमशाही सरकार विरोधात सर्वानी एकत्रित येण्यासाठी हे "हाथ से हाथ जोड़ो" अभियान राबविण्यात येत आहे व यातून



देशातील व राज्यातील सर्व जाती धर्मातील जनतेला संघटित करून ह्या जुलमी व हुकुमशाही सरकार विरोधात बुलंद आवाज उठवण्याचे प्रयत्न केला जाणार आहे. यावेळी औरंगाबाद शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी च्या वतीने औरंगाबाद शहर जिल्हा अध्यक्ष शेख युसूफ लिडर यांनी औरंगाबाद शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे प्रभारी पदी नियुक्ती झाल्याबददल आ.राजेश राठोड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी औरंगाबाद शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी चे अध्यक्ष शेख युसूफ लिडर, डॉ.जफर अहेमद खान, भाऊसाहेब जगताप, डॉ.पवन डोंगरे, अनिस पटेल, एकबालसिंग गिल,सागर नागरे, ॲड.सय्यद अक्रम,अरुण शिरसाठ,एम.ए. अजहर, अथर शेख,अनिल माळोदे, प्रा.प्रकाश वाघमारे, केशव नामेकर, बबन डिंडोरे पाटील, कैसर बाबा, आसमत खान, रवि लोखंडे, अशोक डोळस, अनिता भंडारी, दिपाली मिसाळ, रेखा राऊत, स्वाती सरवदे, माधवी चंद्रकी, मंजु लोखंडे,अरुणा लांडगे, जानु पटेल, शेख रईस, मदनकाका सातपुते, चंद्रकांत बनसोडे जगन्नाथ ढाकणे, आनंद भामरे, विनायक सरवदे, मुख्तार शेख,साजीद कुरैशी, योगेश थोरात, संतोष भिंगारे, शफीक शाह, निर्मला शिखरे,रुख्मणी खंडागळे, हरचरणसिंग गुलाटी, शेख गफुर, ॲड.संदीप नरवडे, संदीप जाधव, साहेबराव बनकर, उमाकांत खोतकर, टी.एस.चव्हाण, किशन पवार, सुनिल वाहुळ,शाहराज कांबळे, शिवाजी चिंचोळे, आसाराम कनसे,सय्यद युनुस, शेख फैज, शिवा गवळे,सलीम खान, सय्यद फयाजोददीन यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# येत्या रविवारी होणार रंगाची मुक्त उधळण

## रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्वेरीत रंग संवाद 2023 चे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या गौरवशाली रौप्यमहोत्सवी वाटचालीच्या निमित्ताने शालेय विद्यार्थी व महाविद्यालयीन युवकांच्या ललित कलागुणांना वाव देण्यासाठी स्वेरीमध्ये येत्या रविवार, दिनांक २९ जानेवारी २०२३ रोजी 'रंगसंवाद- २०२३' या भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.

१९९८ साली स्थापन झालेल्या स्वेरी या शिक्षण संस्थेने विशेषतः ग्रामीण भागातील युवकांना तंत्रशिक्षणाची नवीन उर्जा देत स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रेरणा दिली. याच श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट, पंढरपूर अर्थात स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरचा ज्ञानदायी प्रवास आता २५ वर्षांचा होतो आहे. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर या महाविद्यालयाच्या गौरवशाली रौप्य महोत्सवाकडे होत असलेल्या दमदार वाटचालीचे औचित्य साधून भव्य चित्रकला स्पर्धा 'रंगसंवाद' या उपक्रमाचे आयोजन केले आहे. २०२२-२३ हे वर्ष स्वेरीचे रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने या वर्षात अनेक उपक्रम राबविण्याचे नियोजन असून त्याचाच एक भाग म्हणून येत्या रविवारी, दिनांक २९ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ९:०० ते दुपारी १२:०० पर्यंत 'रंगसंवाद- २०२३' या उपक्रमाचे आयोजन केले आहे.

या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कल्पना विश्वातील चित्रांना साकार करत, कागदावर सृजनरंगांची मुक्त उधळण करण्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले असून, या चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची कला, त्यांचे कल्पनाविश्व पाहता येणार आहे. या स्पर्धेत प्रवेश विनामूल्य आहे. यामध्ये बाल गटामध्ये छोटा व मोठा शिशु वर्ग असणार आहे. यांच्यासाठी कोणत्याही विषयांवर चित्र साकारता येणार आहे. प्राथमिक गटात इयत्ता पहिली ते चौथी मधील विद्यार्थी असणार आहेत. त्यांच्यासाठी 'माझे घर' हा विषय देण्यात आला आहे. किशोर गटात पाचवी ते सातवी मधील विद्यार्थी सहभागी होतील. त्यांच्यासाठी 'माझा आवडता उत्सव' हा विषय देण्यात आला आहे. कुमार गटात आठवी ते दहावीचे विद्यार्थी सहभागी होतील. त्यांच्यासाठी 'माझा भारत महान' हा विषय असेल, युवा गटात अकरावी व बारावीचे विद्यार्थी असतील त्यांच्यासाठी 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' हा विषय असेल. दुसऱ्या युवा गटात म्हणजे उच्च महाविद्यालयीन गटात- पदवी मध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी असतील यांच्यासाठी 'एक भारत, श्रेष्ठ भारत!' हा चित्रकलेचा विषय असेल. तिसऱ्या युवा गटात उच्च महाविद्यालयीन विद्यार्थी असणार आहेत यामध्ये पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात तर यांच्यासाठी 'महाविद्यालय परिसर स्थळ चित्रण' असा विषय देण्यात आला आहे.

चित्रकलेच्या स्पर्धेसाठी आखलेले नियम व अटीः स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी माहिती पत्रकात खालील 'सहभाग पत्र भरून देणे आवश्यक आहे. सदर सहभाग पत्र भरून आयोजक प्रतिनिधीकडे दिल्याशिवाय आपला सहभाग निश्चित केला जाणार नाही. स्पर्धेच्या दिवशी आपल्याला दिलेल्या वेळेतच चित्र काढून त्यात रंग भरून, आपले चित्र आयोजकांकडे द्यायचे आहे. स्पर्धेत विद्यार्थी, कलाकारांनी काढलेल्या चित्रावर आयोजकांचा पूर्ण अधिकार राहील, आपण आपल्याला दिलेल्या विषयावर चित्र काढायचे आहे, चित्र काढण्यासाठी व रंगवण्यासाठी आवश्यक सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावयाचे आहे. प्रत्येक गटासाठी व प्रत्येक क्रमांकासाठी स्वतंत्र पारितोषिके देण्यात येणार असून अनुक्रमे प्रथम क्रमांकासाठी स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख रु. पंधराशे, द्वितीय क्रमांक- स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख रु.एक हजार, तृतीय क्रमांकासाठी स्मृति चिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख रु. पाचशे तर उत्तेजनार्थ दोन पारितोषिके असतील त्यात स्मृतिचिन्ह व प्रशस्ती पत्रक असे स्वरूप असणार आहे. 'रंगसंवाद- २०२३' या उपक्रमाच्या अधिक माहितीसाठी स्वेरी अभियांत्रिकीच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. यशपाल खेडकर (मो.नं.- ९५४५५५३६९९ ), डॉ. धनंजय चौधरी (मो.नं. ९८६०१६०४३१ ) , प्रा. पोपट आसबे (मो. नं. ७८२१००४६४७) व प्रा. अनुराधा पाटील (मो. नं. ७०५७३७६०६४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. यामध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांना 'सहभाग प्रमाणपत्र' देण्यात येईल.